संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
२ जानेवारी २०२१
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)



पदार्थ विज्ञानाचे
नोबेल मिळालेली
अँड्रिया गेझ
तेजस्विनी देसाई

## नोबेल विजेत्यांचा लिलावसिद्धांत कसा आहे?

– संतोष मुळे




MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
MKCL
॥ ज्ञानदीप लावू जगी ॥
www.mkcl.org
जर साथ असेल MS-CIT ची, तर खात्री उज्ज्वल भविष्याची !
आता MS-CIT केंद्रात जाऊन शिका
किंवा घरून आपल्या कंप्यूटरवर शिका
किंवा आपल्या स्मार्टफोनवरून शिका
MS-CIT करा आणि जॉब रेडी व्हा !
www.mkcl.org/join
या लिंकवरून आजच प्रवेश घ्या
किंवा नजिकच्या MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
२ जानेवारी २०२१
वर्ष ७३ / अंक - २०
संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
व्यवस्थापक व अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा. लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph. : 020-24451724 /**
**Mob. : 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635
वार्षिक वर्गणी :
**एक वर्षांसाठी : ८०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १६०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २४०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म.ऑ. डी.डी./ चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र. **60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. )

## अनुक्रम

४ । संपादकीय
**आंतरभारती आणि विश्वभारती**

७ । **नोबेल विजेत्यांचा लिलावसिद्धांत कसा आहे?**
संतोष मुळे

१२ । **पदार्थविज्ञानाचे नोबेल मिळालेली अँड्रिया गेझ**
तेजस्विनी देसाई

१६ । **ओबामांचे राजकीय व्यक्तिमत्त्व दाखवणारे पुस्तक**
अभय दातार

२२ । **विसंगती व सुसंगती समजून घेण्यासाठी उपयुक्त पुस्तक**
वासंती दामले

२७ । **मनाची संगर**
संजीवनी खेर

३२ । **समारोप : पूर्वार्ध**
अपर्णा दीक्षित

३५ । **सुंता**
अल्ताफहुसेन रमजान नबाब

३८ । **मिलिंदायन'चे ल. बा. रायमाने**
राम दोतोंडे

४० । **प्रतिसाद**
**दत्ता दामोदर नायक, नरेंद्र महादेव आपटे, गणपतराव कणसे, ॲड्.देवीदास वडगावकर.**

संपादकीय

# आंतरभारती आणि विश्वभारती

साधनाचे संस्थापक साने गुरुजी यांची ओळख अनेक प्रकारच्या कर्तबगारीसाठी आहे. त्यातील एक ओळख आहे- आंतरभारती या संकल्पनेचे पुरस्कर्ते. भारतातील विविध भाषक समूहांमध्ये आदान-प्रदान व्हावे, हा त्या कल्पनेचा गाभा. विविध भाषांमध्ये साठलेले ज्ञान परस्परांच्या सहयोगाने वृद्धिंगत होत राहावे, हा त्यामागचा हेतू. आणि भाषांच्या बरोबरीने येणाऱ्या विविध संस्कृतींचे अभिसरण होऊन, भारतीय संस्कृतीचा उत्कर्ष होत राहावा, हा अंतिम उद्देश! अर्थातच राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागणे हे त्याचे फलित. परंतु गुरुजींच्या विचारविश्वाला राष्ट्राच्या सीमा बांधून ठेवू शकत नव्हत्या, म्हणून तर जगभरातील विविध समाज आणि संस्कृती समजून घेणे आणि आपल्या देशबांधवांना समजावून देणे, ही तळमळ त्यांच्या मनात कायम होती. त्यासाठी भाषा हेच प्रमुख साधन आहे, अशी त्यांची धारणा होती. आणि म्हणून त्यांनी देश-विदेशांतील विविध भाषांमधून ज्ञानकण वेचले आणि मराठीत आणले. त्यांनी लहान-मोठी अशी सव्वाशेहून अधिक पुस्तके लिहिली, त्यातील अर्ध्यांहून अधिक पुस्तकांत विविध भाषांमधील ज्ञानभांडाराची झलक पहायला मिळते. त्यातील काही लेखन थेट अनुवाद/भावानुवाद आहे, तर काही लेखन रूपांतरित स्वरूपाचे आहे, म्हणजे त्याला भारतीयत्व बहाल केले आहे. त्यातही विशेष हे आहे की, गुरुजींचे बहुतांश स्वतंत्र लेखन कुमार व युवावर्गाला समोर ठेवून केलेले असले तरी, त्यांनी अन्य भाषांमधून जे ज्ञानकण वेचले त्यातील बहुतांश पुस्तके गंभीर, वैचारिक किंवा तत्त्वचिंतनात्मक स्वरूपाची आहेत. मग त्यात भारतातील बंगालीबाबू रवींद्रनाथ व तमिळ महाकवी तिरुवल्लुवर येतात आणि रशियन महालेखक लिओ टॉलस्टॉय व अमेरिकन तत्त्ववेत्ता विल ड्युरांट येतात. या दरम्यानची नामावली एकत्र करून सादर केली तर कोणीही चांगला वाचक अचंबित होईल.

अशा या साने गुरुजींच्या १२१ व्या जयंतीचे (२४ डिसेंबर) निमित्त साधून, पानांच्या संख्येत खूप छोटी पण आशय-विषयाच्या दृष्टीने बरीच मोठी अशी दोन पुस्तके साधना प्रकाशनाकडून येत आहेत. अर्थातच ही दोन्ही पुस्तके याआधी साधना साप्ताहिकातून प्रसिद्ध झालेली आहेत. दोन्ही पुस्तके अनुवादित आहेत आणि मराठीतील नामवंत लेखक भारत सासणे यांनी ते अनुवाद केलेले आहेत. 'ही पुस्तके सख्खी भावंड आहेत की सावत्र?' असा प्रश्न आम्ही त्यांना विचारला तर उत्तर आले- 'चुलत भावंड.'

तर त्यातील एक आहे 'दंतकथा' ही लघुकादंबरी, अब्दुल बिस्मिल्लाह यांनी १९९० मध्ये ही कादंबरी लिहिली आणि 'इंडिया टुडे'च्या हिंदी आवृत्तीत ती क्रमश: प्रसिद्ध झाली. नंतर ती राजकमल प्रकाशनाकडून पुस्तकरूपाने आली. त्यानंतर दशकभराने ती कादंबरी भारत सासणे यांनी वाचली आणि तिचा मराठी अनुवाद केला. मग २००२ च्या साधना दिवाळी अंकात ती संपूर्ण कादंबरी प्रसिद्ध झाली. त्या वेळी संपादक असलेल्या डॉ.नरेंद्र दाभोलकरांना ती विशेष



कृष्ण चंदर



अब्दुल बिस्मिल्लाह



भारत सासणे

आवडली होती, हे नोंद घेण्यासारखे आहे. 'दंतकथा' ही बाह्यरूपाने पाहिली तर एका कोंबड्याची आत्मकथा आहे, पण अंतरंग पाहिल्यावर दिसतात एका पशूच्या नजरेतून माणूस नावाच्या प्राण्याचे जीवनव्यवहार व मनोव्यापार!

दुसरे पुस्तक आहे, 'दरवाजे खोल दो' या उर्दूमधील नाटकाचा अनुवाद. १९६४ मध्ये हे पुस्तक कृष्ण चंदर यांनी लिहिले. त्या काळात ते नभोनाट्य स्वरूपात आले आणि नंतर रंगमंचावरही. मात्र ते भारत सासणे यांच्या वाचनात आले या वर्षी. त्याचा संपूर्ण अनुवाद प्रसिद्ध केला १३ जून २०२० च्या साधना साप्ताहिकात. नव्याने बांधली जात असलेल्या इमारतीचा मालक आणि त्या इमारतीत वास्तव्यासाठी येऊ इच्छिणारे भाडेकरू यांच्यातील संवाद असे त्या नाटकाचे बाह्यरूप. मात्र त्याच्या अंतरंगात दिसतात– नव्याने उभारणी होत असलेले भारत नावाचे राष्ट्र आणि त्यात वास्तव्य करणारे विविध भाषा बोलणारे व विविध जाती, धर्म, संस्कृतीचे लोक!

ही दोन्ही पुस्तके अनुवादासाठी भारत सासणे यांनी स्वत:हून निवडली आहेत. रूढ अर्थाने ते काही अनुवादक नाहीत. त्यांच्या स्वतंत्र लेखनाची दोन डझनांहून अधिक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्यात कथा, कादंबरी, नाटक, बालसाहित्य, ललित लेखन इत्यादी प्रकारांचा समावेश आहे. त्यांच्या अनेक पुस्तकांचे/कथांचे अनुवाद अन्य भारतीय भाषांमध्ये झालेले आहेत. अशा पार्श्वभूमीवर त्यांनी केलेल्या या दोन अनुवादित पुस्तकांचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. त्यातील 'दंतकथा'बद्दल तर त्यांनी म्हटलेच आहे की, 'ही कादंबरी अब्दुल बिस्मिल्लाह यांनी लिहिली नसती तर त्यांनी स्वत:च लिहिली असती' इतका तो आशय त्यांना जवळचा वाटला. वयाच्या साठीनंतर भारतीय प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाल्यावर त्यांनी उर्दू भाषा शिकायला सुरुवात केली आणि त्या भाषेवर पुरेशी पकड आल्यावर केलेला अनुवाद म्हणजे 'उघडा, दरवाजे उघडा!'

ही दोन्ही पुस्तके वाचताना आपण अनुवादित लेखन वाचत आहोत असे कुठेही वाटत नाही, इतके ते प्रवाही झाले आहे. एकेका बैठकीत वाचून होतील अशी ही प्रत्येकी पन्नास पानांची पुस्तके आहेत. साधना प्रकाशनाकडून मागील दोन–तीन वर्षांत प्रकाशित झालेली प्रत्येकी एवढ्याच पानांची दहा–बारा पुस्तके आहेत, ती कमालीची वाचनीय आहेत. या सर्व पुस्तकांना युवा वाचनमाला असे स्थान मिळत आहे. कारण वेगवेगळ्या काळातील आणि गंभीर व वैचारिक आशय–विषयांची अशी ही पुस्तके असली आणि सर्वच प्रकारच्या वाचकांकडून त्यांचे स्वागत झालेले असले तरी, आजच्या तरुणाईला ती विशेष जवळची वाटली आहेत, हे विशेष! आणि आता भारत सासणे यांनी अनुवाद केलेली ही दोन पुस्तकेही युवा वाचनमालेत घट्ट बसणारी आहेत. (ही दोन पुस्तके इ–बुक स्वरूपातही उपलब्ध झाली असून, लवकरच ऑडिओ बुक स्वरूपातही येतील.)

या दोन्ही पुस्तकांचे मूळ लेखक कोण आहेत आणि त्यांचे साहित्यिक कर्तृत्व काय आहे, याची तोंडओळख करून घेतली तर या पुस्तकांचे महत्त्व आणखी ठसते. कृष्ण चंदर (१९१४-७७) यांनी हिंदी व उर्दू या दोन्ही भाषांमधून कथा, कादंबरी, नाटक या तिन्ही प्रकारांतील विपुल लेखन केले आहे. अब्दुल बिस्मिल्लाह (जन्म १९४९) यांनीही हिंदीमध्ये कथा, कादंबरी, कविता या तिन्ही प्रकारांतील बरेच लेखन केले आहे. या दोन्ही लेखकांचे नाते प्रेमचंद यांच्याशी सांगितले जाते, एवढे लक्षात घेतले तर 'त्यांचा दर्जा काय' हा प्रश्न उपस्थित होत नाही. त्यामुळे ही दोन्ही पुस्तके त्या लेखकांच्या अन्य पुस्तकांकडे वाचकांना वळवतील असा आम्हाला विश्वास वाटतो. कदाचित या दोन्ही लेखकांच्या अन्य काही पुस्तकांचे अनुवाद पुढील काही वर्षांत साधना प्रकाशनाकडून येतील.

कदाचित ही दोन पुस्तके साधना प्रकाशनाकडे 'आंतरभारती' संकल्पनेचे दालन नव्याने उघडण्यासाठी कारणीभूत ठरतील. कारण भारतातील अन्य भाषांमधील ललित व वैचारिक या दोन्ही प्रकारांतील लेखन मराठीत आणण्यासाठी पूर्वीच्या तुलनेत आता अधिक अनुकूलता साधनाला आहे. साप्ताहिक, प्रकाशन आणि 'कर्तव्य' हे डिजिटल पोर्टल ही तीन माध्यमे साधनाच्या हाताशी आहेत. शिवाय, डिजिटल तंत्रज्ञानामुळे विविध भाषांमधील आदान-प्रदान आता अधिक सुलभ, जलद व कमी खर्चिक असे झाले आहे. मात्र दर्जेदार लेखन आणि अचूक व प्रवाही अनुवाद ही कामे तेवढी सुलभ व जलद झालेली नाहीत. कारण तंत्रज्ञान हे मानवी सर्जनशीलतेला उपकारक ठरत असले तरी, पर्याय ठरू शकत नाही. म्हणजे भाषेच्या माध्यमातून करावयाचे आदान-प्रदान पूर्वीइतकेच कष्टप्रद राहणार आहे.

'आंतरभारती' या संकल्पनेतील दुसरी बाजू अधिक कठीण व कष्टप्रद आहे. ती म्हणजे मराठीतील लेखन अन्य भाषांमध्ये घेऊन जाणे. त्यासाठी विविध भाषांमधील अनुवादक मिळवता येणे, त्यांच्याकडून झालेल्या कामाचा दर्जा तपासता येणे आणि ते लेखन अन्य भाषांमध्ये प्रकाशित होण्यासाठी प्रकाशक उपलब्ध होणे, या तिन्ही आघाड्यांवर अनेक अडथळे आहेत. मात्र या कामासाठीही पूर्वीच्या तुलनेत आता अधिक अनुकूलता आहे ती केवळ तंत्रज्ञानामुळेच! आणि म्हणूनच असाही एक विचार आहे की, पुढील दोन-तीन वर्षांत साधनाकडून असे एखादे डिजिटल पोर्टल सुरू करावे, ज्यावर विविध भाषांमधील लेखन असेल, म्हणजे एकच लेख विविध भाषांमध्ये तिथे वाचायला मिळेल. अर्थातच त्याला बरीच जुळवणी करावी लागेल, वेळ, ऊर्जा, श्रम, खर्च करावे लागतील. पण तसे झाले तर एका क्लिकवर विविध भाषांमधील दर्जेदार लेखन वाचण्याची सोय होईल. मग आंतरभारतीच नव्हे तर विश्वभारतीचे स्वप्नही प्रत्यक्षात अवतरू लागेल!

▶

## १ जानेवारीपासून साधनाच्या वर्गणीत वाढ

साधना साप्ताहिकाचे वर्षभरात मिळून ४८ अंक प्रकाशित होतात, त्यात तीन दिवाळी अंक (बालकुमार, युवा, मुख्य) आणि अन्य पाच विशेषांक असतात. हे सर्व अंक दर आठवड्याला वर्गणीदार वाचकांना पोस्टाने पाठवले जातात. वर्षभरातील या घरपोच अंकांसाठी वार्षिक, द्वैवार्षिक व त्रैवार्षिक वर्गणी भरण्याची सोय असते. प्रत्येक दोन किंवा तीन वर्षांनंतर या वर्गणीत वाढ केली जाते. सध्या साधनाची वार्षिक, द्वैवार्षिक व त्रैवार्षिक वर्गणी अनुक्रमे ८०० रुपये, १६०० रुपये, २४०० रुपये इतकी आहे. येत्या ३१ डिसेंबरपर्यंत याच दराने वर्गणी स्वीकारली जाईल. त्यानंतर म्हणजे १ जानेवारी २०२१ पासून साधनाची वार्षिक द्वैवार्षिक व त्रैवार्षिक वर्गणी अनुक्रमे ९०० रुपये, १८०० रुपये, २७०० रुपये अशी राहील. ही वर्गणी चेक, कॅश, बँक ट्रान्सफर इत्यादी मार्गाने भरता येते, त्यासाठी आवश्यक तपशील साधनाच्या प्रत्येक अंकात अनुक्रमणिकेच्या पानावर असतात.

दृष्टिक्षेप



संतोष मुळे

# नोबेलविजेत्यांचा लिलावसिद्धांत कसा आहे?

आधुनिक तंत्रज्ञान हे गुंतागुंतीचे असले, तरी त्यामुळे नवनवीन बाजारपेठा विकसित झालेल्या आहेत. सर्वाधिक मागणी असलेल्या काळात वीजविक्रीकरता वीज कंपन्यांनी लिलावाचे कोणते प्रारूप वापरावे, मासेमारीकरता प्रत्येक जहाजांना लिलावाद्वारे कोटा कसा निर्धारित करावा, इंटरनेटवर जाहिरातीसाठीचे दर कसे निर्धारित करावेत, दूरसंचार लहरी कशा विकाव्यात– या व अशा प्रकारच्या अनेक समस्यांच्या निराकरणात आणि किंमतनिश्चितीत पारंपरिक ज्ञान अपुरे असते. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने विकता येत नाहीत, अशा वस्तू व सेवांच्या विक्रीकरता नवे लिलाव प्रारूप विकसित करणे अत्यावश्यक असते. या व यांसारख्या अनेक व्यावहारिक प्रश्नांवर विल्सन व मिलग्रोम यांचे मूलभूत असे संशोधन आहे. असे असले, तरी यांना सर्वाधिक प्रसिद्धी मिळाली ती १९९३ मधील अमेरिकेतील स्पेक्ट्रम लिलावाकरता त्यांनी विकसित केलेल्या नवे लिलाव आराखड्यामुळे.

लिलाव सिद्धांतातील सुधारणा आणि नवे लिलाव स्वरूप विकसित केल्याबद्दल रॉबर्ट विल्सन आणि पॉल मिलग्रोम या अमेरिकन (USA) गुरू-शिष्यांना अल्फ्रेड नोबेल यांच्या पुण्यतिथीदिनी दि. १० डिसेंबर २०२० रोजी जगातील अत्युच्च सन्मानदर्शक अशा नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. रूढ अर्थाने या पुरस्काराला अर्थशास्त्रातील नोबेल असे म्हटले जात असले, तरी प्रत्यक्षात यास अल्फ्रेड नोबेल यांच्या स्मरणार्थ दिले जाणारे सेवेरिजस रिक्स बँक (स्विडनची मध्यवर्ती बँक) पारितोषिक असे अधिकृत नाव आहे. अल्फ्रेड नोबेल यांनी आपल्या मृत्युपत्रात मानवजातीच्या कल्याणाकरता सर्वोत्कृष्ट कार्य करणाऱ्या ज्या पाच क्षेत्रांकरता हे पारितोषिक ठेवले होते, त्यात अर्थशास्त्राचा समावेश नव्हता. बँकेच्या ३०० व्या वर्धापनदिनानिमित्त १९६८ मध्ये सेवेरिजस रिक्स बँककडून नोबेल फाउंडेशनला मिळालेल्या देणगीवर हे नोबेल पारितोषिक आधारित आहे. मात्र या पुरस्काराचे विजेते इतर नोबेल विजेत्यांप्रमाणेच पारितोषिक वितरण समारंभात उपस्थित राहतात; इतरांप्रमाणेच यांनाही स्विडिश राजाकडून मानपत्र, सुवर्णपदक व पुरस्काराची रक्कम प्रदान केली जाते. नोबेल पारितोषिकाच्या अधिकृत वेबसाईटवरही या पुरस्कार-विजेत्यांची नोंद असते. त्यामुळे रूढ अर्थाने या पारितोषिकालाही अर्थशास्त्रातील नोबेल असे म्हटले जाते. राजकीय अथवा सामाजिक दृष्टिकोनापेक्षा शास्त्रीय आणि विशेषतः गणितीय व सांख्यिकीय माध्यमातून अर्थशास्त्रीय सिद्धांत व त्यांचे उपयोजन विकसित करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांना हे पारितोषिक दिले जाते. या अनुषंगाने १९६९ ते २०२० या कालावधीत ५२ वेळा (८६ जणांना) हे पारितोषिक दिले गेले आहे.

अर्थशास्त्रीय सिद्धांत हे अनेक बाबी गृहीत धरून मांडलेले असतात, त्यामुळे बहुतांश वेळा ते वास्तवतेच्या जवळ जाणारे असतातच असे नाही. मात्र विल्सन आणि मिलग्रोम यांचे लिलाव सिद्धांत हे त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित असल्याने, वास्तव जगतातील वस्तूंच्या आणि सेवांच्या किंमतनिश्चितीचे प्रश्न

सोडविण्याकरिता उपयुक्त आहेत, असे या पारितोषिक निवड समितीला वाटते.

कॅलिफोर्नियामधील स्टॅनफोर्ड विद्यापीठात केवळ ४० मीटर अंतरावर राहणाऱ्या या दोन्ही गुरु-शिष्यांचा एकाच वेळी सन्मान होणे, हाही एक दुग्धशर्करायोग आहे. स्टॅनफोर्ड विद्यापीठात सेवानिवृत्तोत्तर मानद प्राध्यापक असणारे ८३ वर्षीय रॉबर्ट विल्सन यांच्या एकूण तीन शिष्यांना हे पारितोषिक आतापर्यंत मिळाले आहे, हे विशेष! नोबेल समितीकडून जेव्हा विल्सन यांना अमेरिकन वेळेच्या मध्यरात्री फोन केला गेला, तेव्हा 'एवढ्या मध्यरात्री कुणी फोन केला असेल' असे म्हणून त्यांनी तो डिस्कनेक्ट केला होता. निवड समितीने त्यानंतर त्यांची पत्नी मेरी यांच्याशी संपर्क करून विल्सन आणि मिलग्रोम यांना हे पारितोषिक मिळाल्याचे सांगितले. निवड समितीचा ७२ वर्षीय पॉल यांच्याशी संपर्क होत नव्हता, तेव्हा त्या मध्यरात्री स्वतः रॉबर्ट विल्सन यांनी पॉल मिलग्रोम यांच्या घरी सपत्नीक जाऊन त्यांना ही आनंदाची बातमी सांगितली!

लिलावाची वेगवेगळ्या प्रकारे आखणी करून त्या माध्यमातून विभिन्न परिणाम साध्य करता येतात, हा या दोन्ही अर्थतज्ज्ञांच्या अभ्यासाचा मुख्य गाभा आहे. आर्थिक समस्यांचे आकलन करणे आणि त्यातील गुंतागुंत सोडवणे, यात त्यांना रस आहे. त्यामुळे साहजिकच ते मूलभूत संशोधनास उपयोजनेची जोड देतात. आपल्याकडे संशोधनाकरता आलेल्या पॉलला रॉबर्ट यांनी त्यांच्या इतर विद्यार्थ्यांप्रमाणेच दिलेला सल्ला असा की, 'अव्यवहार्य आणि बिनमहत्त्वाच्या केवळ सैद्धांतिक बाबींवर वेळ घालवून नकोस. अशा समस्यांच्या निराकरणाची कुणालाही फिकीर नसते.' पॉलनी तो सल्ला शिरोधार्य मानला आणि पुढे या दोघांनी इतिहास घडवला!

वरकरणी अतिशय सोपा वाटणारा लिलाव प्रत्यक्षात गुंतागुंतीचा असतो. विशेषतः लिलावात बोली लावणाऱ्या संभाव्य खरेदीदारांकडील लिलावातील वस्तूंविषयी असलेली माहितीची उपलब्धता किंवा अनुपलब्धता, त्याच्या बोली लावण्याच्या व्यूहरचनेवर प्रभाव टाकते, यावर या दोघांचे संशोधन आहे. या अनुषंगाने सांगायचे झाले तर, खनिज तेल उत्खनन पट्ट्यांच्या लिलावात विक्रीकरता किती संभाव्य तेल उपलब्ध होईल; त्याबद्दल सर्व बोली लावणाऱ्या संभाव्य खरेदीदारांमध्ये निश्चितता असते. मात्र भविष्यात ते तेल बाजारात नेमक्या कोणत्या किमतीला विकले जाईल, याबाबत अनिश्चितता असते. म्हणून येथे लिलावाचा प्रश्न कठीण बनतो. भविष्यकालीन किंमतविषयक माहितीबद्दल सर्व बोलीदारांचे आकलन


रॉबर्ट विल्सन



पॉल मिलग्रोम

एकसारखेच नसल्याने प्रत्येक जण आपापल्या माहितीच्या आकलनानुसार बोली लावतो. ज्याचे किंमतआकलन जास्त असते, तो अधिक किमतीची बोली लावतो आणि लिलाव जिंकतो. आता जर या प्रक्रियेत लिलावविजेत्याने प्रत्यक्षातील खऱ्या मूल्यापेक्षा अधिक किंमत देऊ केली असेल, तर त्याला नुकसान होते. अर्थशास्त्रात याला विजेत्याचा शाप (Winners Curse) असे म्हणतात. लिलावातील बोलीदारांना लिलावातील वस्तूबद्दल आपल्या स्पर्धकांचे मूल्य–आकलन काय आहे याची माहिती लिलावातील विविध टप्प्यांत उपलब्ध करून देऊन संभाव्य विजेत्याला विजेत्याच्या शापापासून कसे वाचवता येईल, हा यांच्या संशोधनाचा मूलभूत गाभा आहे. त्यात लिलावाचा आराखडा आणि लिलावाचे नियम तयार करण्यात पॉल मिलग्रोम यांचा हातखंडा आहे. उच्च मूल्य असलेल्या आणि भरपूर काही पणाला लागणाऱ्या लिलावात कशा पद्धतीने लिलावाचे नियम असावेत, संभाव्य खरेदीदाराने बोली कशी लावावी– याकरता सल्ला देणारी एक कंपनीच पॉल चालवतात. एकंदर, लिलावात विक्री करणारा आणि खरेदी करणारा या दोन्ही पक्षांना तर्कशुद्ध पद्धतीने लिलाव किंमतनिश्चिती करण्यात ते मदत करतात. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या अंतरंगात त्यांना डोकावून पाहता येते.

आधुनिक तंत्रज्ञान हे गुंतागुंतीचे असले, तरी त्यामुळे नवनवीन बाजारपेठा विकसित झालेल्या आहेत. सर्वाधिक मागणी असलेल्या काळात वीजविक्रीकरता वीज कंपन्यांनी लिलावाचे कोणते प्रारूप वापरावे, मासेमारीकरता प्रत्येक जहाजांना लिलावाद्वारे कोटा कसा निर्धारित करावा, इंटरनेटवर जाहिरातीसाठीचे दर कसे निर्धारित करावेत, दूरसंचार लहरी कशा विकाव्यात– या व अशा प्रकारच्या अनेक समस्यांच्या निराकरणात आणि किंमतनिश्चितीत पारंपरिक ज्ञान अपुरे असते. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने विकता येत नाहीत, अशा वस्तू व सेवांच्या विक्रीकरता नवे लिलाव प्रारूप विकसित करणे अत्यावश्यक असते. या व यांसारख्या अनेक व्यावहारिक प्रश्नांवर विल्सन व मिलग्रोम यांचे मूलभूत असे संशोधन आहे. असे असले, तरी यांना सर्वाधिक प्रसिद्धी मिळाली ती १९९३ मधील अमेरिकेतील स्पेक्ट्रम लिलावाकरता त्यांनी विकसित केलेल्या नवे लिलाव आराखड्यामुळे.

जेव्हा जनतेचा विश्वस्त या नात्याने सरकारला टेलिकॉम स्पेक्ट्रमसारखी दुर्मिळ साधनसामग्री खासगी कंपन्यांना द्यावयाची असते, तेव्हा जनहित आणि महसुलाचे महत्तमीकरण कसे करावे, हा प्रश्न सरकारला भेडसावत

असतो. अमेरिकेला रेडिओ लहरींचा लिलाव १९९३ मध्ये करावयाचा होता. याकरता त्यांनी अर्थतज्ज्ञांना हा लिलाव कसा करावा, याविषयी सल्ला मागितला. या लिलावात गुंतागुंत अशी होती की, रेडिओ लहरी या इतर वस्तूंसारख्या नसतात. हे परवाने विविध सर्कलमध्ये विभागलेले असतात, ते विविध रेडिओ फ्रिक्वेन्सीचेही असतात. त्यामुळे एकानंतर एक सर्कल लिलावाकरता घेतले गेल्यास लिलावात बोली जिंकणाऱ्या कंपन्यांना विजेत्याच्या शापाला सामोरे जावे लागते.

या अनुषंगाने भारताबद्दल सांगायचे झाले तर, महाराष्ट्रात मुंबई मेट्रोपॉलिटन एरिया आणि उर्वरित महाराष्ट्र व गोवा असे दोन टेलिकॉम सर्कल आहेत. आता जर एखाद्या मोबाईल कंपनीला संपूर्ण महाराष्ट्रभर सेवा द्यायची असेल, तर तिला या दोन्ही टेलिकॉम सर्कलमधील परवाने लिलावात घ्यावे लागतील. समजा- जर सुरुवातीला मुंबईच्या सर्कलमध्ये ही सेवा देण्याकरता कंपनीने लिलावात अधिक रकमेची बोली लावली, तर पुढच्या फेरीतील उर्वरित महाराष्ट्र व गोव्याकरता त्यांच्याकडे रक्कम कमी राहील. येथे एकेका सर्कलकरता असलेले मूल्य आणि दोन्ही सर्कलचे असलेले एकत्रित मूल्य यात एकत्रित परवाने अधिक मूल्याचे ठरतात. अशा परिस्थितीत एका प्रदेशापुरता मिळालेला परवाना आणि एकापेक्षा अधिक प्रदेशांकरता मिळालेला परवाना यातील मूल्यतफावत जास्त असते.

अमेरिकेत सुरुवातीला जो सर्वाधिक बोली बोलेल, त्याला त्या सर्कलचा परवाना फेडरल कमिशन ऑफ टेलिकम्युनिकेशन देणार होते. मात्र यात पुढील सर्कलच्या लिलावावेळी नेमक्या किती रकमेची बोली बोलावी, याविषयी कंपन्यांमध्ये अनिश्चितता निर्माण होणार होती. या ठिकाणी ही समस्या सोडविण्याकरता रॉबर्ट विल्सन आणि पॉल मिलग्रोम यांनी विकसित केलेली Simultaneous Multiple Round Auction (SMRA) पद्धत वापरली गेली. या लिलाव आराखड्यात विजेत्याचा शाप कमी करण्यासाठी सुरुवातीला कमी किमतीला लिलाव सुरू करून हळूहळू किंमत वाढणारी इंग्रजी लिलावाची पद्धत वापरली गेली. ही पद्धत सुरुवातीला अत्याधिक किंमत सांगून हळूहळू किंमत कमी करणाऱ्या डच लिलाव पद्धतीपेक्षा सरस आहे. कारण या पद्धतीत लिलावातील बोलीदार इतर बोलीदारांच्या बोली किमतीवरून लिलाव वस्तूबद्दल अधिक माहिती जाणून घेऊ शकतात.

अधिक माहिती म्हणजे अधिक योग्य बोली, अधिक उत्पन्न आणि आणि विजेत्याच्या शापाची शक्यता कमी. SMRA पद्धतीत सर्व फ्रिक्वेन्सी बँडचा लिलाव एकाच वेळी सुरू होतो. सहभागी कंपन्या त्यांना योग्य वाटणाऱ्या विविध सर्कलकरता एकाच वेळी बोली लावू शकतात. यात लिलावाच्या विविध फेऱ्या होतात. प्रत्येक फेरीत सहभागी कंपन्या आपल्याला हव्या असलेल्या सर्कलकरता बंदिस्त लखोट्यात आपली बोलीरक्कम देतात. प्रत्येक फेरीच्या शेवटी या सर्व बोली रकमा जाहीर केल्या जातात. त्यामुळे सर्व बोली बोलणाऱ्या कंपन्यांना आपले स्पर्धक त्या परवान्याचे काय मूल्य ठरवत आहेत, हे कळते. ज्या कंपन्यांनी या फेरीत बोली लावली आहे, केवळ त्याच कंपन्यांना पुढील लिलाव फेरीकरता पात्र ठरवले जाते. मागील फेरीतील सर्वाधिक बोलीची रक्कमही पुढील फेरीकरता आधारभूत रक्कम मानली जाते. म्हणजे, या फेरीतील शिल्लक कंपन्यांना त्यापेक्षा अधिक रकमेची बोली लावावी लागते. अशा प्रकारे जोपर्यंत सर्वाधिक बोली लावणारा विजेता निश्चित होत नाही, तोपर्यंत या फेऱ्या होत राहतात. मागील फेरीच्या अनुभवावरून, स्पर्धकांच्या मूल्य-आकलनाच्या माहितीवरून प्रत्येक कंपनीला आपली बोलीविषयक व्यूहरचना बदलता येऊ शकते, बोलीरक्कम वाढवता येऊ शकते.

या लिलावप्रक्रियेचे वैशिष्ट्य म्हणजे, प्रत्येक फेरीत सहभागी बोलीदारांना बोली लावावीच लागते. या फेरीत मी फक्त इतरांची बोललेली रक्कम पाहतो आणि नंतर पुढच्या फेरीत बोली लावतो, असे कोणालाही म्हणता येत नसते. याला ॲक्टिव्हिटी रूल असे म्हणतात. ज्याप्रमाणे गवतातील हिरव्या रंगाचे साप अचानकपणे बेसावध भक्ष्यावर हल्ला करून त्याला गिळंकृत करतात, त्या प्रकारे ऐन वेळी शेवटी एखादा बोलीदार इतरांच्या बोली आकलनानुसार महत्तम बोली बोलून लिलाव जिंकू शकतो. याला अर्थशास्त्रात 'स्नेक इन द ग्रास प्रॉब्लेम' असे म्हणतात. मात्र ॲक्टिव्हिटी रूलमुळे या प्रक्रियेला खीळ बसते! असे नियम केल्याने बोलीची प्रक्रिया सोपी व न्याय्य बनते. यात सहभागी बोलीदारांना आपले खरे मूल्यआकलन जाहीर करावे लागते. अमेरिकन एफसीसीने विल्सन व मिलग्रोम यांचे प्रारूप जसेच्या तसे स्वीकारले आणि अमेरिकेच्या इतिहासातील सर्वाधिक यशस्वी लिलाव या पद्धतीने करून दाखवला. या पद्धतीने स्पेक्ट्रम लिलाव

करून अमेरिकन सरकारने आजपर्यंत १२६ अब्ज डॉलर्स मिळवले आहेत.

अमेरिकेनंतर जगातील बहुतांश देशांनी थोड्याफार फरकाने हेच प्रारूप वापरून स्पेक्ट्रमचा लिलाव केला. भारतही याला अपवाद नाही. मार्च २०१५ मध्ये भारतात 2G व 3G स्पेक्ट्रमचा पुढील वीस वर्षांकरता लिलाव झाला. हा लिलाव १९ दिवस चालला. यात बोलीच्या ११५ फेऱ्या झाल्या. सरकारला या लिलावात एक लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या महसुलाची प्राप्ती झाली. तत्पूर्वी, युपीए सरकारच्या काळात लिलाव न करता दिल्या गेलेल्या 2G स्पेक्ट्रम परवान्याच्या बाबतीत (झालेल्या कथित गैरव्यवहारामुळे) असंतोषाचा हिवाळा निर्माण झाला नसता, असे मत अर्थतज्ज्ञ मॉंटेकसिंग अहलुवालिया यानी नोंदवले आहे ते यामुळेच.

नोबेल समितीच्या पत्रकार परिषदेत रॉबर्ट विल्सन यांना विचारण्यात आले की- आपले लिलावाविषयी एवढे मोठे योगदान आहे, तर लिलावात एखादी वस्तू आपण घेतली आहे का? यावर रॉबर्ट यांना काही सुचेनासे झाले. त्यांना वाटले की, आपण आजपर्यंत लिलावात काहीच खरेदी केले नाही. मात्र त्यांच्या पत्नीने असे सांगितले की, आपण ebay वर घेतलेले मोबाईल, बर्फात घालण्याचे बूट हे एक प्रकारे लिलावात विकत घेतले आहेत!

नोबेल पारितोषिकविजेते अल्विन रॉथ (हे पण रॉबर्ट विल्सन यांचेच विद्यार्थी) यांच्या मते, अर्थजगतातील रॉबर्ट आणि पॉल हे दोन महान जिवंत अर्थतज्ज्ञ असून लिलाव कसा करावा आणि लिलावाबद्दल आपले आकलन कसे असावे, याविषयी त्यांचे भरीव योगदान आहे. या पारितोषक समितीचे चेअरमन फिटर फेड्रिकसन यांच्या मते, या दोघांचे शोध मानवजातीच्या कल्याणासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.

असे असले तरी या दोघांना आपल्या संशोधनाच्या मर्यादा माहीत आहेत आणि सविनयाने ते कबूलही करतात. लिलाव सिद्धांत आणि आराखडे म्हणजे एखाद्या नदीवरील सुंदर असा पूल आहे. नदीवर पूल बांधता येतो, मात्र कोणत्याही नदीवर, कोणत्याही ठिकाणी सुंदर असा पूल बांधता येत नाही. तसे प्रत्येक ठिकाणी लिलाव कार्यक्षमपणे किंमतनिर्धारण करत असतोच असे नाही. जर सर्वांनी एकाच वेळी त्या वस्तूची मागणी केलेली नसेल, त्या वस्तू टिकाऊ स्वरूपाच्या असतील आणि त्यात वैयक्तिक सौदेबाजी शक्य असेल, तर लिलावपद्धत कार्यक्षमपणे किंमतनिर्धारण करत नाही, असे खुद्द पॉल सांगतात.

दक्षिण आफ्रिकेमध्ये २०१० ते २०१७ या काळात स्पेक्ट्रमचा लिलाव अयशस्वी ठरला. भारतामध्येही स्पेक्ट्रमचा लिलाव हा मर्यादित अर्थाने यशस्वी ठरला, तरी त्यातील विजेत्या कंपन्यांना कर्जाचे मोठे ओझे आज वाहावे लागत आहे. सरकारच्या धरसोड धोरणामुळे, प्रतिगामी करव्यवस्थेमुळे आणि विशिष्ट औद्योगिक घराण्यांना अधिक झुकते माप देण्याच्या प्रवृत्तीमुळे अनेक टेलिकॉम कंपन्यांनी आपला गाशा गुंडाळला. आज टेलिकॉम क्षेत्र हे प्रामुख्याने दोन ते तीन कंपन्यांच्या परिघापुरते मर्यादित झाले आहे, ते यामुळेच. लिलावातील विजेत्यांना सर्व लाभ मिळू शकतात आणि बोलीत मागे पडणाऱ्या कंपन्यांना आपला व्यवसायसुद्धा बंद करावा लागू शकतो. युनिसेफसारख्या संस्था लिलावाच्या माध्यमातून सर्वांत कमी किमतीला लस उपलब्ध करून देणाऱ्या कंपन्यांना आपले कंत्राट देतात. त्यामुळे स्पर्धक कंपन्या कमी होतात आणि भविष्यकाळात लशींच्या किमती वाढतात. म्हणून युरोपियन युनियनमधील अनेक देश एकापेक्षा अधिक कंपन्यांना लस थोडीशी महाग पडली तरी कंत्राटे विभागून देतात.

अशा प्रकारे लिलावाच्या मर्यादा असल्या तरी जसे विमानाच्या सर्व घडामोडींची माहिती असलेली काळी पेटी विमानात असते आणि अपघात झाल्यास तो का घडला याची माहिती त्यातून उपलब्ध होते; तसे मागणी-पुरवठ्यावर आधारित किंमतनिश्चितीची प्रक्रिया कशी कोलमडते, का कोलमडते, वस्तूंच्या किमती मागणी-पुरवठ्याने जरी ठरत असल्या तरी त्या नेमक्या कशा ठरतात- याविषयीची काळी पेटीच (Black Box) उघडून तपासली आहे. ही यंत्रणा लिलावाच्या माध्यमातून कशा पद्धतीने कार्य करते, ती गुंतागुंत सहजपणे उघडून दाखवली आहे. त्यांनाही आपल्या संशोधनाच्या मर्यादा माहीत आहेत. म्हणून विविध प्रकारे आपल्या सिद्धांतांना आणि प्रत्यक्षातील व्यवहारांना कसे निरामय करता येईल, यासाठी त्यांचे अविरत प्रयत्न पुढेही चालू राहणार आहेतच. शेवटी विज्ञानात अंतिम असे काहीही नसते असे मानले तरी त्यांचे योगदान मैलाचा दगड ठरेल, यात शंका नाही.

**प्रा.डॉ. संतोष मुळे,** उदगीर, जिल्हा लातूर.
Mob. 9423166450
m.santoshudgir@gmail.com

दृष्टिक्षेप

तेजस्विनी देसाई

# पदार्थ विज्ञानाचे नोबेल मिळालेली अँड्रिया गेझ

ग्रॅव्हिटी इंटरफेरोमीटर आणि चार शक्तिशाली दुर्बिणी वापरून बनवलेल्या १३० मीटर व्यासाच्या आभासी दुर्बिणीद्वारे केलेल्या निरीक्षणांमध्ये प्रकाशाच्या गतीच्या ३० टक्के गतीने जाणारे वायुगोळे सापडले, तेव्हा अत्युच्च ऊर्जा अवस्थेतील इलेक्ट्रॉन्सचा उद्रेक दिसून आला. हे प्रायोगिक निरीक्षण कृष्णविवरांच्या सिद्धांतावरून केलेल्या भाकिताशी जुळणारे होते. ऑक्टोबर २०१८ मध्ये सॅजिटारीस ए. हे कृष्णविवर आहे असे जाहीर करणारा शोधनिबंध प्रकाशित झाला. या संशोधनासाठी अँड्रिया गेझ, राईनहार्ड गेन्झल आणि 'कृष्णविवर आईन्स्टाईनच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांताचे भाकीत आहे' हे सांगणाऱ्या संशोधनासाठी रॉजर पेनरोज (Roger Penrose) यांना सन २०२० चा नोबेल पुरस्कार जाहीर झाला.

महिला वैज्ञानिकांच्या इतिहासात २०२० हे वर्ष सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल. सन २०२० या वर्षाचे नोबेल पुरस्कार जाहीर झाले आणि काय आश्चर्य? या यादीत चक्क चार महिलांनी स्थान पटकावले आणि त्यातही तीन महिला विज्ञान शाखेमधील. विश्वाचे रहस्य शोधण्याच्या ध्यासाने झपाटलेली आणि आपली आकाशगंगा 'मंदाकिनी'च्या केंद्रस्थानी असलेल्या कृष्णविवराचा वेध घेणारी वैज्ञानिक म्हणजेच सन २०२० ची पदार्थविज्ञान शास्त्रातील नोबेल विजेती अँड्रिया गेझ, पदार्थविज्ञान शाखेत हा पुरस्कार मिळवणारी केवळ चौथी महिला. (पेरोज व गेन्झल यांच्यासह तिला हा पुरस्कार मिळाला आहे.)

अँड्रियाचा जन्म १६ जून १९६५ रोजी अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात झाला. सुसान आणि गिल्बर्ट गेझ या दांपत्याची ही सुकन्या. ती लहान असतानाच गेझ परिवार शिकागो येथे स्थलांतरित झाला आणि तिचे बालपण शिकागोत गेले. चंद्रावर स्वारी करणाऱ्या अमेरिकेच्या 'अपोलो' या कार्यक्रमाने तिच्या बालमनावर भुरळ घातली आणि तिने अंतराळवीर होण्याचे ठरवले. तिच्या आईनेही तिच्या या स्वप्नाला पाठबळ दिले. पदवीच्या अभ्यासासाठी तिने प्रथम गणित या विषयाची निवड केली, पण पुन्हा बदलून पदार्थविज्ञान हा विषय घेतला. १९८७ मध्ये 'मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' मधून तिने भौतिकशास्त्राची पदवी घेतली. १९९२ मध्ये 'कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' मधून पीएच.डी. पदवी प्राप्त केली. डॉ. गेरी नौगेबाऊर (Dr. Gerry Neugebauer) हे तिचे मार्गदर्शक होते. अँड्रियाचे संशोधन समजून घेण्यापूर्वी खगोलशास्त्र विषयाच्या संशोधन इतिहासाचा थोडक्यात आढावा घेऊ.

माणूस आणि त्याची जिज्ञासा यांचा जन्म एकदमच झाला. जन्मापासूनच भोवतालच्या परिसराविषयी, निसर्गाच्या करामतींविषयी त्याला कुतूहल वाटू लागले. निरीक्षणांतून, अनुभवांतून तो स्वतःचे काही अंदाज बांधू लागला. जसजशा त्याच्या संवेदना विकसित होत गेल्या, तसे ग्रह-ताऱ्यांचे त्यांला आकर्षण वाटू लागले. सूर्यासारखे आणखी तारे, ग्रहमाला या ब्रह्मांडात अस्तित्वात आहेत का? सूर्याला एवढी ऊर्जा कुठून प्राप्त होते? सूर्याचा जन्म

कसा झाला ? मुळात या विश्वाचाच जन्म का व कसा झाला ? असे अनेक प्रश्न त्याला पडू लागले. ग्रह-ताऱ्यांच्या स्थानात होणाऱ्या नियमित बदलांविषयी त्याच्या मनात उत्सुकता निर्माण झाली. या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा त्याने आपल्या परीने प्रयत्न केला आणि त्यातून काही अद्‌भुत कथांनाही जन्म घातला. जेव्हा आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध नव्हते, तेव्हा अवकाशातील ग्रह-ताऱ्यांच्या बदलत्या स्थानांचे निरीक्षण करून, त्याला गणिताची जोड देऊन माणसाने अनेक गूढ रहस्ये उकलली आणि विश्वाविषयीच्या त्याच्या ज्ञानात भर पडत गेली. पुढे दुर्बिणीचा जन्म झाला आणि जणू त्याच्या ज्ञानाकांक्षेला पंख फुटले. आपला सूर्य हा एक सामान्य तारा असून, त्याच्या हजारपट तेजस्वी तारे अस्तित्वात आहेत, हे त्याला समजले. ताऱ्यांनासुद्धा जीवन-मृत्यू असतो. ताऱ्यांच्या जीवनचक्राचा मानवाने सखोल अभ्यास केला. ग्रह-तारे याबरोबरच धूमकेतू, न्यूट्रॉन स्टार अशा अनेक अद्भुत विभूती या विश्वात वास करून आहेत, हे त्याने प्रत्यक्ष पाहिले. विश्वाचे रहस्य शोधण्याचा त्याचा प्रयत्न हजारो वर्षांपासून अव्याहतपणे चालू आहे आणि तो पुढेही असाच चालू राहील. निरीक्षणातील सातत्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर काही कोड्यांची उकलही झाली. पण या विश्वाची रचना व कार्य इतकं चमत्कारिक आहे की, एक कोडे सुटले की दुसरे कोडे तयार होते, नव्हे पहिले कोडे दुसऱ्या कोड्यास जन्म देते.

'मंदाकिनी'च्या केंद्राचा वेध पूर्वीपासूनच माणूस घेत आला आहे. १७७५ मध्ये प्रसिद्ध तत्त्वज्ञ इमॅन्युएल कान्ट याने मंदाकिनीच्या केंद्रस्थानी अतिभव्य तारा असल्याचे प्रतिपादन केले होते आणि तो व्याध तारा (Sirius star) असल्याची शक्यता व्यक्त केली होती. १९१८ मध्ये प्रसिद्ध शास्त्रज्ञ हर्लोव शापले (Harlow Shapley) यांनी केंद्रस्थानी काही ताऱ्यांचे गोलाकार समूह असल्याचे सांगितले, पण वायूंच्या ढगांमुळे त्यांचे निरीक्षण करता येत नव्हते. ४० च्या दशकाच्या सुरुवातीला प्रसिद्ध शास्त्रज्ञ वॉल्टर बाडे (Walter Baade) यांनी १०० इंच दुर्बीण वापरून या केंद्राचे निरीक्षण केले असता, पृथ्वीशी एक अंश कोन करणारे विवर आढळले ज्यातून आत डोकावले असता ताऱ्यांचा मोठा गट केंद्राभोवती परिभ्रमण करताना आढळला. १९३१ मध्ये कार्ल जान्स्की (Karl Jansky) यांना दीर्घिकेच्या केंद्रातून धनु तारकापुंजच्या दिशेने रेडिओ लहरी उत्सर्जित करणारा स्रोत आढळला. हा रेडिओ स्रोत म्हणजे सॅजिटारीस ए. (Sagittarius A.). १९५८ मध्ये इंटरनॅशनल ॲस्ट्रॉनॉमिकल युनियनने सॅजिटारीस ए.चे स्थान दीर्घिकेचे केंद्रस्थान म्हणून निश्चित केले. नंतरच्या निरीक्षणातून असे आढळले की, हा स्रोत एकमेकांना जवळजवळ किंवा चिकटून असलेल्या अनेक घटकांचा बनला आहे. प्रसिद्ध खगोलवैज्ञानिक ब्रुस बलीक (Bruce balick) आणि रॉबर्ट ब्राऊन (Robert Brown) यांनी अतिशय तेजस्वी आणि आकाराने लहान असा घटक शोधला आणि त्याला सॅजिटारीस ए. असे नाव दिले. हा शोध शास्त्रज्ञांना उत्तेजित करणारा होता आणि शास्त्रानुसार उत्तेजित पातळीवर असलेल्या अणूला स्टारने दर्शवतात म्हणून हा सॅजिटारीस ए*. १९७४ मध्ये सर मार्टिन रीस (Sir Martin Rees) यांनी दीर्घिकेच्या केंद्रस्थानी अतिविशाल कृष्णविवर असण्याची शक्यता व्यक्त केली. कृष्णविवराचे वस्तुमान अतिभव्य असल्याने त्याची गुरुत्वाकर्षण शक्ती इतकी तीव्र असते की, त्यातून प्रकाशकिरणसुद्धा सुटत नाहीत. कृष्णविवराची कल्पना प्रथम जॉन मिशेल (John Michell) यांनी अठराव्या शतकात मांडली. अतिविशाल आणि अतिजड असे महाकाय तारे (सूर्याच्या जवळजवळ तिप्पट किंवा जास्त वस्तुमान असलेले तारे) त्यांच्या जीवनाच्या शेवटच्या टप्प्यात स्वतःच्याच गुरुत्वाकर्षणामुळे संकुचन पावतात. त्यांचा आकार लहान होऊन घनता वाढत जाते आणि शेवटी अंतःस्फोट होतो. शून्य आकार आणि घनता इतकी प्रचंड असते की, त्याच्या गुरुत्वाकर्षणातून प्रकाशकिरण निसटू शकत नाहीत. कृष्णविवराची घनता अनंत असते, म्हणून त्यांना आकारमान नसते. पण आइन्स्टाईनच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांतामधील समीकरण सोडवून श्वार्झचिल्डने (Schwarzschild) कृष्णविवराच्या आकाराची व्याप्ती सांगितली, त्यास श्वार्झचिल्ड त्रिज्या म्हणतात. पृथ्वीचे वस्तुमान जर एका साखरेच्या दाण्याएवढ्या आकारात एकवटले तर कृष्णविवर तयार होईल. म्हणजे पृथ्वीची श्वार्झचिल्ड त्रिज्या साखरेच्या एका दाण्याएवढी आहे.

तर १९९५ पासून अँड्रिया गेझ 'मंदाकिनी'च्या केंद्राचा अभ्यास करत आहे. उच्च विलगीकरण क्षमता असलेली दुर्बीण व इन्फ्रारेड स्पेक्ट्रोस्कॉपी वापरून सॅजिटारीस ए*.च्या सभोवती असलेल्या ताऱ्यांचा तिने अभ्यास केला. हवाई येथील केक ऑब्जर्वेटरीद्वारे अतिशय सूक्ष्म निरीक्षण केले. अतिशय उच्च विलगीकरण क्षमता असलेली जगातील सर्वात मोठी दुर्बीण वापरून जवळजवळ पंधरा वर्षे अँड्रिया

आणि तिच्या सहकाऱ्यांनी दीर्घिकेच्या केंद्रस्थानाविषयी निरीक्षणे नोंदवली. एखादे चित्र पाहताना त्याच्या जितके जवळ जाऊन पाहू, तसे त्या चित्रातील बारकावे समजतात; अगदी त्याचप्रमाणे मोठी दुर्बिण असेल तर, विलगीकरण क्षमता जास्त आणि मिळणारी प्रतिमाही सुस्पष्ट असते. अवकाशीय पोकळीत धूलिकण पसरलेले असल्याने दृश्य, अतिनील किंवा क्ष-किरण वापरून अवकाशीय वस्तूंचा अभ्यास करणे शक्य नसते. या अभ्यासासाठी अवरक्त किरणांचा वापर करतात. दीर्घिकेतून उत्सर्जित होणारा प्रचंड ऊर्जेचा झोत, त्याचे गतिमापन असे दर्शवते की, तेथे नक्कीच अतिशय प्रभावशाली असे काहीतरी असले पाहिजे, ज्यातून इतकी प्रचंड ऊर्जा बाहेर पडते. तसेच केंद्रातून येणारी प्रारणे इतर सामान्य ताऱ्यांमधून बाहेर पडणाऱ्या प्रारणांपेक्षा वेगळी होती.

अँड्रिया म्हणते, ‘दुर्बिणीतून अवकाशीय वस्तूंचा अभ्यास करणे म्हणजे वाहत्या पाण्याच्या तळाशी असलेल्या दगडांचा अभ्यास करण्यासारखे होते, त्याचे कारण आपले वातावरण. जीवसृष्टीसाठी अत्यावश्यक असलेले वातावरण खगोल वैज्ञानिकांसाठी मात्र खूप मोठा अडथळा असतो.’ या वातावरणाचा परिणाम म्हणून मिळणाऱ्या प्रतिमा अस्पष्ट असतात. केक ऑब्जर्वेटरी समुद्रसपाटीपासून १४ हजार फूट उंचीवर आहे. अँड्रिया नेहमी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याबाबत आग्रही असे. अँड्रियाला नोबेल पारितोषिक जाहीर झाल्यानंतर केक ऑब्जर्वेटरीचे संचालक हिल्टन लुईस (Hilton Lewis) यांनी अँड्रीयाविषयीची एक आठवण सांगितली आहे, ‘पंचवीस वर्षांपूर्वी एक अगदी नवागत खगोलतज्ज्ञ माझ्या कक्षात आली आणि तिने विनंतीवजा आदेश दिला की मंदाकिनीच्या केंद्रस्थानाचा अभ्यास करण्यासाठी आम्ही विकसित केलेल्या सॉफ्टवेअरमध्ये बदल केला पाहिजे.’ खरं तर हे सॉफ्टवेअर अतिशय परिश्रमपूर्वक विकसित केले होते आणि त्याचे संपूर्ण परीक्षणही झाले होते आणि आता या नवख्या तरुणीचे म्हणणे होते की, त्यात बदल करून मूलतः ज्या कामासाठी त्याची रचना केलेली नाही त्या कामासाठी तयार करावे. सहाजिकच हिल्टन यांची पहिली तीव्र प्रतिक्रिया होती ‘कदापि शक्य नाही.’ अँड्रियाला दुर्बिणीने घेतलेल्या प्रतिमांचे जलद वाचन करून त्या योग्य पद्धतीने जुळवणाऱ्या, (ज्यामुळे वातावरणाचा परिणाम कमी होईल, अशा) सॉफ्टवेअरची गरज होती. अर्थातच तिला नकार देता आला नाही. अँड्रिया तिच्या यशाचे श्रेय खगोलतज्ज्ञ आणि अभियंते यांच्यातील योग्य समन्वयाला देते. अभियंत्यांनी खगोलतज्ज्ञांच्या मागणीला प्रतिसाद देत त्यांच्या गरजेनुसार तंत्रज्ञान विकसित करण्याचे आव्हान समर्थपणे पेलले. लेसर तंत्रज्ञानाच्या साह्याने वातावरणाचा परिणाम वजा करून सुस्पष्ट प्रतिमा मिळवणे आता शक्य आहे.

२००२ मध्ये ‘मंदाकिनी’च्या केंद्रकाच्या प्रतिमांमध्ये पृथ्वीच्या तिप्पट वस्तुमान असलेला प्रचंड वायूगोळ्याचे (जी-२) सॅजिटारीस ए*.च्या प्रभावक्षेत्रात एक्रिशन झोनमध्ये रूपांतर होताना आढळले. सापेक्षता सिद्धांतानुसार हे विश्व म्हणजे अवकाश-काळ यांची गुंफण असलेली अवाढव्य जाळी असून तारे या जाळीवर वसलेले असतात. तारे जाळीवर ज्या ठिकाणी वसलेले असतात, त्या ठिकाणी जाळीला वक्रता प्राप्त होते. एका ताणलेल्या चौकोनी कापडावर चेंडू टाकला असता चेंडूच्या ओझ्यामुळे कापड खाली दबले जाते अगदी त्याचप्रमाणे अवकाश-काळ वस्त्राला वक्रता येते तारा जेवढा मोठा तेवढी वक्रता जास्त. कृष्णविवर म्हणजे तर तळ नसलेली विहीरच. या विहिरीपासून दूर असलेल्या वस्तूंवर त्याचा फारसा प्रभाव जाणवत नाही. पण या विहिरीच्या प्रभावक्षेत्रात सापडलेली वस्तू मात्र या विहिरीत ढकलली जाते आणि पुन्हा तिचा थांगपत्ता लागत नाही. पण जर ताऱ्याभोवती असलेले वायू आवरण या विहिरीच्या प्रभावक्षेत्रात आले तर, ते थेट विहिरीत न पडता अतिशय जलद गतीने सर्पिल मार्गाने ओढले जाऊन त्याचे तापमान वाढत जाते व या विहिरीभोवतीअतिशय तेजस्वी तबकडी तयार होते, हीच ती एक्रिशन डिस्क. या वायू गोळ्याच्या कक्षेवरून असे अनुमान निघत होते की जी-२ सन २०१४ मध्ये कृष्णविवराच्या सर्वाधिक जवळ जाईल. २००९ पासून त्याचे विदारण होताना दिसू लागले व शास्त्रज्ञांनी २०१४ पर्यंत जी-२ संपूर्णपणे लयाला जाईल, असे भाकीत केले. अँड्रियाने मात्र जी-२ हा तप्त वायूगोळा नसून तो एक तारा आहे, असे प्रतिपादन केले. तप्त वायूगोळा की तारा, यावरून शास्त्रज्ञांमध्ये मतभेद होते. २०१४ ला जेव्हा जी-२ केंद्राच्या सर्वाधिक जवळ जाईल तेव्हाच या वादविवादाचा निकाल लागेल, असे शास्त्रज्ञांना वाटत होते. जर तो वायू गोळा असेल तर तो नामशेष होईल, पण जर तो तारा असेल तर, तो सर्वाधिक जवळ असूनही त्याचे अस्तित्व टिकून राहील. तज्ज्ञांचे अनेक गट ही चित्तथरारक घटना ‘याची देही याची डोळा’ पाहण्यासाठी सज्ज होते. काही तरी अद्भुत घडेल आणि खूप मोठे माहितीचे घबाड हाती येईल, अशी आस

लावून ते बसले होते, पण काहीच घडले नाही. शास्त्रज्ञांनी याचे वर्णन 'न फुटलेले फटाके' असे केले आहे. ज्याअर्थी जी-२ हा पूर्ण सुरक्षित राहिला त्याअर्थी तो तारा असला पाहिजे असा निष्कर्ष सांगणारा शोधनिबंध अँड्रियाचा चमू युसीएलए ने मार्च २०१४ मध्ये प्रकाशित केला.

पंधरा वर्षांच्या निरीक्षणानंतर सॅजिटारीस ए*.चे वस्तुमान व त्रिज्या यांची किंमत काढली. वस्तुमान सूर्याच्या चाळीस लाखपट तर, आकारमान फक्त ४ कोटी ४० लाख किमी (सूर्यापासून पृथ्वीचे अंतर १५ कोटी किमी आहे). पृथ्वीपासून सॅजिटारीस एचे अंतर २६०० प्रकाशवर्ष इतके आहे. अँड्रिया आणि तिच्या चमूने या अभ्यासासाठी केंद्राभोवती फिरणाऱ्या ताऱ्यांच्या कक्षांचा अभ्यास केला. अँड्रियाने निरीक्षणासाठी एसओ २ या ताऱ्याची निवड केली. हा तारा केंद्राभोवती फक्त सोळा वर्षांत एक प्रदक्षिणा पूर्ण करतो. आता प्रश्न असा होता की, दीर्घिकेच्या केंद्रस्थानी असलेली ही अतिशय गहन, तेजस्वी वस्तू सॅजिटारीस ए*. कृष्णविवरच आहे का? हा एक अतिशय तेजपुंज तारा ही असू शकतो. इतरही अनेक पर्याय आहेत. पण राईनहार्ड गेन्झल (Reinhard Genzel) यांनी मॅक्स प्लॅन्क इन्स्टिटट्यूटमधून घेतलेली निरीक्षणे आणि अँड्रियाच्या गटाने नोंदवलेली निरीक्षणे इतर शक्यता फेटाळून लावतात. अँड्रियाच्या मते सध्याची निरीक्षणे हे कृष्णविवर आहे, यावर विश्वास ठेवण्यास भाग पाडतात.

ताऱ्यांच्या उत्क्रांती सिद्धांतानुसार दीर्घिकेच्या केंद्रासभोवती वयांनी ज्येष्ठ अथवा म्हातारे तारे असले पाहिजेत आणि तरुण तारे अथवा नुकतेच जन्माला आलेले बाल्यावस्थेतील तारे तेथे आढळणार नाहीत. कारण प्रचंड वस्तुमान व घनता असलेल्या केंद्रकासभोवती नवीन ताऱ्यांचा जन्म किंवा वाढीसाठी पोषक वातावरण नसते. ताऱ्याचा जन्म होण्यासाठी मोठा वायूगोळा निर्माण होण्याची आवश्यकता असते. हा नवनिर्मित वायूगोळा नाजूक प्रकृतीमुळे केंद्राच्या तीव्र गुरुत्वाकर्षणापुढे टिकू शकत नाही व तारा जन्म घेण्यापूर्वी केंद्र त्याला गिळून टाकेल. पण प्रायोगिक निरीक्षणे याच्या विरुद्ध होती. प्रत्यक्षात मात्र तरुण तारे विपुल प्रमाणात आढळले तर, ज्येष्ठ ताऱ्यांची वानवा होती. अँड्रिया गमतीने म्हणते, 'प्रायोगिक निरीक्षणे सिद्धांताशी न जुळणे म्हणजे खगोलशास्त्रज्ञासाठी नोकरीची हमी.' या विरोधाभासाचे स्पष्टीकरण अँड्रियाने देण्याचा प्रयत्न केला आहे. तिच्या मते, आता आपल्या निरीक्षणास आलेल्या ताऱ्यांची सुरुवात दुहेरी ताऱ्यांपासून पासून झाली. दुहेरी तारे कृष्णविवराच्या सान्निध्यात आल्यानंतर कृष्णविवराच्या प्रभावामुळे त्यांचे एकत्रीकरण होते व दोन ताऱ्यांचा मिळून एकच तारा बनतो. या मिलनावेळी काळ जणू पुन्हा नव्याने सुरू होतो आणि या नव्या तार्याचा नव्याने जन्म होतो. गुरुत्वीय लहरींचा शोधही या दुहेरी ताऱ्यांच्या संकल्पनेला पुष्टी देतो. या सिद्धांतानुसार ज्येष्ठ तारे संख्येने जास्त असायला हवेत पण, प्रत्यक्षात तसे दिसत नाही. याचे स्पष्टीकरणही अँड्रियाने दिले आहे. तिच्या मतानुसार या ज्येष्ठ ताऱ्यांच्या सभोवती हलकेसे आवरण असले पाहिजे. दुहेरी तारे एकमेकांत विलीन होताना हे आवरण ओढून घेत असावेत, परिणामी हे तारे मंद भासतात. ज्येष्ठ ताऱ्यांचा अभाव प्रत्यक्षात या दुहेरी ताऱ्यांच्या प्रक्रियेचा परिणाम आहे. ग्रॅव्हिटी इंटरफेरोमीटर आणि चार शक्तिशाली दुर्बिणी वापरून बनवलेल्या १३० मीटर व्यासाच्या आभासी दुर्बिणीद्वारे केलेल्या निरीक्षणांमध्ये प्रकाशाच्या गतीच्या ३० टक्के गतीने जाणारे वायुगोळे सापडले, तेव्हा अत्युच्च ऊर्जा अवस्थेतील इलेक्ट्रॉन्सचा उद्रेक दिसून आला. हे प्रायोगिक निरीक्षण कृष्णविवरांच्या सिद्धांतावरून केलेल्या भाकिताशी जुळणारे होते. ऑक्टोबर २०१८ मध्ये सॅजिटारीस ए*.हे कृष्णविवर आहे असे जाहीर करणारा शोधनिबंध प्रकाशित झाला. या संशोधनासाठी अँड्रिया गेझ, राईनहार्ड गेन्झल आणि 'कृष्णविवर आईन्स्टाईनच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांताचे भाकीत आहे' हे सांगणाऱ्या संशोधनासाठी रॉजर पेनरोज (Roger Penrose) यांना सन २०२० चा नोबेल पुरस्कार जाहीर झाला.

अँड्रियाचे संशोधन पुढे चालू आहे. अजूनही अनेक रहस्ये शोधायची आहेत. तिच्या मते आता उपलब्ध असलेली निरीक्षणे निश्चित अनुमान काढण्यासाठी अपुरी आहेत. कारण सध्या आपण फक्त अतिशय तेजस्वी ताऱ्यांचा अभ्यास करतो. तारकासमूह पूर्णपणे समजण्यासाठी सूर्यासारख्या सामान्य ताऱ्यांचा अभ्यास महत्त्वाचा आहे. या ताऱ्यांची प्रखरता कमी वस्तुमानामुळे जड ताऱ्यांच्या तुलनेत क्षीण असते. यासाठी तंत्रज्ञान आणखी सुधारणे आवश्यक आहे. अँड्रिया आपल्या व्याख्यानातून अतिशय साध्या-सोप्या, रसाळ भाषेत आपल्या प्रयोगांची माहिती देते. तिचे व्याख्यान ऐकणे ही खगोलप्रेमींसाठी मेजवानी असते.

**तेजस्विनी देसाई,** कोल्हापूर
tejaswinidesai1970@gmail.com
Mob.9421200644

इंग्रजी पुस्तक

अभय दातार

# ओबामांचे राजकीय व्यक्तिमत्त्व दाखवणारे पुस्तक

> पुस्तकातून ओबामांचे राजकीय व्यक्तिमत्त्व जे पुढे येते, ते संमिश्र स्वरूपाचे आहे. बोलण्यातून, भाषणांमधून आपल्याला आदर्शवादी ओबामा दिसतात; मात्र प्रत्यक्ष राजकारणात व्यवहारीपद्धतीने वागावे लागते आणि आदर्शवाद येथे उपयोगाला येत नाही, ही जाणीव झाल्याचे ते नोंदवतात. तशी जाणीव करून देणाऱ्या राजकारणाचा अनुभव असणारे सहकारीदेखील त्यांना भेटले. विविध कायदे मान्य करून घेण्याच्या हकिगतींमुळे व्यवहारी ओबामा पुढे येतात. राजकारणात आदर्शवाद आणि व्यवहारवाद या दोन्हींची गरज असते, हे खरेच आहे. पण व्यवहारवाद आणि संधिसाधूपणा यांच्यातील सीमरेषा धूसर असते, याची जाणीव असणारे ओबामादेखील पुस्तकातून पुढे येतात. वर उल्लेख केल्याप्रमाणे आपला पिंड आशावादी आहे, असे ओबामांनीच सांगितले आहे. पण त्यांनीच दिलेल्या तपशिलांचा आधार घेतला, तर आशावादाला फारशी जागा आहे, असे म्हणणे कठीण आहे.

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांचे राजकीय आठवणीपर आत्मवृत्ताच्या पहिल्या खंडातील– ‘ए प्रॉमिस्ड् लँड’मधील निवडक उतारे प्रकाशनापूर्वी विविध अमेरिकी माध्यमांमधून अलीकडेच झळकले. या प्रकाशनपूर्व प्रसिद्धीचा हवाला देत भारतीय माध्यमांनी त्याबद्दल बातम्या लिहिल्या आणि भारतात एकच खळबळ उडाली. त्याचे कारण अर्थातच होते काँग्रेसनेते राहुल गांधी यांच्याबद्दलची ओबामांची टिपण्णी. मात्र या गदारोळात महात्मा गांधींची शिकवण जगाला आजदेखील मार्गदर्शक आहे हे ओबामा यांचे मत, माजी पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांच्याबद्दल त्यांनी व्यक्त केलेला आदर आणि भारतीय जनता पक्ष मांडत असलेला राष्ट्रवाद समाजात दुही माजवणारा आहे, ही त्यांची मते दुर्लक्षितच राहीली. तसेच इंडोनिशियामध्ये बालपणी घालवलेल्या काही काळामध्ये त्यांचा रामायण आणि महाभारताशी परिचय झाला, हा उल्लेखदेखील नजरेआड झाला.

मात्र या पलीकडे ‘ए प्रॉमिस्ड् लँड’मध्ये भारताची फारशी चर्चा नाही. मग २०११ मध्ये ओसामा बिन लादेन याला ठार मारण्याच्या हकिगतीपर्यंतच्या काळाबद्दलचे हे पुस्तक एखाद्या भारतीयाने का वाचावे? तर केवळ बौद्धिक कुतूहल शमवण्यासाठी म्हणून किंवा जागतिक घडामोडींबद्दल जाणून घेण्यासाठी तर ते वाचावेच, पण त्याशिवाय अमेरिकेची राजकीय व्यवस्था कशी चालते याचे बारकावे जाणून घेण्यासाठीदेखील वाचावे.

पण त्याआधी थोडेसे पुस्तकाच्या शीर्षकाविषयी. ‘प्रॉमिस्ड् लँड’ ही संकल्पना ज्यू धार्मिक परंपरेतील आहे. इस्राईल अणि त्या देशाने ताब्यात ठेवलेला आपल्या सीमांलगतचे काही प्रदेश हा भूभाग ही तुमची हक्काची भूमी असेल, असे वचन ईश्वराने ज्यू धर्मीयांना दिले होते, असे ही परंपला मानते. सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी रोमन साम्राज्याच्या विस्ताराच्या रेट्यामुळे ज्यू धर्मीयांनी आपले स्वातंत्र्य गमावले आणि विविध कारणांमुळे ज्यूंना आपल्या भूमीतून स्थलांतर करावे लागले. पण ईश्वराने आपल्याला दिलेल्या भूमीवर पुन्हा आपली सत्ता कधी ना कधी पुनर्स्थापित होईल, हे स्वप्न ज्यू धर्मीयांनी पाहिले आणि ते

१९४८ मध्ये प्रत्यक्षात आले. ‘प्रॉमिस्ड् लँड’ची संकल्पना ख्रिश्चन परंपरेने मान्य केली आणि आफ्रिकेतून अमेरिकेत गुलाम म्हणून नेल्यानंतर ज्या कृष्णवर्णीयांचा ख्रिश्चन धर्माशी परिचय झाला, त्यांनीदेखील ही संकल्पना उचलली. ज्या भूमीत आपल्याला स्वातंत्र्य मिळेल आणि आपण मुक्तपणे जगू शकू, ती भूमी आपली ‘प्रॉमिस्ड् लँड’ असेल– अशी कृष्णवर्णीयांची धारणा बनली. ही अशी ‘प्रॉमिस्ड् लँड’ अमेरिका आहे, अशी धारणा बळावत गेली आणि तोच धागा उचलत ओबामा यांनी आपल्या पुस्तकाला तसे शीर्षक दिले आहे, हे पुस्तकाच्या आरंभी उद्धृत केलेल्या कृष्णवर्णीयांच्या एका धार्मिक गीतामुळे कळते. अमेरिका ही कृष्णवर्णीयांसाठी खरोखरीच ‘प्रॉमिस्ड् लँड’ आहे का किंवा होईल काय, याबद्दल अमेरिकेचे पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष काय म्हणतात, यासाठीदेखील हे पुस्तक वाचावे.

प्रभावी वक्तृत्व आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व लाभलेल्या ओबामांच्या या पुस्तकाची सुरुवात अपेक्षेप्रमाणे बालपणीच्या आणि तरुणपणीच्या हकिगतीने होते. आपली आई न डनहॅम आणि आजी–आजोबा माडेलिन ली पेन डनहॅम व स्टॅन्ले डनहॅम यांच्या संस्कारांमुळे आपल्यात कोणती मूल्ये रुजली आणि पुढील वाटचालीत या संस्कारांचा कसा उपयोग झाला, याची ती हकिगत आहे. कोलंबिया आणि हार्वर्ड येथील शिक्षण, वकिली व्यवसायात प्रवेश आणि १९९२ मध्ये मिशेल रॉबिन्सन यांच्याशी विवाह याबद्दल यापुढे येते. त्यानंतर सुरू झाला तो ओबामांचा राजकीय प्रवास आणि इथे खऱ्या अर्थाने पुस्तकाला सुरुवात होते.

काही काळ शिकागो शहरात तळ–पातळीवरचा कार्यकर्ता म्हणून काम केल्यानंतर कायद्याचे शिक्षण घेऊन ओबामा त्याच शहरात परत आले. विवाहानंतर विविध सामाजिक–राजकीय संघटनांच्या कार्यांत सक्रिय झाले. योगायोगाने त्यांना राजकीय संधी चालून आली. इलिनॉइस राज्याच्या विधी मंडळाच्या वरिष्ठ सभागृहाची– सिनेटची– एक जागा रिकामी झाली. तोपर्यंत त्यांना राजकारणाचा आणि विशेषतः शिकागोसारख्या वांशिक विविधता आणि ताण–तणाव असलेल्या शहरातील राजकारणाचा मोठा अनुभव नव्हता. तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव म्हणून ते शिकागो शहरातील सिनेटच्या मतदारसंघातून निवडून आले. या प्रचाराचे जे तपशील ओबामा यांनी दिले आहेत, त्यावरून स्थानिक पातळीवरच्या अमेरिकेतील



राजकारणाचे स्वरूप समजून घेता येते. इलिनॉइस सिनेटमधील अनुभवांबाबतीतील हकिगतीबद्दल असेच म्हणता येईल. एकूणच भावनिक मुद्दे तसेच धर्म-वंश यांसारखे घटक निवडणूक वर्तनावर प्रभाव टाकतात. मतदरांमधील उदासीनता आणि मुख्य म्हणजे अमेरिकेतील राज्य विधी मंडळांना आपापल्या मतदारसंघांच्या सीमारेषा निश्चित करण्याचा अधिकार असल्यामुळे, आपली सत्ता कायम राहावी यासाठी आपल्या सोईचे मतदारसंघ तयार करण्याची सत्ताधाऱ्यांची प्रवृत्ती याबद्दल माहिती मिळते. विधेयके मान्य करून घेण्यासाठी आमदारांकरवी करावी लागणारी देवाण-घेवाण, धोरण निर्मितीच्या प्रक्रियेवर संघटित आर्थिक हितसंबंधी गटांचा प्रभाव आदी बाबींचे जाता-जाता उल्लेख केले आहेत. (त्यांची अधिक माहिती द्यायला हवी होती, असे वाचताना वाटते.)

पुढे २००४ मध्ये ओबामा यांनी अमेरिकी संसदेच्या वरिष्ठ सभागृहाची- सिनेटची- निवडणूक लढवून राष्ट्रीय राजकारणात पदार्पण केले. या निवडणुकीचे आणि त्याच्या प्रचाराचे त्यांनी फारच मोजके वर्णन केले आहे. याचीदेखील अधिक माहिती द्यायला हवी होती, असे वाटते. राष्ट्रीय राजकारणातील पदार्पणाबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व भूमिकांचा जाणकारांवर प्रभाव पडू लागला आणि भावी राष्ट्राध्यक्ष म्हणून त्यांचे नाव घेतले जाऊ लागले. आपण निवडणूक लढवू इच्छितो, हे त्यांनी यथावकाश जाहीर केले आणि आपल्या भूमिका इतर स्पर्धकांपेक्षा कशा वेगळ्या आहेत, हे सांगत ते प्रचाराला लागले.

अमेरिकी राजकारणातील वैशिष्ट्य म्हणजे तेथील प्रायमरीज् हा प्रकार. तेथील राजकीय व्यवस्थेत देशव्यापी महत्त्वाचे दोनच पक्ष- डेमॉक्रॅटिक आणि रिपब्लिकन. एखाद्याला राजकारणात फार पुढे जायचे असेल, तर दोन्हींपैकी एका पक्षाकडून उमेदवारी मिळवावी लागते. पक्षदेखील उमेदवार कोण असावा, यासाठी पक्षांतर्गत निवडणुका घेतात. त्यामुळे २००८ मध्ये होणाऱ्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत ओबामांना आधी डेमॉक्रॅटिक पक्षातील इतर स्पर्धकांना पराभूत करायला लागणार होते. त्यातील दोन प्रमुख होते माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या पत्नी व न्यूयॉर्क राज्याच्या तत्कालीन सिनेटर हिलरी रॉडहॉम क्लिंटन आणि विद्यमान राष्ट्राध्यक्ष व तत्कालीन सिनेटर जोसेफ बायडेन.

या प्रचारात ओबामांनी तसा निसटताच विजय मिळविला, पण इतरांपेक्षा काही भूमिका वेगळ्या मांडल्या. अशा एका भूमिकेचा ओबामा यांनी उल्लेख केलेला आहे. ती म्हणजे- ओसामा बिन लादेन पाकिस्तानात आहे अशी पक्की माहिती हाती आली आणि त्यास ताब्यात घेण्यास अथवा ठार मारण्यास पाकिस्तान सरकार अनुत्सुक असेल किंवा तितकी त्याची क्षमता नसेल, तर आपण अमेरिकी बळाचा वापर करून ही कामगिरी पार पाडू. याबद्दल त्यांच्यावर टीका बरीच झाली, कारण तोपर्यंत तालिबान आणि अल-कायदा यांच्या विरोधातील लढाईत पाकिस्तान हा बरोबरीचा व भरवशाचा साथीदार आहे, अशीच अमेरिकेतील उच्च राजकीय वर्तुळात धारणा होती. वस्तुस्थिती तशी नाही, हे माहीत असूनदेखील असे चित्र उभे केले जात होते. ओबामांनी या धारणांना छेद दिला आणि २०११ मध्ये हे खरे करून दाखविले. अमेरिकेतील आरोग्यव्यवस्था आणि वित्तीय व्यवस्था याबाबतदेखील त्यांनी अशाच वेगळ्या भूमिका घेतल्या.

अमेरिकी राजकीय व्यवस्थेमध्ये सर्व पातळ्यांवरील पदांसाठी निवडणुका घेतल्या जातात. वर्तमानपत्रे, रेडिओ, दूरचित्रवाणी आणि आता समाजमाध्यमांमधून प्रचार चालतो. त्याला अब्जावधी डॉलर्स लागतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात निधी उभा करू शकणारीच व्यक्ती पुढे जाते. प्रचंड प्रमाणात लागणारा पैसा मिळविण्यासाठी मोठ्या रकमा देणाऱ्या देणगीदारांवर अवलंबून राहावे लागते. त्यातून वैध-अवैध मार्गाने देणग्या देणाऱ्यांचा प्रभाव वाढतो. ओबामांनी मोठ्या देणगीदारांना दूर लोटले नाही, पण मोठ्या संख्येने छोट्या रकमा गोळा करण्यावर भर दिला. त्यामुळे अनेकांचा राजकीय सहभाग वाढला. मोठ्या प्रमाणात छोट्या रकमा गोळा करून निवडणूक निधी उभा करणे, हे पैशांचा सुळसुळाट असलेल्या अमेरिकी (आणि भारतीयही) राजकाणातील विद्यमान प्रारूपाला पर्याय ठरू शकेल काय, या मुद्याची खरे म्हणजे सविस्तर चर्चा व्हायला पाहिजे होती. तसा प्रयोग करून विजयी झालेल्या ओबामांनी याचा परामर्श घ्यायला पाहिजे होता, ही अपेक्षा करणे रास्तच आहे.

राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतील विजय ते पदग्रहणाच्या काळातील हकिगती रंजक आहेत. ओबामांना डेमॉक्रॅटिक पक्षाची उमेदवारी मिळणार, हे जवळपास निश्चित होण्याच्या सुमारास प्रथेप्रमाणे त्यांना सरकारी

संरक्षण देण्यात आले. त्यांच्या संरक्षणयंत्रणेने आपापसातील सुरक्षेसंदर्भातील बातचितीसाठी ओबामांना 'Renegade' हे सांकेतिक नाव दिले. 'Renegade'चा अर्थ तत्त्वच्युत किंवा आपल्या मूळ विचारांशी कोणत्या तरी लाभासाठी द्रोह करणारी व्यक्ती. सुरक्षायंत्रणेने काही तरी सांकेतिक नाव द्यायचे म्हणून या शब्दाची निवड केली असेल. पण आपल्या राष्ट्राध्यक्षीय कारकिर्दीचे वर्णन करणाऱ्या पुस्तकातील एका विभागाला ओबामांनी 'Renegade' हेच नाव दिले. हे अनवधानाने झाले आहे, का ओबामा यातून काही सुचवू इच्छितात– हे सांगता येणार नाही.

तसेच इतर प्रगत देशांच्या तुलनेत अमेरिकेच्या केंद्र सरकारमध्ये परीक्षा–मुलाखत इत्यादी प्रक्रिया पार पाडून सरकारी नोकरीत नियुक्त झालेल्या अधिकारी–कर्मचाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे बऱ्याच वरिष्ठ प्रशासकीय पदांवर राष्ट्राध्यक्ष आपल्या पसंतीचे उमेदवार किंवा आपल्या पक्षाच्या समर्थकांची नेमणूक करतात. तसे करणे हा नव–निर्वाचित राष्ट्राध्यक्षांचा अधिकार आहे, असे मानले जाते. अर्थात सर्व वरिष्ठ आणि इतर महत्त्वाच्या पदांवरील नेमणुकांना सिनेटची मान्यता लागते आणि ती सौजन्याचा भाग म्हणून फारशी खळखळ न करता दिली जाते. त्या–त्या राष्ट्राध्यक्षांचा कार्यकाळ संपला की, त्यांनी नियुक्त केलेली मंडळी त्या वेळी पदावर असतील तर त्यांचादेखील कार्यकाळ संपतो. नवे राष्ट्राध्यक्ष नव्या नेमणुका करतात. या अशा मोठ्या संख्येने नियुक्त्या करताना राष्ट्राध्यक्षांवर पक्ष, नेते, मित्र–सहकारी, देणगीदार अशांचा दबाव येतो. त्याची चर्चा पुस्तकात केलेली नाही.

मात्र काही रोचक वाटतील असे तपशील आहेत. उदा.ओबामांनी टीम गायथनर यांचा वित्तीय क्षेत्रातील अनुभव पाहता, देशाचे अर्थमंत्रिपद त्यांना दिले. त्या वेळी गायथनर यांनी पदाच्या जबाबदारीची व्याप्ती पाहता कुटुंबाला फार वेळ देता येणार नाही, या कारणांसाठी प्रारंभी चक्क नकार दिला. पुढे त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली, हा भाग अलाहिदा. ओबामांनी राजकीय पक्षभेद बाजूला सारून मंत्रिमंडळातील नियुक्त्या केल्या. अफगाणिस्तानमधील परिस्थिती पाहता, मावळते संरक्षणमंत्री रॉबर्ट गेट्स यांना त्या पदावर कायम राहण्याची विनंती केली आणि त्यांनी ती स्वीकारली. तसेच रिपब्लिकन नेते रे ला हूड यांना वाहतूक मंत्रिपदी नेमले. या सगळ्यांचे भारतीय वाचकांना निश्चितच आश्चर्य वाटेल. पण पक्षभेदापलीकडे जाऊन देश चालविला पाहिजे, या ओबामांच्या भूमिकेशी हे सर्व सुसंगतच आहे.

याशिवाय आणखी एक तपशील रोचक आहे. सर्व सामान्य अमेरिकी नागरिक आपल्या राष्ट्राध्यक्षांना पत्र लिहितात. त्यातील निवडक दहा पत्रे आपल्याला रोज वाचायला दिली पाहिजेत, असे आदेश ओबामांनी दिले. पत्रलेखकांच्या समस्यांबाबत सरकार काय करीत आहे याची माहिती ओबामांनी लिहिलेल्या उत्तरात एकीकडे दिली जात असे; तर लगोलग संबंधित विभागाला पत्रलेखकांशी संपर्क साधून अडचण कशी दूर करता येईल, हे पाहण्याचे आदेश दिले जात असत. याची काही उदाहरणे दिली असती, तर बरे झाले असते.

पुस्तक वाचताना एक बाब खटकते. अमेरिकी समाज तसा अनौपचारिक. त्यामुळे व्यक्तींना संबोधण्यासाठी किंवा उल्लेख करण्यासाठी पहिल्या नावांचा (First names) वापर सर्रास होतो. तसा तो या पुस्तकातदेखील आहे. पण एकाच नावाच्या एकापेक्षा अधिक व्यक्ती असतील, तर वाचताना गोंधळ उडतो. सूचीत शोध घ्यायचा झाला तर ती आकारविल्हे आडनावांप्रमाणे. त्यामुळे नेमका कोणाचा उल्लेख होत आहे, हे काही वेळा कळतच नाही.

ओबामांनी आपल्या धर्मश्रद्धांविषयी फारसे उल्लेख केले नाहीत. आपण धर्मश्रद्ध ख्रिश्चन आहोत असे उल्लेख ते करतात. आपण फारसे नियमित चर्चमध्ये जात नसू, असाही एके ठिकाणी उल्लेख आहे. पारलौकिक बाबींना किंवा अंधश्रद्धांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वात थारा नसेल असे वाटत असतानाच, भाग्यकारक समजल्या जाणाऱ्या वस्तूंचा उल्लेख येतो. प्रचारादरम्यान चाहत्यांनी त्यांना–त्यांना भाग्यकारक वाटणाऱ्या त्यांच्या–त्यांच्या वस्तू ओबामांना भेट दिल्या. ते या चाहत्यांच्या श्रद्धेचे आणि ओबामांवरील निष्ठेचे द्योतक होते. त्यात गौतम बुद्धांची आणि हनुमानाची छोटी मूर्ती, छोटे दगड इत्यादी वस्तू होत्या. दररोज त्यातील पाच–सहा वस्तू ओबामा आपल्या खिशात टाकत असत. या सवयीचे ओबामा यांनी दिलेले स्पष्टीकरण मुळातूनच वाचण्यासारखे आहे. राष्ट्राध्यक्ष झाल्यावर ही सवय कायम राहिली का, याचा उल्लेख नाही.

प्रचारादरम्यान त्यांनी केलेल्या एका भाषणानंतर झालेल्या प्रश्नोत्तराची हकिगत रोचक आहे. त्यांनी दिलेल्या उत्तराला एका उदारमतवादी (म्हणजे आपल्या परिभाषेत

डाव्या-पुरोगामी) मुक्त पत्रकाराने ठळक प्रसिद्धी दिली. ओबामा यांनी आपण दिलेल्या उत्तराला २००८ च्या प्रचारातील सर्वांत मोठी चूक संबोधले आहे. पण त्याबद्दलचे त्यांचे निरीक्षण महत्त्वाचे आहे. त्यांच्या निरीक्षणाचा मथितार्थ असा की, अमेरिकेतील उदारमतवादी पत्रकार-स्तंभलेखक हे विरोधी राजकीय नेत्यांपेक्षा आपल्या समविचारी नेत्यांवर सडकून टीका करण्यासाठी अधिक चटकन तयार होतात. याचाच अर्थ, अमेरिकेतील उजवी मंडळी आपल्या समविचारी नेत्यांवर टीका करण्यास चटकन तयार होत नाहीत किंवा उत्सुक नसतात (या उल्लेखावरून आपल्याकडील स्वतःला पुरोगामी समजणाऱ्या मंडळींमध्ये जरासे मतभेद झाले किंवा थोडी वेगळी भूमिका मांडली की, एकमेकांना छुपे संघी असल्याचा आरोप करण्याची जी स्पर्धा लागली आहे, त्याची आठवण होते).

पुस्तकाच्या धोरणनिर्मितीच्या प्रक्रियेबाबत हकिगतींनी बरीच जागा व्यापली आहे. २००८ च्या वित्तीय संकटाला दिलेला प्रतिसाद, वैद्यकीय उपचारांसाठीच्या धोरणात्मक चौकटीची फेरमांडणी इत्यादी बाबी आणि त्यासंदर्भातील कायदेनिर्मितीच्या प्रक्रियेचे तपशील अमेरिकी राजकीय व्यवस्थेवर बराच प्रकाश टाकतात. संसदीय शासनपद्धतीत संसदेतील बहुमताच्या जोरावर कायदे मान्य करून घेणे सरकारला सहज शक्य असते. तसे राष्ट्राध्यक्षीय पद्धतीत होत नाही, कारण त्यात संसद आणि राष्ट्राध्यक्ष यांच्यात संसदीय शासनपद्धीत असतो तसा थेट संबंध नसतो. त्यामुळे ओबामांना आपल्याला हव्या त्या कायद्यांना संसदेची मान्यता मिळविण्यासाठी संसदेतील स्वपक्षीय आणि विरोधकांची बऱ्यापैकी मनधरणी करावी लागली. प्रसंगी तडजोड करून टीकेचे धनीदेखील व्हावे लागले. या सर्व वाटाघाटींच्या आणि देवाण-घेवाणींच्या हकिगती रोचक आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष भले जगात कोठेही ड्रोनकरवी हल्ल्याचे आदेश देऊ शकत असतील, पण एखाद्या अडेलतट्टू किंवा तत्त्वनिष्ठ खासदारापुढे त्यांचे काहीच चालत नाही. सत्तेच्या मर्यादा इथे स्पष्ट होतात.

अपेक्षेप्रमाणे पुस्तकात जागतिक राजकारणाची चर्चा आहे, विविध देशांच्या राजकीय नेत्यांबाबत त्यांची निरीक्षणे दिलेली आहेत. पश्चिम आशियातील शांतताप्रक्रिया, लिबियातील हस्तक्षेप, रशियाशी अण्वस्त्रांसंदर्भातील वाटाघाटी आणि इराणबाबतचे धोरण यांची बरीच चर्चा आहे. मात्र चीनबद्दलच्या धोरणाची अधिक विस्ताराने चर्चा व्हायला हवी होती, विशेषतः गेल्या वर्षभरातील विविध घडामोडी पाहता. चीन दौऱ्याच्या हकिगतीचे काही तपशील थक्क करणारे आहेत. भेटीला आलेल्या परदेशी शिष्टमंडळांवर पाळत ठेवली जाते आणि त्याबद्दल पाहुणेमंडळी सावधगिरी बाळगतात, यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. मात्र हॉटेलच्या खोलीत विसरलेली कागदपत्रे घेण्यासाठी व्यापारमंत्री गॅरी लॉक तेथे परत येतात, तेव्हा तेथे हॉटेलच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांशिवाय आपल्या सामानाची आणि कागदपत्रांची झडती घेणारे लोक आढळतात. 'तुम्ही काय करत आहात?' असे लॉक यांना विचारतात. ही मंडळी काहीच न बोलता बाहेर पडतात. अमेरिकी यंत्रणेकडून याचा फार बाऊ केला जात नाही. यावरची ओबामांची टिपण्णी काय- तर आम्हीदेखील अशी हेरगिरी करतोच की! आणि शिवाय चीनशी आम्हाला व्यापार वाढवायचा आहे.

सौदी अरेबियातील धार्मिक कट्टरता आणि बंदिस्त समाजव्यवस्था यांच्यावर टीकात्मक निरीक्षणे नोंदवताना या सगळ्याच्या बळकटीकरणाला असलेल्या अमेरिकेच्या पाठबळाबाबत ओबामा काहीच भाष्य करीत नाहीत, हे खटकते. पाकिस्तान-तालिबान-ओसामा बिन लादेन या संदर्भातील चर्चा वाचल्यावर ओबामा भाबडे आहेत की काय, असा प्रश्न पडतो. लादेनचे पाकिस्तानातील वास्तव्य व तालिबानच्या पाकिस्तानातील हालचाली याला केवळ पाकिस्तानच्या शासकीय यंत्रणेतील काही घटकांचा पाठिंबा होता आणि हे सर्व काही पाकिस्तानचे अधिकृत धोरण नव्हते, या ओबामांच्या विवेचनावर कोणाचाच विश्वास बसण्याची शक्यता नाही. बरे, त्यांनी हातचे राखून लिहिले आहे असे म्हणायचे, तर पद सोडल्यानंतर चार वर्षे उलटून गेल्यानंतर असे करण्याचे काहीच कारण नाही. एकूणच काय तर- जागतिक राजकारणातील अमेरिकेची भूमिका जगाच्या भल्यासाठीच आहे, अशी त्यांची धारणा आहे आणि त्याच्याशी संपूर्णतः सहमत होणे कठीण आहे. मात्र शांततेचा नोबेल पुरस्कार मिळण्याइतपत आपण काहीच केलेले नाही, ही ओबामांची कबुली लक्षणीय अशीच म्हणावी लागेल.

ओबामांच्या विवेचनात अनेक मुद्दे अस्पष्ट राहतात किंवा त्यांची पुरेशी चर्चा केलेली नाही. अमेरिकेत कृष्णवर्णीय आणि श्वेतवर्णीयांमधील सद्‌भवनेचा अभाव

आणि द्वेषाची भावना पूर्वीइतकी तीव्र नसली तरी नाहीशी झालेली नाही. ही दरी संपुष्टात आणणे हा आपल्या राजकारणाचा हेतू आहे आणि त्याबद्दल आपण आशावादी आहोत, असे ते सांगतात. पण त्यांनीच दिलेल्या तपशिलाचा आधार घेतला, तर ही दरी सांधण्यातील अडचणीच पुढे येतात. श्वेतवर्णीयांकडून आपल्या उमेदवारीला झालेल्या विरोधात किंवा आपल्या विरोधात झालेल्या मतदानाच्या मागे हा कृष्णवर्णीय माणूस आम्हाला नकोच- ही वांशिक द्वेषाची भावना होती, हे ओबामाच मान्य करतात. शिवाय या द्वेषाच्या अस्तित्वाची जाणीव इतकी खोलवर रुजलेली होती की, कृष्णवर्णीय माणूस आपला राष्ट्रध्यक्ष होत आहे या भीतीपोटी एखादा श्वेतवर्णीय माथेफिरू ओबामांची हत्या करील, अशी शंका काही कृष्णवर्णीय सहकाऱ्यांनी खुद्द ओबामांकडे नोंदविली. शिवाय ओबामा हे जन्माने अमेरिकी नागरिक नाहीत म्हणून ते राष्ट्राध्यक्ष होण्यास पात्रच नाहीत, या आक्षेपामागेदेखील वांशिक द्वेष हे एक मुख्य कारण होते, हेदेखील ओबामा मान्य करतात. त्यांच्या अनेक धोरणांना होणाऱ्या विरोधामागेदेखील हे एक कारण होते, असे ते नमूद करतात.

त्यांच्या कारकिर्दीमुळे कृष्णवर्णीयांच्या परिस्थितीत काय आणि कितीसा फरक पडला, या स्वकीयांकडून घेतल्या गेलेल्या आक्षेपाबद्दल ओबामा फारसे काही म्हणत नाहीत. ते आफ्रिकेतून सक्तीने आयात केलेल्या गुलामांचे वंशज नसून सुशिक्षित कृष्णवर्णीय केनियन वडील व श्वेतवर्णीय आई यांचे अपत्य असल्यामुळे ते मिश्रवंशीय आहेत आणि खऱ्या अर्थाने आफ्रिकन-अमेरिकन नाहीत, या कुजबुजीबद्दलदेखील ते काही बोलत नाहीत. ओबामांचे पूर्ण नाव बराक हुस्सेन ओबामा. पुस्तकात काही ठिकाणी या पूर्ण नावाचा एखाद-दुसरा उल्लेख आहे. या नावामुळे ओबामा मुस्लिम आहेत, असा आरोप करणे विरोधकांना सोपे गेले. खुद्द ओबामा पुस्तकाच्या मुखपृष्ठावर आपले नाव केवळ 'बराक ओबामा' असे देतात, तर सूचीत 'बराक एच. ओबामा' असा उल्लेख आहे. आपल्या या काहीशा आगळ्या-वेगळ्या नावाच्या संक्षेपाबद्दल ओबामा काहीच उल्लेख करत नाहीत.

पुस्तकातून ओबामांचे राजकीय व्यक्तिमत्त्व जे पुढे येते, ते संमिश्र स्वरूपाचे आहे. बोलण्यातून, भाषणांमधून आपल्याला आदर्शवादी ओबामा दिसतात; मात्र प्रत्यक्ष राजकारणात व्यवहारीपद्धतीने वागावे लागते आणि आदर्शवाद येथे उपयोगाला येत नाही, ही जाणीव झाल्याचे ते नोंदवतात. तशी जाणीव करून देणाऱ्या राजकारणाचा अनुभव असणारे सहकारीदेखील त्यांना भेटले. विविध कायदे मान्य करून घेण्याच्या हकिगतींमुळे व्यवहारी ओबामा पुढे येतात. राजकारणात आदर्शवाद आणि व्यवहारवाद या दोन्हींची गरज असते, हे खरेच आहे. पण व्यवहारवाद आणि संधिसाधूपणा यांच्यातील सीमरेषा धूसर असते, याची जाणीव असणारे ओबामादेखील पुस्तकातून पुढे येतात.

वर उल्लेख केल्याप्रमाणे आपला पिंड आशावादी आहे, असे ओबामांनीच सांगितले आहे. पण त्यांनीच दिलेल्या तपशिलांचा आधार घेतला, तर आशावादाला फारशी जागा आहे, असे म्हणणे कठीण आहे. हा आशावाद काही ठिकाणी भाबडा वाटतो. सर्वसामान्य अमेरिकी नागरिक आणि विशेषतः कृष्णवर्णीयांसाठी 'प्रॉमिस्ड् लँड' ही नजरेच्या टप्प्यातदेखील नाही, असेच म्हणावे लागेल.

ताजा कलम -

राहुल गांधींबद्दल टिपण्णी केल्यामुळे ओबामांनी नरेंद्र मोदींबद्दल काय म्हटले आहे, याची अनेकांना उत्सुकता होती. मात्र पुस्तक २०११ पर्यंतच्या काळाबद्दल आहे, त्यामुळे मोदींचा त्यात उल्लेख नसणे स्वाभाविक आहे. पण २०१५ मध्ये 'टाइम' या नियतकालिकांमध्ये ओबामांनी मोदी यांना Reformer-in-chief असे संबोधून कौतुकच केले होते. मात्र भाजपचा राष्ट्रवाद समाजात दुही निर्माण करणारा आहे, असे 'ए प्रॉमिस्ड् लँड'मध्ये विधान केले आहे. त्यामुळे त्यांचे मोदींबद्दल मत काय असेल, याची भक्त-समर्थक व विरोधक यांना उत्सुकता असेलच. परंतु त्यासाठी येऊ घातलेल्या दुसऱ्या खंडाची वाट पाहावी लागेल.

**अभय दातार,** नांदेड
abhaydatar@hotmail.com

ओबामा, बराक- 'ए प्रॉमिस्ड् लँड', व्हायकिंग, २०२० (केवळ भारतीय उपखंडात विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या आवृत्तीची किंमत-रु. १,९९९)

नवे पुस्तक

वासंती दामले

# विसंगती व सुसंगती समजून घेण्यासाठी उपयुक्त पुस्तक

या पुस्तकाचे प्रयोजन सांगताना संपादक सन २००० मधील एक प्रसंग उल्लेखतात. तेव्हापासून हा विषय त्यांच्या मनात घोळत होता. हे पुस्तक करायला घेईपर्यंत मराठीत नवमध्यमवर्गाची चिकित्सा करणारे एकत्रित लेखन प्रसिद्ध झाले नव्हते. मध्यमवर्गाची व्याख्या कशी करायची याचा ऊहापोहही प्रस्तावनेत केला आहे. म्हणजे उत्पादनाची साधने ज्यांच्यापाशी आहेत असा कारागीरवर्ग, डॉक्टर, वकील असे व्यावसायिक व शिक्षक, सरकारी किंवा खासगी आस्थापनांत नोकरी करणारे नोकरपेशा लोक– हे सर्वसाधारणपणे मध्यमवर्गात मोडतात. अर्थात मुख्य निकष आर्थिक आहे आणि किती उत्पन्न असले म्हणजे मध्यमवर्गीय मानावे, हे निकष वेळोवेळी बदलत असतात. तसेच आजचा मध्यमवर्गीय अनेक स्तरांवर विभागला गेला आहे. म्हणजेच त्याचे स्वरूप आणखी व्यामिश्र झाले आहे. म्हणूनच या पुस्तकाची विभागणी त्यांनी पाच भागांत केली आहे.

अवाढव्य वाढलेल्या भारतातील मध्यमवर्गाला समजून घेण्यासाठी 'मध्यमवर्ग : उभा, आडवा, तिरपा' या राम जगताप यांनी संपादित केलेल्या पुस्तकात खरोखरच उभी, आडवी व तिरपी चिकित्सा करण्याचा प्रयत्न केला आहे. ही चिकित्सा वाचताना कधी कधी हा मध्यमवर्ग समजल्यासारखा वाटतो, तर कधी कधी तो समजण्यापलीकडील वाटत रहातो. हेही लक्षात घेतले पाहिजे की, मुख्यत: महाराष्ट्रीय मध्यमवर्गाचे चित्रण व विश्लेषण या पुस्तकात आहे.

भारतात मध्यमवर्गाचा उगम ब्रिटिशराज सुरू झाल्यानंतरच झाला आहे. नव्या राज्यकर्त्यांना एवढ्या मोठ्या देशावर आपले राज्य चालवण्यासाठी त्यांचे कायदेकानून, पद्धत, तसेच त्यांची भाषा जाणणारे काही चाकरमानी स्थानिक रयतेपैकीच असणे गरजेचे होते. म्हणून राज्यकर्त्यांच्या गरजा लक्षात घेऊन पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीचा अंगीकार केला गेला. त्यातून कारकून, युद्धात इंग्रजांच्या वतीने लढण्यासाठी फौजी आदी तयार झाले.

भारतीय समाजातील जातवास्तव असे होते की, उच्च जातींची आकांक्षा उच्च स्थाने भूषवण्याचीच होती. त्यामुळे नव्या व्यवस्थेत आवश्यक असणारे वकील, डॉक्टर्स हे व्यवसाय उच्च जातींनी पटापट अंगीकारले. भारतात औद्योगिक प्रशाला काढण्यास इंग्रजांचा कट्टर विरोध होता. पण स्थानिक जनतेची मागणी म्हणून काही थोड्या ठिकाणी अभियांत्रिकी महाविद्यालये निघाली. तिथेही उच्च जातींनी शिक्षण घेऊन त्याही क्षेत्रात नोकऱ्या पटकावल्या होत्या.

स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा एक छोटासा मध्यमवर्ग होता; जो बराचसा उच्च जातीय होता. मुंबईवासी इतर जाती, जसे की– पाठारेप्रभू, पाचकळशी, चौकळशी वगैरे– जातींतही उच्चशिक्षित मध्यमवर्गीय समाज निर्माण झाला होता. पण त्यांची संख्या अल्प होती. उच्च जातीय मध्यमवर्गाचे नातेवाईक खेडोपाडी होते, पण त्यांची आकांक्षा उच्चशिक्षण घेण्याचीच होती. त्यासाठी शहरात येऊन, आपल्या मध्यमवर्गीय नातेवाइकांकडे वाराने जेवून आपले शिक्षण पूर्ण करण्याची एका अर्थाने चळवळच सुरू होती. गांधीहत्येनंतर झालेल्या जाळपोळीनंतर व 'कसेल त्याची

जमीन’ या जमीन सुधारणेनंतर या चळवळीने वेग पकडला. शहरातील निम्नवर्गीय उच्च जातीयही या ‘विद्याभिलाषी’ मुलांना निदान आठवड्यातून एकदा जेवू घालणे आपले कर्तव्य समजत होता.

अशा तऱ्हेने उच्च जातीय मध्यमवर्गाच्या प्रमाणात झपाट्याने वाढ होत गेली. भारताच्या बाबतीत आणखी एक बाब जाणवते. ती म्हणजे, मध्यमवर्ग किंवा कामगारवर्ग शहरात जरी आला तरी त्याचे आपल्या कुटुंबाशी व पर्यायाने जातीशी संबंध कधीही तुटले नाहीत. म्हणूनच आज कोरोनाच्या साथीतही अनेक लोकांनी गावी धाव घेतली. हळूहळू ज्यांच्यासाठी गावी काहीच नव्हते, उदा.– ब्राह्मण किंवा सीकेपी– त्यांना शहरात येऊन समाजसुधारणेत अग्रभाग घेणे सुलभ गेले. मध्यमवर्गावर त्यांची सांस्कृतिक पकड घट्ट होती. ऐंशीच्या दशकापर्यंत ही साधी, सरळ मध्यमवर्गीय संस्कृती महाराष्ट्रात होती. याचा विस्तृत आढावा राम जगताप यांनी त्यांच्या प्रस्तावनेत घेतला आहे. कौतुक वाटले ते म्हणजे– त्यांनी हा आढावा हिंदी, इंग्रजी व अर्थात मराठीत कवितांसग्रह, आजवर काय लिहिले गेले आहे, त्या सर्व लिखाणाचा घेतला आहे.

नव्वदच्या आर्थिक सुधारणांनंतर सगळेच बदलले. पुस्तकात घेतले गेलेले लेख मुख्यतः या नवमध्यमवर्गावर आहेत. प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे फक्त शेजवलकरांचा लेख जुना आहे. त्याचे कारणही संपादकाने दिले आहे. ते म्हणजे, शेजवलकरांनी पुराव्यांसहित केलेली सविस्तर मांडणी की, समाजाचे नेतृत्व करण्याची कुवत मध्यमवर्गात असते म्हणून त्यांची सामाजिक नीतिमत्ता तपासण्याची गरज असते, ही होय. त्यांची संख्या जरी शेजवलकरांच्या वेळेस आठ–नऊ टक्के व आज २० टक्क्यांच्या वर असली तरी त्यांचे सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रांत अनुकरण समाजात मोठ्या प्रमाणावर होत असते. त्यांच्या या मताशी ज्ञानदा देशपांडे व अभय टिळक सहमत होताना दिसतात.

या पुस्तकाचे प्रयोजन सांगताना संपादक सन २००० मधील एक प्रसंग उल्लेखतात. तेव्हापासून हा विषय त्यांच्या मनात घोळत होता. हे पुस्तक करायला घेईपर्यंत मराठीत नवमध्यमवर्गाची चिकित्सा करणारे एकत्रित लेखन प्रसिद्ध झाले नव्हते. मध्यमवर्गाची व्याख्या कशी करायची याचा ऊहापोहही प्रस्तावनेत केला आहे. म्हणजे उत्पादनाची साधने ज्यांच्यापाशी आहेत असा कारागीरवर्ग, डॉक्टर, वकील असे व्यावसायिक व शिक्षक, सरकारी किंवा




खासगी आस्थापनांत नोकरी करणारे नोकरपेशा लोक– हे सर्वसाधारणपणे मध्यमवर्गात मोडतात.

अर्थात मुख्य निकष आर्थिक आहे आणि किती उत्पन्न असले म्हणजे मध्यमवर्गीय मानावे, हे निकष वेळोवेळी बदलत असतात. तसेच आजचा मध्यमवर्गीय अनेक स्तरांवर विभागला गेला आहे. म्हणजेच त्याचे स्वरूप आणखी व्यामिश्र झाले आहे. म्हणूनच या पुस्तकाची विभागणी त्यांनी पाच भागांत केली आहे – १. उदय, वाढ आणि विस्तार, २. जीवनशैली आणि मूल्यबदल, ३. आव्हाने व आवाहने, ४. राजकीय जाणीवजागृती आणि ५. नवमध्यमवर्ग व त्याचे राजकारण. या प्रत्येक विभागात प्रत्येकी साधारणपणे पाच–सहा लेख आहेत.

‘उदय, वाढ आणि विस्तार’ हा पहिला विभाग वाचताना स्पष्ट होत जाते की, मूलतः छोटा व आकांक्षांनीही छोटा असणारा मध्यमवर्ग मनात मात्र अनेक गंड ठेवून जगत होता. नव्वदच्या दशकापर्यंत महाराष्ट्रातील मध्यमवर्गात भ्रष्टाचार करण्याबद्दल मनात एक प्रकारची भीड असायची. ज्या प्रकारे उत्तरेत ‘उपर की आमदनी’विषयी उघड चर्चा असायची, तशी इकडे असली तरी ती दबक्या आवाजात असायची. आकर्षण असावे, कारण महाराष्ट्रातील समाज अगदी झपाट्याने उत्तरेच्या खांद्याला खांदा भिडवू शकेल, इतका भ्रष्टाचारी झाला.

दुसरा गंड होता, तो इंग्रजी फाडफाड बोलता न येण्याचा! तोही मराठी शाळांकडे पाठ फिरवून, कुठल्याही इंग्रजी शाळेत घालून आणि त्यामुळे ना मराठी संस्कृतीशी नाळ जोडलेली, ना उत्तम इंग्रजी वाचणारी पिढी निर्माण करून साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र संगणकशास्त्राने

मराठी मध्यमवर्गाला चांगली साथ दिली. पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगाने सरकारी नोकरीत असणाऱ्या मध्यमवर्गाच्या आवाक्यात अनेक गोष्टी आल्या. जशा की– परदेशप्रवास, सहजगत्या विमानप्रवास, घरात चारचाकी येणे, तरुण वयातच कमीत कमी 'टू-बेडरूम किचन'ची सदनिका खरेदी करणे शक्य होणे इत्यादी.

नीरज हातेकर व राजन पडवळ म्हणतात की, 'यूपीए सरकारच्या आर्थिक यशाने त्या सरकारचा बळी घेतला.' त्याची त्यांनी अनेक कारणे दिली आहेत. त्यातील महत्त्वाचे वाटले ते म्हणजे– आर्थिक वाढीला काबूत ठेवण्यासाठी जी संस्थात्मक बांधणी किंवा बदल होणे आवश्यक होते, ते बदल यूपीए सरकार करू शकले नाही किंवा त्यांचे त्याकडे दुर्लक्ष झाले. याच विभागात विनोद शिरसाठ, सुहास पळशीकर व पवन वर्मा यांचा अनुवादित, हेही लेख आहेत.

या तिन्ही लेखांची मांडणी मध्यमवर्गावर टीका करणारी आहे. सर्वसाधारणपणे या तिघांचे म्हणणे थोडक्यात सांगायचे तर, उदारीकरणाचे लाभ उठवून या मध्यमवर्गाकडे समृद्धी आली आहे. समाजातील इतर सुधारणा आपोआप व्हाव्यात, अशी अपेक्षा असल्यासारखी त्यांची वर्तणूक आहे. म्हणजे थोडक्यात, इथून पुढे भारताला प्रगती साध्य करायची असेल तर शिक्षणावरील बजेट वाढवायला हवे, तरच दर्जेदार शिक्षण मिळून प्रशिक्षित कामगार किंवा तज्ज्ञ समाजाला मिळतील. एकीकडे त्यागाचे आकर्षण, जुन्या मूल्यांचे आकर्षण बाळगायचे, पण आपलीच मुलेबाळे जुन्या पिढीच्या त्यागाबद्दल अज्ञानी असून त्याची खंतही बाळगायची नाही; चंगळवादाला नावे ठेवत आपणही तोच मार्ग अनुसरायचा– अशी दुटप्पी जीवनपद्धती या मध्यमवर्गाची झाली आहे.

पवन वर्मा म्हणतात की, सामाजिक कार्यासाठी यांच्याकडे पैसा नसतो. पण हे सर्वस्वी खरे नाही. कारण समाजातील श्रीमंतवर्ग सगळ्याच राज्यकर्त्यांना वर्गणी देऊन खूश ठेवण्याचा प्रयत्न करतो. पण मध्यमवर्गाला जर आपला पैसा योग्य ठिकाणी व योग्य कार्यासाठी पोचेल याची खात्री असली, तरच तो पैसा देतो. या नवमध्यमवर्गातील हा सुब्रह्मण्यम, हा नायर, हा माथुर, तर हा मल्होत्रा– हे भेद आजच्या घडीला मिटले आहेत.

शिरसाठ म्हणतात की– पन्नास-साठीची पिढी अनेक गोष्टी फार विश्वासाने नाही, तरी स्वेच्छेने, वाडवडील करत म्हणून करत असे. पळशीकर यांचा लेख २००३ मधला आहे. त्यांनी मध्यमवर्गाच्या राजकीय जाणिवांचा वेध अचूक घेतला आहे. त्यांच्या मते, 'आपल्या पारंपरिक वर्चस्वाला उभी राहणारी आधुनिक आव्हाने परतवताना हे समाज (ब्राह्मण व इतर उच्चवर्णीय) वारंवार इतिहास, धर्म, भाषा यांच्या सोईस्कर रणभूमीवर जाऊन थडकलेले दिसतात.' त्यांचे म्हणणे– यातूनच भाजपचा मतदार निर्माण होणार आहे. हा वेध अचूकपणे त्यांनी २००३मध्ये घेतला आहे. त्यांचा आणखी एक लेख पुस्तकात आहे, त्यात या संबंधी सविस्तर विश्लेषण आहे.

'जीवनशैली आणि मूल्यबदल' या दुसऱ्या विभागात लिहिताना, सुरुवातीलाच अभय टिळक मध्यमवर्गावर टीकेची झोड उठवतात. ते म्हणतात तसा मध्यमवर्ग कातडीबचाऊ आहे, पण त्याच वेळेस जगातील सगळ्या क्रांत्यांचे पुढारपण मध्यमवर्गानेच केले आहे. त्यात नवलही काही नाही, कारण निम्नस्तरावरील लोकांची ताकद जिवंत राहण्याच्या झगड्यातच संपून जाते. आहे ती व्यवस्था चालू ठेवण्यातच वरच्या वर्गाचे हित असते. समाजसुधारणेच्या सगळ्या चळवळी मध्यमवर्गच चालवतो. त्यांची संख्या अल्प असेल, पण त्यातील सच्चेपणा त्याच्या मनाला भिडला तर तो मोठ्या प्रमाणावर त्याच्या पाठीशीही उभा राहतो.

अरुण टिकेकरांचा छोटासा लेख मध्यमवर्गाच्या बचतीच्या अतिरेकावर टीका करतो. बचत केली म्हणजे आपला वृद्धापकाळ चांगला जाईल, या विचारातील फोलपणा ते दाखवतात. मध्यमवर्गाला 'बुद्धिजीवी' म्हणणे कसे अयोग्य आहे, हे मुकुंद टाकसाळे उलगडून सांगतात. त्यांच्या मते, शारीरिक श्रमांपासून फारकत घेतलेला हा वर्ग याला 'मसिजीवी' म्हणजे शाईवर जगणारा वर्ग असे म्हणणे योग्य ठरेल. ज्ञानदा देशपांडे यांना 'अमेरिकन हावरटपणा व भारतीय दुटप्पीपणा यांच्या उथळ मिश्रणातून' नव्या मध्यमवर्गाची मूल्ये उलगडताना दिसतात.

तिसरा विभाग 'आव्हाने व आवाहने' याची चर्चा करतो. यातील त्र्यं. शं. शेजवलकर यांचा १९६२ चा लेख त्यातील दृष्टिकोनामुळे उद्बोधक आहे. ते म्हणतात की, लोकहितवादींनी संपूर्ण समाजहिताचा विचार केला होता. पण पुढे चिपळूणकर, रानडे, भांडारकर, टिळक, आगरकर यांनी इंग्लंडमधील व्यक्तिवादी संप्रदायाची भलावण करत वैयक्तिक सुधारणेकडे जास्त लक्ष दिले. यामुळे त्यांच्या विचारक्रांतीचा फायदा त्यांची कुटुंबे व त्यांचा समाज यांनाच

झाला. याला ९५ टक्के बहुजन समाज पारखाच राहिला. यामुळे ब्राह्मण समाजाचा जात्याभिमान तसाच राहिला. ‘आधी सामाजिक सुधारणा की आधी राजकीय?’ या वादामुळे व त्यात टिळक-चिपळूणकर पंथीयांची सरशी झाल्यामुळे समाजाचे फार मोठे नुकसान झाले, असे शेजवलकर म्हणतात. प्रस्तुत लेखिकेचेही हेच मत आहे.

राजकीय व सामाजिक सुधारणा या नेहमीच हातात हात घालून चालल्या पाहिजेत, कारण सामाजिक कुप्रथांवर सतत बोलून व सुधारणा करत राहिल्याशिवाय आपोआप त्या घडतील असे नाही. यावर भाष्य सुहास पळशीकर यांनी पुढे केले आहे. भा.ल. भोळे, अरुण टिकेकर व पळशीकर या तिघांनीही मध्यमवर्गाच्या संकुचितपणावर भाष्य केले आहे. आजची परिस्थिती समजून घेण्यास ते उपयुक्त ठरते.

भारत ही इंग्लंडची वसाहत असल्याने व त्यांना त्यांचे राज्य चालवण्यासाठी मनुष्यबळाची गरज असल्यामुळे; तिथे सोळाव्या-सतराव्या शतकापासून विकसित झालेले वैज्ञानिक ज्ञान व सामाजिक मूल्यव्यवस्था आपल्याकडे इंग्रजी शिक्षण घेणाऱ्या उच्चवर्णीय व उच्चवर्गीय पुरुषांनी आत्मसात केली. स्त्रीला स्वातंत्र्यानंतरही अनेक वर्षे निर्णय-प्रक्रियेत काहीही स्थान नव्हते. यातील काही पुरुष उदात्त भावनेने, मानवी समानतेच्या भावनांनी प्रेरित झाले असले तरी, बहुसंख्य सुशिक्षित मध्यमवर्ग राज्यकर्त्यांच्या जवळ जाऊन आपला लाभ जास्तीत जास्त कसा करून घेता येईल याच्याच मागे होता. मात्र प्रस्थापित हितसंबंध व शिक्षणामुळे झालेला आधुनिक मूल्यांचा परिचय यामुळे हा वर्ग साम्राज्यशाहीविरोधी झाला. त्यामुळे राष्ट्रीय चळवळीत त्याने पुढाकार घेत सर्वसामान्य लोकांपर्यंत स्वातंत्र्य चळवळीची उद्दिष्टे पोचवली. परंतु सामाजिक चळवळीत भाग घेऊन स्वतःचे उच्च स्थान गमावण्याची तयारी बहुसंख्य उच्च जातीय मध्यमवर्गाची नव्हती. म्हणूनच कदाचित टिळक-चिपळूणकरांचा विचार यशस्वी झाला असावा. त्यामुळे सामाजिक सुधारणा करणारे काही व या सुधारणांना विरोध करणारे बहुसंख्य- अशी स्थिती स्वातंत्र्यानंतर बराच काळ राहिली. म्हणूनच ‘हिंदू कोड बिला’ला त्या काळी मोठा विरोध झाला. फक्त नेहरूंचा ठाम पाठिंबा व विश्वास आणि त्यांच्या सहकाऱ्यांची साथ, यामुळे ‘हिंदू कोड बिल’ तुकड्या-तुकड्याने का होईना, पास झाले.

पळशीकरांचे पुढील विश्लेषणही सध्याची स्थिती समजून घेण्यासाठी उपयुक्त आहे. हा उच्चवर्णीय-उच्चवर्गीय मध्यमवर्ग शिक्षणामुळे व स्वातंत्र्य चळवळीतील सहभागामुळे राज्यकर्त्या वर्गाजवळ, तसेच भांडवलशाही वर्गाजवळही होता. स्वतःची प्रागतिक प्रतिमा जपण्यासाठी सार्वजनिक अवकाशात समतेचा पुरस्कार करणे त्याला आवश्यक होते आणि गुणवत्तेचा आग्रहही धरणे सोईचे होते. कारण या तत्त्वामुळे ‘मागे’ राहणाऱ्यासाठी फार काही करण्याची जबाबदारी येत नाही.

मध्यमवर्गाचे दुसरे लाडके तत्त्व व्यक्तिस्वातंत्र्याचे! त्यामुळे जीवनशैली, नीतिमूल्ये, सामाजिक जबाबदारीचे भान, कर्तव्याची कल्पना यांचा समावेश सोईस्करपणे ‘खासगी अवकाशात’ करता येतो. धर्म, जात, अंधश्रद्धा यांचाशी निगडित प्रश्न मग ‘खासगी’ ठरवता येतात. मध्यमवर्गात उच्चजातींचे बराच काळ प्रभुत्व होते. आता हळूहळू इतर जातींचे प्रमाण मध्यमवर्गात वाढू लागले असले तरी, पळशीकरांच्या मते मध्यमवर्गाची जडण-घडण ब्राह्मणी आहे व त्यांची जीवनदृष्टी ब्राह्मणी-हिंदू आहे.

या मध्यमवर्गाची १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणांमुळे भरभराट झाली व ‘नाही रे’ वर्गातील लोकांसाठी काही करण्याची तोंडदेखली गरजही त्याला वाटेनाशी झाली. या मध्यमवर्गाच्या ढोंगीपणामुळे आधीही दारिद्र्यनिर्मूलनाचे प्रयत्न मनापासून झाले नव्हते, आता तर खासगीकरणाच्या नावाखाली सगळेच सामाजिक सुरक्षा कायदे मोडीत काढणे त्याला वावगे वाटत नाही. या अवधीतच ८० टक्के असणारा हिंदू धर्म धोक्यात असल्याची जाणीव त्याला झाली आणि लालू-मुलायमसिंह यांच्या गावठी उच्चारांना हसणारा मध्यमवर्ग साध्वी ऋतंभराची असंस्कृत भाषणे मजा घेत ऐकू लागला. याच काळात या मध्यमवर्गाची महत्त्वाकांक्षा आपल्या मुलांनी ‘अमेरिकेला’ जाऊन स्थाईक व्हावे, अशी झाली. तिथून याच मध्यमवर्गाची माणसे देशभक्त हिंदू होऊन, देशातील हिंदुत्ववादी शक्तींना बळ पुरवत असतात. आता यांची संख्याही मोठी आहे व देशातही हिंदुत्ववादी शक्ती सत्तेवर आहे.

‘मध्यमवर्ग आणि जाणीवजागृती’ हा पुस्तकाचा पुढील भाग आहे. यात राजा दीक्षित यांनी १९व्या शतकातील मध्यमवर्गाच्या जाणिवा कशा विकसित होत गेल्या याचा आढावा घेतला आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाल्यावर १८८८ मध्ये सर सय्यद अहमद यांनी विचारलेला प्रश्न की- बंगाली लोक व महाराष्ट्रीय ब्राह्मण याखेरीज या सभेत पारित केलेल्या ठरावाचा फायदा अन्य कोणाला

होणार आहे?; फुले यांचा विरोध व भालेकरांनी काँग्रेससमोर जाळलेला शेतकऱ्याचा पुतळा, या गोष्टी काँग्रेसचे वर्गीय चरित्र स्पष्ट करण्यास पुरेशा आहेत. काँग्रेसच पुढे मध्यमवर्गीय समाजाचे प्रतिबिंब करणारी संस्था ठरली. राजेंद्र वोरा, हर्षद भोसले व सुहास कुलकर्णी हे नव्वदीनंतर उदयास आलेल्या नवमध्यमवर्गाची परखडपणे चिरफाड करतात.

या सर्व विवेचनात मला मोठी त्रुटी जाणवली. ती म्हणजे, डाव्या चळवळींची इथे काहीच चिकित्सा नाही वा एकही लेख या चळवळींवर समाविष्ट झालेला नाही. डावी चळवळ सामान्य लोकांचे हित, कामगारवर्गाचे हित, स्त्रियांचे प्रश्न, यावर बोलत असली तरी ती मुख्यतः मध्यमवर्गीय लोकांनीच चालवलेली, मध्यमवर्गात प्रतिष्ठा असलेली होती. तिचा प्रभाव काँग्रेसवर मोठ्या प्रमाणावर पडला होता. संविधान सभेत त्यांची संख्या मर्यादित असेल, पण त्यांनी प्रपादिलेल्या मूल्यव्यवस्थेचा प्रभाव भारतीय समाजमनावर पडलेला होता. म्हणूनच संविधानात या मूल्यांचे प्रतिबिंब दिसते. आणि आजही गरिबांचा कळवळा दाखवल्याशिवाय कुठलाही पक्ष निवडून येत नाही. यात दुटप्पीपणा आहे, तरीही तो करण्याची आवश्यकता आतापर्यंत भासत होती. सध्याच्या कोविड-१९च्या काळात मात्र सरकारच्या लेखी ही संवेदनशीलता अनावश्यक आहे की काय, असा प्रश्न पडू लागला आहे.

शेवटचा विभाग 'नवमध्यमवर्ग व त्याचे राजकारण' यावर आहे. कुमार केतकर, एकनाथ साखळकर, प्रकाश बाळ, अजित नरदे व राजेश्वरी देशपांडे यांचे लेख या विभागात आहेत. केतकर वर्णन करतात त्याप्रमाणे जमीन किंवा कारखान्यांचे मालक नसले तरी, नोकरशहांच्याच हातात खरी सत्ता असते. म्हणजे या नोकरशाहीकडे अधिकार होते, परंतु उत्तरदायित्व नव्हते. तो शेती व औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनयंत्रणेचा भाग नव्हता, पण त्या उत्पादनावर व वितरणव्यवस्थेवर त्याचे नियंत्रण होते. भांडवलदार व शेतकरी, शेतमजूर व कामगार या नोकरशाहीपुढे लाचार होते. थोडक्यात, मालक नसून सर्व अधिकार काबीज करणे व त्यामुळे भ्रष्टाचार करून मोठी साधनसंपत्ती स्वतःच्या अधीन करून घेणे या मध्यमवर्गाला साध्य झाले. याच वर्गात केतकर म्हणतात की, भाजपचे पाठीराखे पूर्वापार होते आणि मध्यमवर्ग जसा मोठा होत गेला तसे ते वाढत गेले. या २००४ मध्ये लिहिलेल्या लेखात म्हटले आहे की, या मध्यमवर्गाच्या गढीला गरीब व वंचित लोकांच्या उठावामुळे खिंडार पडू शकते.

साखळकर म्हणतात की, मध्यमवर्गात तालुका व गावस्तरावरील मध्यम नोकरशहासुद्धा सामील आहेत. हे पांढरपेशा नाहीत, पण विधायक वृत्तीचे आहेत. यात उदा.- दूध संघ व सहकारी संघ चालवणारे, रिक्षाचालक संघटना चालवणारे, तसेच धार्मिक समारंभ, गावातील सण-समारंभाचे आयोजक येतात. साखळकरांच्या म्हणण्यानुसार ते धर्मातीत आहेत. परंतु त्यांना धर्माचे वावडे नसावे, त्यामुळे सोशल मीडियाचा वापर करून भाजप त्यांना आपल्याकडे वळवू शकला आहे.

राजेश्वरी देशपांडे यांनी नवमध्यमवर्गाच्या सक्रिय राजकारणाचे मॉडेल म्हणून दिल्लीतील आम आदमी पक्षाचा व्यवहार पुढे मांडला आहे. केजरीवाल यांच्या पक्षांतर्गत लोकशाहीविषयी मतभेद असले तरी एक बाब मान्य करावीच लागेल की- दिल्लीत गरीबवर्ग तसेच मध्यमवर्गही आपच्या मागे उभा आहे. केंद्रीय सत्तेच्या असहकारामुळे 'आप'ला माराव्या लागलेल्या कोलांटउड्यांना मध्यमवर्ग समजून घेतो, कारण बहुसंख्य मध्यमवर्गाला आपल्या घरी किंवा कचेरीत कामाला येणाऱ्या गरीब कामगारांना केजरीवालांनी केलेल्या 'मोहल्ला क्लिनिक' व सरकारी शाळांच्या सुधारणांचे कौतुक आहे. परंतु हे मॉडेल अजून दिल्लीबाहेर जाऊ शकलेले नाही.

अशा तऱ्हेने आजच्या मध्यमवर्गाचे चित्रण या जवळजवळ २७० पानी पुस्तकात आले आहे. वेगवेगळ्या काळांत लिहिलेल्या लेखांमुळे तसे एकसंध स्वरूप या पुस्तकाला नसले तरी लेखाच्या शेवटी कुठल्या वर्षात हा लेख लिहिला गेला आहे त्याची नोंद असल्याने, त्यातील तर्क-वितर्क लक्षात घेणे सोपे जाते. आजच्या समाजातील विसंगती व सुसंगती समजून घेता येते. या दृष्टीने हे पुस्तक वाचनीय ठरते.

**वासंती दामले,** मुंबई
vasdamle@gmail.com

**मध्यमवर्ग : उभा, आडवा, तिरपा**
संपादक : राम जगताप
राजहंस प्रकाशन, पुणे
पाने : २७२, मूल्य : ३५० रुपये

**गांधींचे गारूड**

संजीवनी खेर



# मनीचा संगर

गांधीजींच्या सात्त्विक आकर्षणाला काळ, देश, वंश, लिंग, वय याची सीमा नव्हती. जो माणूस 'साधं राहा, शाकाहारी व्हा, कष्टाखेरीज अन्न-धन अर्थहीन आहे' असं सांगत होता; त्या व्यक्तीबद्दल जगातील सर्व स्तरांतील लोकांना का आकर्षण वाटत होते, याचा अभ्यास तज्ज्ञ करीत राहोत. तेव्हाचं जग वेगळं होतं म्हणून पळवाट निघेलही; पण तेव्हाचं जग काय कमी भौतिकाच्या मागे होतं? कमी व्यसनी, दुष्ट, क्रूर होतं? त्याच काळात दोन महायुद्धं झाली, देशांच्या फाळण्या झाल्या, लाखोंनी जीव गमावले. औद्योगिक क्रांतीने माणसांचा, संपत्तीचा हव्यास वाढला. हे सारे सभोवती वेगाने सुरू असताना एक अल्पवस्त्रांकित माणूस आपल्या संकल्पना जगासमोर मांडतो, तसेच जीवन जगतो, त्यासाठी जीव घ्यायला नव्हे तर द्यायला तत्पर असतो- त्याच्याबद्दल ओढ नि त्यासारखं जीवन जगायची असोशी कशी काय वाटू शकते, हे गूढच आहे. व्यसनाची, चैनी जीवनशैलीची, सुंदर वस्त्रप्रावरणांची, दागदागिन्यांची, सुखासीनतेची स्वप्नं सर्वांना पडतात. त्यामागे सारे धावतात. पण दरिद्रनारायणाची सेवा करायला, झिजायला लोक कसे तयार होतात? आज खरं वाटत नाही, उद्या लोकांना हे एक मिथक आहे असे वाटलं तर नवल नाही.

या सदरात मी त्यांच्या स्त्री अनुयायांबद्दल लिहिलं. असं म्हटलं जातं की- स्त्रीला (मग ती भारतीय असो वा पाश्चात्त्य) घर सोडणं, समाजाकरता सर्वस्व ओतून काम करणं अशक्य असतं. घराच्या चार भिंती त्यांचा तुरुंग बनतात. प्रेमळ कुटुंबीय रूढी-परंपरांचे रखवालदार बनतात. आपल्याकडे तर त्या शतकात बायका निरक्षरच होत्या. घराचा उंबरठा ओलांडणं पाप होतं. घुंघट, पडदा या गोष्टी आणि शालीनता, मर्यादा, मोठ्यांचा मान-सन्मान याच्या दडपणाखाली ती घरातच असे. अचानक एक माणूस येतो काय नि त्यांना देशाला स्वतंत्र करायच्या स्वप्नपूर्तीसाठी हाक देतो काय नि हजारो-लाखो स्त्रिया (घरच्यांनीही उत्तेजन दिल्याने) थेट राजकीय व्यासपीठावर कशा काय दिसू लागल्या? मधल्या साऱ्या पायऱ्या- जसं शिक्षण, रूढींचे उल्लंघन, धीटपणा, पुरुषांसमवेत बरोबरीने

> पण तेथील परिस्थिती पाहता, फ्रेडरिकला आपल्याऐवजी आपल्या खर्चाने दुसरा प्राध्यापक महाविद्यालयात ठेवूनच निघावे लागणार होते. शिवाय ऑफ सीझन तिकिटाचे दरही खूप कमी होते. त्यानुसार त्यांनी बुकिंग केले. इकडे बिर्ला आणि बजाज या गांधींच्या मित्रांनी फ्रेडरिक्सना पैसे पाठवले. त्याच सुमारास राजेंद्र प्रसाद युरोपच्या दौऱ्यावर होते. तिथे युद्धोत्तर शांतता विषयावर ते भाषणं करणार होते. तिथे हे जोडपं त्यांना भेटले, आपल्या घरी पाहुणचाराला घेऊन गेले. पण त्या भाषणाच्या वेळी काही राष्ट्रवादी लोकांनी गोंधळ घातला. प्रसादांना नि स्टंडंथ जोडप्याला मारहाण झाली. जखमा झाल्या. डॉ.फ्रेडरिकने सर्वांची मलमपट्टी केली. त्या दांपत्याने हिंदुस्थानात १९२८ मध्ये जायचे नक्की केले.

वावरणं या गोष्टी– जादू झाल्यागत कशा नाहीशा झाल्या?

या माणसाने फक्त राजकीय स्वातंत्र्य हा एक विषय घेतला असता तरी जन्म पुरला असता, पण हा म्हणजे शंभर गोष्टी करू पाहत होता. अहिंसा, सत्य, अस्पृश्यतानिवारण, शाकाहार, सर्वधर्म समभाव, स्त्री-समानता, साक्षरता, स्वदेशी आणि इतर अनेक बाबतींत तो आग्रही होता. त्यासाठी सत्याग्रह करत होता. मूठभर मीठ काय उचललं... सारा देश भारला गेला! श्रीमंत-गरीब, हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती सारे त्याच्याभोवती जमू लागले. त्याच्या वचनातील जे झेपेल ते जीवनभर करत राहिले. सारं वर्ष हे गूढ उकलण्यात गेलं. देशी-विदेशी स्त्रिया इथे येऊन त्या जादूचा अनुभव घेत होत्या. रोमाँ रोलाँच्या एका पुस्तकाचा प्रभाव इतका होता की– त्यात वर्णिलेला माणूस कसं काम करतो ते अनुभवायला ब्रिटिश, अमेरिकन, फ्रेंच आणि इतर स्त्रिया इथे आल्या. एका भेटीतच अनेकींचे जीवन बदलले.

तोच अनुभव घेत भारतातील मराठी, बंगाली, पारशी, गुजराती, पंजाबी स्त्रियांनी स्वातंत्र्य चळवळीत, खादीच्या, साक्षरतेच्या कामात आयुष्य वेचले. त्यांचे जीवन कसे होते, हे जाणून घ्यायचा प्रयत्न या मालिकेतून केला गेला. कोरोना काळ हा याबाबतही कसोटीचा ठरला. वाचनालये बंद, त्यामुळे माहिती मिळणे अवघड होत चालले होते. या स्त्रियांबद्दल अधिक रोचक माहिती मिळणे शक्य होते, पण... असो त्यातूनही ही व्यक्तिचित्रे मी रंगवली. तरुण लोकांना ती आवडली, हे विशेष. नाही तर या विषयाबाबत गैरसमजच अधिक! पण मला वाटलं, आपण प्रयत्न करावा. क्वालिफिकेशन काय होतं माझं? फक्त स्त्री असणं, वाचन आणि संशोधनाची ओढ असणं, जाणून घेण्याचा कंटाळा नसणं. पण एवढ्या सामग्रीवर मी महात्मा गांधींच्या असंख्य अनुयायी स्त्रियांपैकी काहींबद्दल लिहायचा घाट घातला. नि आश्चर्य म्हणजे, साधनाच्या संपादकांनी ती कल्पना उचलून धरली. परिणाम? या वर्षीची ही लेखमाला.

आजच्या लेखात आहे फ्रेंच महिला. अँटोनिया मिरबेल ही गांधींच्या विचारांनी भारावली होती. एकामागून एक पत्रं लिहीत सुटली होती. 'मला तुमची सहकारी म्हणून काम करायचंय, मला तिथं यायचंय– मला परवानगी द्या. नाही म्हणू नका. मी कदाचित तुमची अनुयायी व्हायच्या योग्यतेची नसेनही, पण मला संधी द्या. कुठलीही कठीण परीक्षा द्यायची माझी तयारी आहे. मला आणि माझ्या बरोबरीच्यांना तुमचे आध्यात्मिक मार्गदर्शन हवे आहे.'

रोमॉ रोलाँनी लिहिलेले गांधींचे चरित्र वाचले होते. त्यांच्या संयमाची, शाकाहाराची, अहिंसेची, सत्याग्रहाची संकल्पना आवडली होती. आपल्या पत्रांना उत्तरच नाही, हे पाहून ती निराश झाली होती. तिने धीर सोडला नाही. एक दीर्घ पत्र तिने गांधीजींना लिहिले. त्यात तिने आपल्या कुंडलीत महान माणसाच्या मार्गदर्शनाचा योग असल्याचे नमूद करून आपली पार्श्वभूमी ही कर्मठ कॅथॉलिक संस्काराची असून आपण बालपणापासूनच आध्यात्मिक विषयात रस घेत आहोत; पण चर्च व प्रचारक यांच्या कठोरपणाचा आणि प्रश्नांना नीट उत्तरे न देण्याच्या वृत्तीने आपण नाऊमेद होऊन अश्रद्ध बनलो आहोत... असे लिहिले. यादरम्यान ती थिऑसॉफीच्या विचाराने प्रभावित होऊन त्यातील गुरूचे स्थान तिला अत्यावश्यक वाटू लागले. गांधींनी आपले आध्यात्मिक गुरू व्हावे, अशी गळ पत्रातून ती त्यांना घालत होती.

ती एका मध्यमवर्गातील होती. तिचा पती इंजिनिअर होता, पण त्याचा पगार तुटपुंजा होता. तिला स्वतंत्र कमाईचे साधन उपलब्ध नव्हते. 'तुम्ही नकार दिलात, तर माझा आत्मा तग धरू शकणार नाही. तुम्ही हो म्हणा म्हणजे मी तिथे येऊ शकेन. मी शाकाहार, अल्पसंतुष्टता अवलंबून वाइनचा त्याग केला आहे. वैवाहिक ब्रह्मचर्य आम्हा दोघांनाही योग्य वाटतंय. मी वासनांवर नियंत्रण करीत आहे. हे करुणाकर गुरुवर्या, मला शिष्य म्हणून स्वीकारा. तुमच्या भेटीसाठी मी आतुर आहे, त्यामुळे माझ्या आत्म्याचा मृत्यू होणार नाही. हे सन्माननीय गुरुवर्या, मला बोलावून घ्या. आतुरतेने वाट पाहत आहे.'

गांधींपर्यंत हे पत्र पोहोचायला वेळ लागला. पण त्यानंतर त्यांनी तिच्या पत्रावर जरा दूरस्थागतच प्रतिक्रिया दिली. 'प्रिय मित्र, तुमच्या पत्राने मला अत्यंत आनंद झाला, पण फक्त माझ्या भेटीकरता अनेक दिवसांचा प्रवास आणि खर्च करून येण्याची तसदी घेऊ नका. कारण तशी आवश्यकताही नाही. तुमच्या आध्यात्मिक प्रगतीसाठी मला भेटायची गरज नाही. देवाची सेवा ही पीडितांच्या सेवेतून साध्य होऊ शकेल, तेच तुम्ही करावे.'

पण तिचे तुणतुणे सुरूच राहिले. 'माझी सत्कर्मे मला साथ देतील. माझा पती जो माझ्यावर बहिणीवत् प्रेम करतो, त्याने मला तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा चंग बांधला आहे. मी तुमचे लेखन वाचत असते नि मला जाणवते की, माझे

विचार तुमच्या विचारांशी खूपच जुळतात. माझ्यावर कृपेचा वर्षाव करा. माझ्या इच्छेखातर तो आम्हा दोघांचा विरहही सोसायला तयार आहे. मला प्लीज मार्गदर्शन करा.' या हळुवार पत्राचा गांधींवर अनुकूल प्रभाव पडला. त्यांनी तिला लिहिलं, 'तुम्ही इथं या. पण माझ्या सान्निध्यात राहूनच तुमच्या आत्म्याला संतोष वाटेल असे नाही. कारण तुम्हाला शांत वाटेल, ते तुमची जी अपरिमित श्रद्धा तुमच्या विचारांवर आहे त्यामुळे; मी कुणी महान साधू, संत आहे म्हणून नव्हे.' हे पत्र वाचून तिच्या डोळ्यांत अश्रू दाटले. तिने म्हटले, 'माझे बौद्धिक, नैतिक कर्म दुर्लक्षून मला त्यांच्या समक्ष उभं राहता येणार याचे अप्रूप आहे. त्याखेरीज माझ्या मनात दुसरा विचारच नाही. एका महामानवाला मी याचि देही याचि डोळा पाहणार!'

मिरबेल बोटीतून मुंबईला उतरली. इथं तिला अहमदाबादला न्यायला कुणी येणार होतं, ते येऊ शकलं नाही. तिची भाषा लोकांना कळत नव्हती, त्यांचे बोलणे तिला उमगत नव्हते. साऱ्या अडचणी पार करत ती आश्रमात पोहोचली. तिथेही तेच हाल– भाषाच अडसर! मीरा बहेन मिरबेलनंतर काही दिवसांनी आली. मग सारे सोपे झाले. गांधी, मिरबेल आणि इतर आश्रमजन यांच्यातील ती दुवा ठरली. रोमाँ रोलाँनी लिहिले होते की, 'मिरबेल ही काही फार उच्च कुळातील वा अत्यंत हुशार स्त्री नाहीय. फार काही करू शकेल अशी ताकद तिच्यात नाही, पण ती अत्यंत तरल विचारांची सच्ची स्त्री आहे.'

मिरबेलचे आश्रमीय जीवन तीन महिन्यांचं होतं. मीराबेन भाषेबाबत तिला मदत करीत होतीच. तिला जे आतून अस्वस्थ वाटत होते, ते गांधीजींच्या सहवासाने शांत होत गेले. त्यांनी तिला फारसा उपदेश वा सल्ला दिला नाही. पण तिला मानसिक, आध्यात्मिक आधार दिला. त्यांचे आश्रमात वावरणे, विविध विषयांबाबतचे नैतिक विचार आचरणात आणणे, सर्वभूतेषु प्रेम असणे– या गोष्टींचा तिच्या जखमी आत्म्यावर मलमासारखा परिणाम झाला. गांधींनी म्हटले की, या बदलाला त्यांचा नव्हे तर तिच्या शक्तीचा उदय कारणीभूत आहे. मिरबेलच्या मनाला बरं वाटलं. तिने मानवकल्याणाच्या कामात स्वदेशात काम करायचं ठरवलं. तिचा नि गांधीजींचा पत्रव्यवहार सुरूच



राहिला. खरं तर या व्यक्तीत लिहिण्यासारखे काय होते? मला वाटलं– असेही जखमी आत्मे गांधीजींच्या सहवासात बरे होऊन गेले, हे वाचकाच्या मनात ठसावे म्हणूनच मी हे लिहिले.

दुसरे एक फ्रेंच जोडपे गांधीजींचे विचार नीट समजावेत म्हणून इंग्रजी भाषा शिकले आणि साहित्य वाचून पार बदलून गेले. हे सगळं अविश्वसनीय वाटावं असंच आहे. शब्दांची शक्ती अफाट असते, हे खरं; पण असा चिरंतन परिणाम हजारों देशी–विदेशी लोकांवर होऊ शकतो, यावर आज विश्वासच बसत नाही. एक पत्र १९२५ च्या ऑगस्टचे आहे. फ्रेडरिक स्टँडन्थ या फिजिशियनने गांधींचे निसर्गोपचाराबद्दलचे विचार वाचले नि तो व त्याची पत्नी दोघे भारावून गेले. त्याला पाश्चात्त्य विज्ञानाने गोंधळात टाकले होते, ज्यात मन आणि शरीर आरोग्य याचा मेळच बसत नव्हता. त्याने जादू वा तत्सम गोष्टींचा आणि थिऑसॉफीचाही आधार घ्यायचा प्रयत्न केला, पण त्याची पत्नी फ्रान्सिस्का हिने अतिरेकी विचारांपासून दूरच राहण्याचा सल्ला दिला. ते दोघेही हिंदू विचारांचाही अभ्यास करत होते. गांधीजींच्या विचारात जो निसर्गाचा विचार होता, नैतिकतेचा आग्रह होता, त्यामुळे प्रभावित झाले होते. हे दोघे पती–पत्नी गांधींचा आरोग्य आणि आजार यासंबंधीचा जो विचार होता, त्याचे अनुसरण करायचा प्रयत्न करीत होते.

फ्रेडरिक नमूद करतो की, ब्रह्मचर्य ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे अवघड आहे, पण आम्ही आचरणात आणली आहे. सुरुवातीला मला ते अशक्य वाटे. पण नंतर माझ्या पत्नीच्या– तिलाही ते कठीण गेले, पण तिच्या– मदतीने आम्ही संपूर्णपणे बंधू–भगिनीसारखे राहू लागलो. आमचे आप्तेष्ट आम्हाला वेडेच समजतात. आता मानसिक स्तरावरही आम्ही एका पवित्र भावनेने राहत आहोत. खरंच जगातून किती तरी अन्याय नि दुःखं या मार्गाने कमी होतील!

फ्रान्सिस्काचे आयुष्य वेगळ्याच स्तरावरचे होते. आर्थिक संपन्नता होती. परंतु बाहेरच्या जगापासून ती अगदी तुटलेली होती. बालपणीच वडील गेले. आईने दुसरा विवाह केला. सावत्रवडिलांनी तिचे लवकरच लग्न लावून दिले. त्या व्यक्तीशी तिचं मानसिक नि शारीरिक स्तरावर कधी जुळूच शकलं नाही. तिला तो अनुभव आठवला तरी नैराश्य येई. त्या घराचे वातावरण असे होते की, ती शिक्षणासाठीही बाहेर जाऊ शकत नव्हती. त्यामुळे तिला मैत्रिणीही नव्हत्या. बाहेरच्या जगाबद्दल ती अनभिज्ञ होती. तिने त्याच्याशी घटस्फोट घेतला. फ्रेडरिकशी विवाह केला. शिकण्याच्या ओढीने तिने संस्थेत नाव घातले, पण तेवढ्यात युद्ध सुरू झाले नि पतीला नौदलात भरती व्हावे लागले. तिचे शिकणे थांबले. युद्धानंतर तो परत आला नि ग्रिज़ येथे त्याने कॉलेज सुरू केले. पैशाची चणचण भासू लागली. तिने मुलांच्या गाण्याच्या शिकवण्या करायला सुरुवात केली. दोघांचा ओढा आध्यात्मिक गोष्टींकडे होता. पाश्चात्त्य जगातील भौतिकतेची ओढ त्यांना वीट आणत होती. दारू, भौतिकेतेची अनावर इच्छा, तसेच वागणे, निसर्गाची हानी, प्राण्यांशी क्रूर व्यवहार आणि दुसरीकडे चर्चमध्ये जाऊन आठवड्यातून एक दिवस धार्मिकता दाखवायची, हे त्यांना खटकत होते. घरी ते दोघे भगवद्‌गीता वाचत असत.

गांधींचे 'गाइड टू हेल्थ' हे पुस्तक वाचल्यापासून त्या दोघांनी शाकाहार घेऊन चहा–कॉफी–मसाल्यांचा वापर बंद केला. क्वचित तेथील औषधंही घेणं बंद केलं. खरं तर ते धोकादायक ठरू शकलं असतं. पण त्यांना हेच सिद्ध करायचं होतं की, पाश्चात्त्य जगात राहूनही असा जीवनक्रम शक्य आहे. बऱ्याचदा ही पत्रं एकतर्फी असत. गांधी जिथे असत तिथं ती पोहोचायला वेळ लागे. तरी त्या दोघांपैकी कुणी तरी पत्रं लिहून आपण काय करीत आहोत, हे कळवत असे. खूपदा त्यांना गांधींची पत्रे व यंग इंडियाचे अंक उघडून मिळत, उशिरा मिळत. त्यावर गांधींनी लिहिले, 'तुम्ही तुमच्याकडील अधिकारी व्यक्तींना भेटून त्या अंकांबद्दल नि पत्रांबद्दल स्पष्टपणे सांगा, त्यांचा संशय आणि गैरसमज दूर करा.'

काही दिवसांनी फ्रेडरिकने आपला खादी वापराबद्दलचा मनोदय लिहिला. चरखा आणि विणकाम यांची माहिती कळवण्याची विनंती केली. चरखा मागवून घेतला व हिंदुस्थानात यायची इच्छा व्यक्त केली. 'याचि देहि याचि डोळा तुमच्यासारख्या महामानवाला भेटायचे आहे' असे लिहिले. त्यावर गांधींचे उत्तर आले, 'भरमसाट खर्च करून इथे यायची तसदी कशाला घेता? जेव्हा पैशाची सवड होईल, तेव्हा जरूर या. पण केवळ मला भेटायला नव्हे– तर जे जे तुम्ही वाचत आहात ते काम प्रत्यक्षात कसे चालते, हे पाहण्यासाठी या. तुमच्या कल्पनेतले खरंच इथे आहे ना, हे जाणणे महत्त्वाचे ठरेल. दूर राहून काम मोठे आहे असे समजणे नि ते खरंच कसे आहे ते पाहिल्याने तुम्हाला

सत्याची जाण येईल. आर्थिक स्थिती फारशी चांगली नाही हे ध्यानात घेऊन, तुम्ही मदत घेत असाल तर तुमच्या येण्या-जाण्याचा खर्च किती आहे, ते कळवावे. इथे उन्हाळा तीव्र असतो, तेव्हा उन्हाळ्यानंतर या.'

पण तेथील परिस्थिती पाहता, फ्रेडरिकला आपल्याऐवजी आपल्या खर्चाने दुसरा प्राध्यापक महाविद्यालयात ठेवूनच निघावे लागणार होते. शिवाय ऑफ सीझन तिकिटाचे दरही खूप कमी होते. त्यानुसार त्यांनी बुकिंग केले. इकडे बिर्ला आणि बजाज या गांधींच्या मित्रांनी फ्रेडरिक्सना पैसे पाठवले. त्याच सुमारास राजेंद्र प्रसाद युरोपच्या दौऱ्यावर होते. तिथे युद्धोत्तर शांतता विषयावर ते भाषणं करणार होते. तिथे हे जोडपं त्यांना भेटले, आपल्या घरी पाहुणचाराला घेऊन गेले. पण त्या भाषणाच्या वेळी काही राष्ट्रवादी लोकांनी गोंधळ घातला. प्रसादांना नि स्टंडंथ जोडप्याला मारहाण झाली. जखमा झाल्या. डॉ.फ्रेडरिकने सर्वांची मलमपट्टी केली. त्या दांपत्याने हिंदुस्थानात १९२८ मध्ये जायचे नक्की केले. गांधींना पत्र पाठवण्याची विनंती केली. त्या पत्रामुळेच ऑस्ट्रियातून त्यांना निघता आले.

इथे आल्यावर त्यांना इंग्रजीत बोलता येऊ लागल्याचा फायदा झाला. ते साबरमतीला जाऊन आश्रमात राहू लागले. त्यांना उत्सुकता होती त्यांच्या चरख्यावरील सुताचे आणि विणण्याचे गांधी कसे स्वागत करतात, याची. गांधीजी कामात व्यग्र असत. त्यातच त्यांचा ५९ वा वाढदिवस होता. त्या वेळी फ्रान्सिस्का खादीची साडी नेसली. त्यांना आपण विणलेले वस्त्र दिले. आपल्याला भारतीय नाव देण्याचा आग्रह केला. तिचे नाव उच्चारणं आश्रमवासीयांना अवघड जात होते. त्या दोघांचे परस्परांवरील प्रेम नि श्रद्धा पाहून गांधींनी त्यांना सत्यवान-सावित्री हे नाव दिले. त्यामागची कथा सांगितली. सत्यवानाच्या वासनांवरील विजयाला मदत करून त्याला अध्यात्माच्या मार्गावर नेणारी ही सावित्रीबेन तिथे तीन महिने राहिली.

यादरम्यान तिने 'मूठभर मिठामुळे' हे पुस्तक आपल्या आश्रमातील आठवणींसह लिहून पुरे केले. गांधींनी तिला आपल्या इतर पुस्तकांचे अनुवाद करायची परवानगी दिली. युरोपात गेल्यावर तिने अविश्रांत मेहनत करून गांधींच्या विचारांचा प्रसार करायचे काम केले. लोकांना हे काही आवडत-पटत नसल्याचे तिच्या ध्यानात आले की- तिला नैराश्य येई. त्यावर गांधी तिला पत्रातून समजावत की, तुझे प्रयत्न महत्त्वाचे आहेत. तू आत्ताच निर्णय घेऊ नकोस. ज्या पतीने ती आश्रम नियम पाळायला लागल्यानंतर 'तू अधिक सुंदर दिसू लागली आहेस' असे म्हटले होते, तो आता निराश होऊ लागला होता. त्याला स्वत:वर ताबा मिळवणे असह्य होत होते. गांधीजींच्या मते, 'तो खरा मनावर संयम आणतोय. तुला (म्हणजे फ्रान्सिस्काला) ती इच्छाच नाहीय, त्यामुळे तिचा झगडाच नाहीय.' असो. पण ब्रह्मचर्य त्यांच्या सहजीवनात भेग पाडत होतं, असं दिसत होतं. पुढे तो आजारी पडून वारला. ती एकटीच काम करीत राहिली. तिची हिंदुस्थानात येणारी पत्रंही हळहळू बंद झाली.

यांसारख्या अनेक व्यक्ती त्या काळी स्वत:वर प्रयोग करीत होत्या. परिस्थितीच्या वणव्यात (युद्ध, जवळच्यांचा विरह, देशांची पुनर्रचना, वैयक्तिक जीवन उद्ध्वस्त होणं) होरपळत होत्या. गांधींच्या रूपाने त्यांना दिलासा मिळत होता. त्यातील काही निवडक स्त्रियांवर मी लिहायचे धाडस केले. त्यांचा संघर्ष सोपा नव्हता. आजही हे विचार आचरणात आणणे अशक्य वाटत असले, तरी दूरस्थ ताऱ्यासारखे आश्वस्त करीत आहेत. हेच विचार जगाला तारतील, असा विश्वास मनात आहे.

(लेखमाला समाप्त)

**संजीवनी खेर,** मुंबई
sanjeevanikher@gmail.com
Ph. 9821411472, 02224141669



भाषा : स्त्रियांची / स्त्रियांविषयीची

अपर्णा दीक्षित

# समारोप : पूर्वार्ध

स्त्रिया वापरत असलेली भाषा आणि स्त्रियांबद्दल वापरली जाणारी भाषा याचा विचार या लेखमालेत आपण करत आलो आहोत. स्त्री-पुरुषांच्या भाषेची वैशिष्ट्ये, त्यातले फरक इथपासून ते विविध प्रकारच्या भाषिक हिंसेपर्यंत अनेक मुद्यांची आणि उदाहरणांची चर्चा इथे केली गेली. याआधीच्या लिखाणात (काही अपवाद वगळता) भाषा-वापराचे हे सर्व मुद्दे तपासून बघत असताना मुख्यत: स्त्री आणि पुरुष अशा दोनच गटांचा विचार केला. मात्र प्रत्यक्षात भाषेच्या वापराचे, त्यातल्या फरकांचे, विषमतेचे मुद्दे हे फक्त स्त्री-पुरुष अशा दोनच गटांचे नाहीत. त्याचे स्वरूप पुष्कळ व्यापक आहे. भाषेचे मुद्दे आणखी खोलात जाऊन समजून घेण्याआधी लिंगभावाच्या (Gender) मांडणीचे काही मुद्दे समजून घेतले पाहिजेत.

स्त्रियांच्या सबलीकरणाचे मुद्दे हे कायम त्यांना मिळणारी (किंवा न मिळणारी) आरोग्यसेवा, आर्थिक स्वातंत्र्य, शैक्षणिक संधींचा अभाव आणि इतर संधींचा अभाव किंवा मर्यादा याभोवती गुंफलेले दिसतात. या सगळ्या चर्चेमध्ये जे निर्णय घ्यायचे ते स्त्रियांच्या संदर्भातले असतात, ज्या कृती करायच्या आहेत त्या स्त्रियांबद्दल असतात. उदाहरणार्थ- स्त्रियांना शिक्षण मिळेल अशी योजना राबवणे, स्त्रियांना विविध प्रकारचे आरक्षण पुरवणे, स्त्रियांना स्वसंरक्षणाचे धडे देणे इत्यादी. जास्त संख्येने स्त्रिया शिकल्या, जास्त स्त्रियांना नोकरीच्या संधी मिळाल्या, अनेक स्त्रियांना आपण हल्ला झाल्यास तो परतवून लावू शकतो असा विश्वास निर्माण झाला की, लिंगभेदाचे प्रश्न संपणार आहेत किंवा आटोक्यात येणार आहेत, असा विश्वास या सगळ्या कृती-निर्णयांमधून दिसतो. अर्थातच, वास्तव तसं नाही. वरीलप्रमाणे बदल होऊ नयेत असा मुद्दा नाही, मात्र वरील बदल पुरेसे निश्चित नाहीत. इंग्रजीमध्ये याला necessary but not sufficient असं म्हटलं जातं. स्त्री-पुरुषांमध्ये असणारी असमानता ही बऱ्याचदा त्यांच्यात जे अधिकाराचे-सत्तेचे असमान वाटप झाले आहे, त्यामुळे अस्तित्वात असते. या असमतोलाला धक्का देण्यासाठी सर्व ऊर्जा केवळ स्त्रियांच्याच प्रश्नांवर केंद्रित करून चालणार नाही, असे आता लक्षात येऊ लागले आहे. लिंगभेदाच्या प्रश्नांना हात घालायचा असेल, तर

> सध्याच्या व्यवस्थेत विषम वागणुकीला ज्यांना सामोरे जावे लागते आहे, त्यांचा लढा विषारी पौरुषाच्या (toxic masculinity) विरुद्धचा आहे, हा अजून एक धागा आहे. शिवाय संस्थात्मक पातळीवर होणाऱ्या भेदभावाचीही (institutional discrimination) दखल घ्यायला लावणारा आहे. इथे एक आवर्जून लक्षात घेतले पाहिजे की मुद्दा पुरुषांविरुद्ध असण्याचा, पुरुषांच्या चुका दाखवण्याचा नाही. स्त्रियांचा लढा एक प्रकारे या सगळ्या चर्चेचा केंद्रबिंदू राहिला आहे. याबद्दलही समाजातल्या वेगवेगळ्या गटात राग-लोभ दिसून येतील. LGBTQ गटातल्या लोकांचे प्रश्न आणि स्त्रियांचे प्रश्न एकाच प्रकारचे नसून अतिशय वेगळे आहेत असे ठामपणे म्हणणारे गट सातत्याने दिसतात. तर एकूणात हा सगळाच लढा (स्त्रिया आणि इतर जेन्डर गटातल्या व्यक्ती) पुरुषप्रधानतेविरुद्ध, toxic masculinity विरुद्धचा आहे असाही एक मतप्रवाह दिसतो.

त्यासाठीचे भागधारक कोण आहेत या प्रश्नाकडेही पाहिले पाहिजे. या प्रश्नाचे सोपे उत्तर म्हणजे, पुरुष. स्त्रियांइतके भीषण नसले तरी पुरुषप्रधानव्यवस्थेचे दुष्परिणाम पुरुषांनाही अनुभवावे लागतात. शिवाय आहे त्या व्यवस्थेतून ज्या मानसिकतेचे मुलगे आणि पुरुष निपजताहेत, ते स्त्रियांसाठी आणि एकूण समाजासाठीही फारसे आशादायक नाहीत, ही बोचरी जाणीवही आहे. पुरुषांसंदर्भातल्या मुद्यांचे आणखी काही बारकावे आपण बघणार आहे. मात्र त्याआधी हे लक्षात घेऊ या की, स्त्री आणि पुरुष अशा दोनच (gender identity) गटांत आपण विभागलेलो नाहीत. ज्या व्यक्ती स्वत:ला स्त्री किंवा पुरुष यातली कोणतीच संज्ञा योग्य समजत नाहीत, अशा व्यक्तींसंदर्भातले मुद्दे समजून घ्यायला हवेत. खाली दिलेल्या चित्रात अगदी सोप्या इंग्रजीमध्ये हे सगळं स्पष्ट केलं आहे.

LGBTQ यापलीकडे जाऊनही लैंगिकता आणि लिंगभाव ठरू शकतात. जन्मत: असणारे लैंगिक अवयव (Sex), कोणाविषयी आकर्षण वाटते (Attraction), आपली स्वत:ची लैंगिक ओळख (Identity) आणि व्यक्त होत असतानाचे प्राधान्यक्रम (Expression) या सगळ्यातून जवळपास २०-२४ प्रकारे लिंगभाव व्यक्त होत असतो. Genderqueer, agender, polygender, binary, cisgender अशा अनेक नव्या संज्ञांची ओळख आणि त्यातून येणारी जागरूकता वाढते आहे. अशा सर्व गटांतल्या व्यक्तीदेखील समाजात वावरत असताना विविध प्रकारची विषमता अनुभवत असतात. ही विषमता ज्या प्रकारे व्यवस्थात्मक, मोठ्या पातळीवरची असू शकते; त्याचप्रमाणे ती पेहराव, भाषा, संस्कृती लवचिक नसल्याने येणारीही असते. सर्व मनुष्यांनी ठरावीक साचेबद्ध आयुष्य जगलं पाहिजे, या अपेक्षेचे मोठ्या प्रमाणातले बळी हे जे स्त्री किंवा पुरुष अशा ढोबळ वर्गीकरणात स्वत:ला बसवून घेत नाहीत, ते आहेत. जागतिक पातळीवर सर्व व्यक्तींना सामावून घेण्यासाठी व्यवस्था विविध प्रकारची लवचिकता अंगीकारताना दिसत आहेत.

याव्यतिरिक्त इंग्रजी भाषाही जाणीवपूर्वक बदल करताना दिसते आहे. Mx हे संबोधन अनेक ठिकाणी रूढ होताना दिसतेय. त्याचबरोबर एकवचनी they (they, singular) असा शब्द सर्व शब्दकोशांनी स्वीकारलेला आहे.

अर्थातच हे सगळे बदल अनेक वर्षांच्या चर्चा, ऊहापोह, लढे यानंतर घडून आले आहेत. लिंगभेदाच्या



संदर्भात सर्व चर्चांमध्ये काही समान धागे दिसून येतात. साचेबद्ध आयुष्य जगण्याच्या सीमा तपासून पाहणे, हा एक धागा आहे. सध्याच्या व्यवस्थेत विषम वागणुकीला ज्यांना सामोरे जावे लागते आहे, त्यांचा लढा विषारी पौरुषाच्या (toxic masculinity) विरुद्धचा आहे, हा अजून एक धागा आहे. शिवाय संस्थात्मक पातळीवर होणाऱ्या भेदभावाचीही (institutional discrimination) दखल घ्यायला लावणारा आहे. इथे आवर्जून लक्षात घेतले पाहिजे की- मुद्दा पुरुषांविरुद्ध असण्याचा, पुरुषांच्या चुका दाखवण्याचा नाही. स्त्रियांचा लढा एक प्रकारे या सगळ्या चर्चेचा केंद्रबिंदू राहिला आहे. याबद्दलही समाजातल्या वेगवेगळ्या गटांत राग-लोभ दिसून येतील. LGBTQ गटातल्या लोकांचे प्रश्न आणि स्त्रियांचे प्रश्न एकाच प्रकारचे नसून अतिशय वेगळे आहेत, असे ठामपणे म्हणणारे गट सातत्याने दिसतात. तर, एकूणात हा सगळाच लढा (स्त्रिया आणि इतर जेन्डर गटांतल्या व्यक्ती) पुरुषप्रधानतेविरुद्ध, toxic masculinity विरुद्धचा आहे असाही एक मतप्रवाह दिसतो. अर्थात जास्तीत जास्त गटांनी एकत्र येऊन, एकमेकांपासून बळ घेत योग्य दिशेने बदल घडवून आणावेत, हे कधीही सयुक्तिक आहे. त्याचबरोबर कृतीची दिशा व निर्णयांचे रोख पुरुषांमध्ये कोणत्या प्रकारचे बदल अपेक्षित आहेत याकडेही वळवावे. यामध्ये लहान मुलग्यांना जडण-घडणीच्या काळात काय व कसे संस्कार दिले जातात, मुलग्यांसाठी व मुलींसाठी कोणती भाषा योग्य समजली जाते, त्यांच्या अभिव्यक्तीवर लहान वयापासून कोणती जाचक बंधनं घातली जातात- इत्यादी गोष्टींचा समावेश होतो.

ज्याप्रमाणे स्त्रीला अपमानित करण्यासाठी शब्दांची भली मोठी यादी प्रत्येक भाषेत असते, हे आपण आधी एका लेखातही पाहिलं आहे. त्याचप्रमाणे इतर कुठलीही जेन्डर आयडेन्टिटी असणाऱ्या व्यक्तीला हिणवण्यासाठीसुद्धा भरपूर शब्द असतात. या हीन वागणुकीचा पहिला टप्पा म्हणजे, जन्मत: पुरुष असणाऱ्या मात्र वेगळी जेन्डर आयडेन्टिटी (उदा. Transgender, binary) असणाऱ्या व्यक्तीला बायल्या, बाईसारखा कमी दर्जाचा, असे म्हणून हिणवणे. किंवा जन्मत: स्त्री असणाऱ्या व्यक्तीने आपली वेगळी जेन्डर आयडेन्टिटी असल्याचे जाहीर करताच, त्या व्यक्तीला कठोर आणि गरजेच्या नसलेल्या नैतिक उलटतपासणीला सामोरे जायला भाग पाडणे. यापुढची पायरी म्हणजे, त्या व्यक्तीचे संपूर्ण अस्तित्व तिच्या लैंगिक आयुष्याशी जोडणे. यातून भाषिक आणि इतर अनेक प्रकारच्या हिंसेला वाव मिळतो. मानसिक-भावनिक हिंसेचे माध्यमही अनेकदा भाषा असते, हेसुद्धा इथे लक्षात घेतले पाहिजे.

जिथे पुरुषप्रधानव्यवस्थेला भारतीय संस्कृती म्हणून संबोधण्याची गल्लत केली जाते, तिथे पुरुषांचे मानसिक आरोग्य तरी सुदृढ आहे का? तर, तसेही घडताना दिसत नाही. अनेक जाणत्या वयाचे पुरुष स्त्री-पुरुष नातेसंबंध, नात्यातल्या अपेक्षा-इच्छा याबद्दल अतिशय बुरसटलेले आणि ठोकळेबाज ग्रह बाळगताना दिसतात. आपल्या आजूबाजूच्या व्यक्तींच्या मानसिक-भावनिक आरोग्याची जबाबदारी सक्षमपणे पेलू शकणारे किती पुरुष आपल्या बघण्यात असतात? ईर्ष्या, राग, अभिमान, सुख, दु:ख, आनंद या काही मोजक्या भावनांपलीकडे जाऊन मानवी भावनांची गुंतागुंत सहज समजून घेता येणे सगळ्यांसाठी आणि खास करून पुरुषांसाठी गरजेचे बनले आहे. स्त्रिया आणि इतर जेन्डर आयडेन्टिटी असणाऱ्या व्यक्तींच्या मतामागे आपल्या पुरुष असण्यातून जी सहज सत्ता मिळते, तिचा जोर लावून धरता आला पाहिजे. उग्र भाषेचा, भाषेतल्या हिंसेचा जितका जास्त वापर तितके ठळक पौरुषत्व- हे समीकरण बदलले पाहिजे. आणि म्हणूनच या सगळ्या वाटचालीत जास्त माणुसकी असणारे, अधिक संवेदनशील, जाणते पुरुष तयार होण्यासाठी जेन्डरचे प्रश्न पुरुषांना आपले स्वत:चे प्रश्न वाटले पाहिजेत, ही आजच्या काळाची गरज आहे. त्याचबरोबर toxic masculinity ला आव्हान देत असताना, ज्या सगळ्यांना त्यातल्या विखाराला सामोरे जावे लागते, त्यांनी काही समान अक्ष आखता येतात का, त्यावर एकत्र येता येते का- हेही जरूर तपासून बघितले पाहिजे.

स्त्रियांच्या भाषेचे मुद्दे हे स्त्रियांपुरतेच मर्यादित नाहीत, ते हे असे- एकाच वेळी सारख्याच प्रकारची भाषिक विषमता आणि अन्याय सहन कराव्या लागणाऱ्या सगळ्यांचे ते आहेत. शिवाय भाषेसंदर्भातल्या विषमतेचा मुद्दा लक्षात घ्यायचा तर सगळ्या स्त्रियांचे प्रश्नही सारखे नाहीत. त्यातही जात, धर्म, वर्ग यांचे अनेक बारकावे आहेत. या मुद्यांवर अधिक चर्चा समारोपाच्या उत्तरार्धात करू या.

(उत्तरार्ध पुढील अंकात)

**अपर्णा दीक्षित,** पुणे
aparna.a.dixit@gmail.com
Mob.9881670840

अनुभव

अल्ताफहुसेन रमजान नबाब

# सुंता

मुस्लिम जमातीत राहायचे म्हटलं की, सुंता तर करावीच लागणार. नातेवाइकांच्या दबावाने एका तज्ज्ञ डॉक्टरांकडे मला आणि माझ्या धाकट्या भावाला नेण्यात आले. भूल देण्याआधी लिंगावरील चामडी बाजूला करण्यासाठी जो जोर लावण्यात आला, त्या वेळी मी जोरजोरात किंचाळू लागलो. अब्बांनी माझा आवाज ऐकून धाकट्याला लगेच दवाखान्याबाहेर आईबरोबर बसवून ठेवले. शेवटी भूल देऊन सुंता उरकल्यावर मला आजोळी आणले. जन्मल्यापासून आजपर्यंत सुंता या जबरदस्तीने कराव्या लागणाऱ्या धार्मिक पारंपरिक विधीमुळे माझ्या दैनंदिन जीवनात काहीच फरक पडल्याचे जाणवले नाही. ती केली असती काय किंवा नसती काय, फरक पडणार नव्हताच. आणि फार मोठा फायदा तर होणारच नव्हता- नव्हे, झालाच नाही. फक्त एक वैद्यकीय उपचार म्हणून फायदा झाला असेल कदाचित.

अजूनही ते दिवस पुसटसे, परंतु लख्ख आठवतात. अंगणाच्या कोपऱ्यातच गाडलेला रांजण. आजूबाजूलाही साधीच राहणीमान असणारी, परंतु नीटनेटकी लोकांची वस्ती. आई-वडील दोघेही शिक्षक. त्या काळी शिक्षकांची मुले त्यांच्याच प्राथमिक मराठी शाळेत शिकायची. मी व माझी मोठी बहीण दोघेही आईच्याच शाळेत वस्तीला जात होतो. बाईंची मुलं म्हटल्यावर रुबाब तो निराळाच. खास वागणूकसुद्धा मिळायची. वस्तीवरील आई-बाप आपल्या मुलांना विनाकरण आमचा आदर्श शिकवायचे. सवंगडी हेसुद्धा जाम जीवाभावाचे. माँ-अब्बांनी जे गरिबीतील हाल सोसून शिक्षण घेऊन हळूहळू जम बसवायला सुरुवात केली, त्याच व्यावहारिक परंतु मराठी माध्यमातून घेतलेल्या शिक्षणाचीच कास आम्हाला धरायला लावली. गरिबी हीसुद्धा खूप काही शिकवून जाते; नाही तर सधन घरात असतो, तर कदाचित मदरशातील शिक्षणावर जोर धरला गेला असता.

सुरुवातीपासूनच अब्बांनी अल्लाहची इबादत करण्यासाठी आम्हाला वर्षातून फक्त दोनच दिवस सक्ती केली- रमजान आणि बकरी ईदला. स्वत: मात्र प्रत्येक शुक्रवारला (जुम्माला) घरातच कुराण पठण आणि इतर धार्मिक पुस्तकांचे वाचन करायचे. त्या वेळी सकाळी नळाला आलेल्या पाण्याचा लोटा भरून ठेवायचे. दुआ पढल्यावर घरात सर्वांनी ते पाणी वाटून प्यायचे, अगरबत्तीच्या भुकटीला गळ्यावर लावायचे. पण नमाज कधी पढायचे नाहीत- ना घरात, ना मशिदीत. फक्त वर्षातून दोनदा सामूहिक नमाज, आमच्याबरोबर तीसुद्धा ईदला. शेवटपर्यंत त्यांनी हा शिरस्ता काटेकोरपणे पाळला. त्यांचा घरातील जुम्मा चुकल्याचे माझ्या तरी नजरेत कधीही आले नाही. इंतकाल होण्याच्या वर्षभर आधी मात्र कुणास ठाऊक, परंतु ते रोज मगरीबला मशिदीत जमातमध्ये जायला लागले. रमजानच्या महिन्यात इफ्तारचा छोटा डबा भरून रोज दालच्या खाना घेऊन घरी यायचे, ते फक्त त्यांच्या लाडक्या नातवासाठी. माझ्या मुलाला दालच्या खूप आवडतो. सध्या अधून-मधून आम्ही दोघे त्याला बनवून देतो, परंतु त्यालासुद्धा त्यांनी कधी जमाते-इबादतसाठी



जोर नाही लावला. माँचसुद्धा असंच काही तरी सारखं होतं. ती गुरुवार (जुम्मेरात) मानायची. गुरुवारी तिचा उपवास असायचा. कुराण पठण, दुआ सगळं अब्बांसारखंच असायचं. त्यांनी शून्यातून विश्व निर्माण केले. अगदी नजर लागण्यासारखी प्रगती होती ती. आम्ही सारी भावंडे जे काही आहोत, ते त्यांच्या कष्टाचं आणि संस्कारांचं फळ आहे. जीवनात चढ-उतार तर येतातच, परंतु उतारावरून चढावर यायला हेच कामी आलं. एवढ्या हलाखीतून वर आले तरी शेवटपर्यंत एका पैशाचे कर्जदार कधी बनले नाहीत, उलट सढळ हाताने गरजवंतांना देण्याचीच त्यांची भूमिका असायची. एवढं विश्व निर्माण केले ते पै-पै जोडूनच.

जेवढं बघितलंय तेवढ्यावरून अब्बांना डोळे पाणावलेले कधीच बघितले नव्हते. अपवाद दादांचा जनाजा उचलताना आणि बहिणीला लग्नात रुक्सत करताना. अजून एक अपवाद होता- नातवाची सुंता करताना. त्याचा केविलवाणा आरडाओरडा असा होता की, काळीज पिळवटून जावं. तीन-चार वर्षांचा होता तो. पूर्ण कपडे काढल्यावर आणि ऑपरेशन थिएटरमध्ये डॉक्टरांच्या हवाली करत होतो, त्यामुळे तो बिथरला आणि 'दादाऽ दादाऽऽ' म्हणून किंचाळून रडू लागला. अब्बांचे डोळे पाणावलेले पुन्हा एकदा पाहायला मिळाले. त्याला आत नेल्यावर ते दवाखान्यातून गायब झाले, ते त्याला आमच्या हवाली करण्यात आल्यावरच भेटायला आले.

तर खरा विषय तो हाच- सुंता. इस्लाम धर्मात, कुराणात न लिहिलेली परंतु काही हदीसमध्ये उल्लेखलेली मुस्लिम पुरुषांची- नव्हे, लहान-लहान बालकांचीच म्हणायला हरकत नाही- करतात ती सुंता. आज जगात जवळपास ३० टक्के लोकांची सुंता झालेली आहे. त्यात मुस्लिम पुरुष ७० टक्के आहेत. बरेच आक्षेप-समर्थक आहेत या गोष्टीला. वैज्ञानिक समर्थनसुद्धा आहे, परंतु काही अटींवर. योग्य आणि नेमलेल्या तज्ज्ञांकडूनच ही सुंता झाली तर ठीक, नाही तर इतर आजारांचा संभव जास्त. मानवाधिकाराच्या कक्षेत तर याला कडवा विरोधच होतो. WHO, UNO, CDS यांच्या माहितीनुसार, सुंता केल्यामुळे HIV-AIDS होण्याचा संभव कमी आहे, परंतु हे इतर साधनांप्रमाणे प्रतिरोधक म्हणून वापरू शकत नाही. स्पष्टपणे सांगायचे झाले तर, मुस्लिम समाजात पुरुषांसाठी सुंता ही धार्मिक आणि पारंपरिक परंतु सक्तीची बाब आहे. मी असं ऐकलंय की- मुस्लिम पुरुषांची सुंता झाली नसेल, तर त्याला लग्नही करता येत नाही आणि त्याला दफनही करता येत नाही.

माझ्या मुलाच्या सुंतेपासून सुरुवात करू या. खरं तर मी ही क्रिया त्याला लागू न करण्याचा निश्चय केला होता, परंतु त्याला लघवीच्या जागी संसर्ग झाल्यामुळे लघवी करताना त्रास सुरू झाला. शहरात डॉक्टरांकडे दाखविल्यानंतर त्यांनी निदान केले की, या ठिकाणी संसर्ग होऊन जखम झाली आहे. ती जागा स्वच्छ ठेवण्यासाठी आणि जखमेवर उपचार करण्यासाठी सुंता करावी लागेल. डॉक्टरांना म्हणालो, ''उपचार करा, परंतु सुंता करू नका.'' डॉक्टर म्हणाले, ''या उपचारालाच सुंता म्हणतात. लिंगावरील काहीसे चामडे कापून दूर करावे लागणार, म्हणजे ती जागा पुन्हा बाधित होणार नाही. हा उपचार फक्त मुस्लिमच नाही, तर इतर धर्मांतसुद्धा अशा वेळी करावाच लागतो.'' शेवटी मी तयार झालो. माझ्या सुंतेची आठवण सोबत होतीच. पुढे काय परिस्थिती होणार आहे, हे आठवून मी थोडा बधिर झालो. त्यात मुलाचे कपडे काढून त्याला भूल द्यायला घेतले, तर नसच सापडेना. तो कोणाला हातही लावू देत नव्हता. सुई इतरत्र टोचण्याचा धोका होता. त्याचे दोन्ही हात घट्ट धरले. त्याचा ''पप्पाऽ दादाऽऽ पप्पाऽ दादाऽऽ''

असा आक्रोश मन हेलावून सोडत होता. शेवटी पायाच्या नसेलाच सलाईन लावले.

सुंता झाल्यावर इंजेक्शनमुळे बधिर झालेले त्याचे शरीर हातात घेताना गळ्यापर्यंत हुंदका दाटून आला होता. ते पाहून माझ्या बायकोची हालत तर त्याहून खराब झाली होती. डॉक्टरांनी सांगितलं, ''भूल उतरली आणि मुलाने लघवी केली की, तासाभरात घेऊन जाऊ शकता.'' चार-पाच वाजता भूल उतरली, परंतु भीतीमुळे तो लघवी करत नव्हता. त्रास होत असणार त्याला. काही तरी विचित्र केले आहे आपल्याबरोबर, हे त्याला जाणवलं. रात्री आठ वाजले तरी तो काही ऐकेना. शेवटी दवाखान्यात मुक्काम करायचा ठरवले. रात्री नऊ-दहा वाजता त्याला बाहेर फिरायला आणले. सारखा 'घरी कधी जायचे?' म्हणायचा. त्याला 'लघवी कर, आपण घरी जाऊ', असे दोघेही समजवायचो. 'थोडं पुढे घेऊन चला मी करतो', असं म्हणायचा. थोडं पुढं-थोडं पुढं करत-करत दवाखान्यापासून बऱ्याच अंतरावर आलो, तरीही लघवी करत नव्हता. 'रस्त्यावर उभं करून लघवी कर' म्हटलं तर याचं परत रडगाणे, 'थोडं पुढे चला.' रस्त्यावरून येणारी-जाणारी माणसे आम्हा दोघांकडे संशयाने बघू लागली. एक जण तर पोरं पळवणारी टोळी तर नाही ना, म्हणून एकदम समोर येऊन जाब विचारू लागला. त्याला परिस्थिती सांगितल्यावर हसत-हसत निघून गेला. शेवटी वैतागून आम्ही दोघांनी त्याला पुन्हा दवाखान्यात आणले. चेकअप झाल्यावर तो त्याच्या आईबरोबर स्पेशल रूममध्ये झोपला. मी बाहेर गेस्टरूममध्ये झोपलो. रात्री बायकोला हा काही झोपू देत नव्हता. लघवी होण्यासाठी आधीच इंजेक्शन दिले होते. शेवटी रात्री दोन-तीन वाजता त्याने लघवी केली. लगेच ओरडायला सुरुवात केली, ''आता लघवी झाली, चला घरीऽ, चला घरीऽऽ'' मला उठवायला आला. ''पप्पा, चला घरी.'' मलाही हसू का रडू, असे झाले. शेवटी समजूत काढून सकाळी त्याला घरी घेऊन आलो. माझ्या सुंतेनंतरचे केलेले ओबडधोबड धार्मिक विधी मात्र त्याला लागू केले नाही. त्याकडे आम्ही वैद्यकीय उपचार म्हणूनच पाहिले.

माझा स्वत:चा अनुभव तर यापेक्षा भयंकर होता. बहुतेक सन १९८७-८८ असेल. मी आणि माझा चुलतभाऊ अंगणात काचेच्या गोट्या खेळत होतो. तेवढ्यात चुलते आले आणि त्याला व त्याच्या मोठ्या भावाला बाजारात घेऊन गेले. जाताना तो चुलतभाऊ दम भरून गेला, ''माझा डाव आहे, गोट्या हलवायच्या नाहीत... आलोच मी सुंता करून.'' मला काय माहिती- त्याला उचलून आणून थेट पलंगावर झोपवून पंखा लावतील! मी आपला बापडा आमचा डाव कुणी हलवू नये, म्हणून डोळ्यांत तेल घालून बसलो होतो. चुलत्याने आणि जमातवाल्यांनी माझ्या अब्बांनाही माझ्या व धाकट्या भावाच्या सुंतेसाठी आग्रह धरला होता परंतु त्यांनी तो मान्य केला नाही. बाजारात कुठलेसे फकिरवजा दोघे जण आले होते. मांडीवर घेऊन, डोळ्यांवर रुमाल टाकून झटक्यात काम करायचे आणि नंतर कसलेसे औषध लावायचे. कुठल्याही प्रकारच्या भुलीचा प्रकार वापरत नव्हते. कदाचित हा अघोरी प्रकार बघूनच अब्बांनी या गोष्टीला तयारी दाखवली नसेल. हा प्रकार समाजात अजूनही पाहायला मिळतो.

मुस्लिम जमातीत राहायचे म्हटलं की, सुंता तर करावीच लागणार. नातेवाइकांच्या दबावात मावशीच्या लग्नाला गेलो असता, तेथील एका तज्ज्ञ डॉक्टरांकडे मला आणि माझ्या धाकट्या भावाला नेण्यात आले. भूल देण्याआधी लिंगावरील चामडी बाजूला करण्यासाठी जो जोर लावण्यात आला, त्या वेळी मी जोरजोरात किंचाळू लागलो. अब्बांनी माझा आवाज ऐकून धाकट्याला लगेच दवाखान्याबाहेर आईबरोबर बसवून ठेवले. त्यांचा धीरच होईना, धाकट्याचीसुद्धा सुंता करण्याचा. ती त्यांनी त्या वेळी टाळलीच. शेवटी भूल देऊन माझी सुंता उरकल्यावर मला आजोळी आणण्यात आले. मावशीचे लग्न होईपर्यंत मी लुंगीवरच मिरवत होतो.

एवढं सगळं होऊनसुद्धा जन्मल्यापासून आजपर्यंत सुंता या जबरदस्तीने कराव्या लागणाऱ्या धार्मिक पारंपरिक विधीमुळे माझ्या दैनंदिन जीवनात काहीच फरक पडल्याचे जाणवले नाही. ती केली असती काय किंवा नसती काय, फरक पडणार नव्हताच. आणि फार मोठा फायदा तर होणारच नव्हता- नव्हे, झालाच नाही. फक्त एक वैद्यकीय उपचार म्हणून फायदा झाला असेल कदाचित.

**अल्ताफहुसेन रमजान नबाब,** पुणे
Mob. 09545604192

अभिवादन

राम दोतोंडे

# ‘मिलिंदायन’चे ल. बा. रायमाने



रायमानेसरांना इतिहासाचे भान होते, म्हणूनच त्यांनी बाबासाहेबांसोबतच्या कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेऊन बाबासाहेबांच्या जास्तीत जास्त आठवणी जिथून मिळतील तिथून लिहून घेण्याचे ऐतिहासिक कार्य केलेले आहे. साधनाचे संपादक असताना यदुनाथ थत्ते यांनी गावोगावी समाजात अज्ञात आधारस्तंभ ठरावेत असे युवक घडवले. रायमानेसर हे त्यांपैकीच एक. या अज्ञात आधारस्तंभाने मिलिंदमध्ये इतिहास घडवला. केवळ दलित साहित्याच्या शिल्पकारांपैकी एक नाहीत, तर १९६३ ते १९९५ पर्यंत मिलिंदमध्ये विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्या त्यांनी घडवल्या. मीही त्यापैकीच एक. आज त्यांच्या जाण्यानं मीच नाही, तर ‘मिलिंदायन’ पोरकं झालेलं आहे.

दि. ६ डिसेंबर या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी दलित साहित्याचे एक शिल्पकार आणि औरंगाबाद येथील मिलिंद कला महाविद्यालयाचे माजी प्राचार्य ल.बा. रायमाने यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. त्यांच्या निधनामुळे अनेकांचा अज्ञात आधारस्तंभ कोसळला. प्रखर बुद्धिवाद, चारित्र्यसंपन्नता, परिवर्तनवादी निष्ठा, साधी राहणी आणि सात्त्विक स्वभाव हे सर्व गुण त्यांनी शेवटपर्यंत केवळ अबाधितच ठेवले नाहीत, तर त्यावर ते अढळ राहिले. याचाच परिपाक म्हणून मृत्यूच्या दोन दिवस आधी अनेक दिवसांचा त्यांचा ध्यास असलेल्या बौद्ध धम्माचा त्यांनी रुग्णालयात भन्ते सत्यपाल यांच्या मदतीने विधिवत् स्वीकार केला. तसेच मृत्यूनंतर कुठलेही विधी न करता केवळ सामूहिक बुद्धवंदना व्हावी, असा त्यांचा आग्रह होता. त्यानुसारच त्यांच्या मृत्यूनंतर सामूहिक बुद्धवंदना घेऊन मृतदेह महात्मा गांधी मिशनच्या रुग्णालयाला दान करण्यात आला.

अशा या ध्येयासक्ताचा जन्म कर्नाटकातील अंकलीचा. तिसरीत असतानाच स्वातंत्र्य चळवळीच्या पार्श्वभूमीवर त्यांचा राष्ट्र सेवादलाशी संबंध आला. सेवादलाची शिबिरे, मेळावे यामुळे त्यांच्यातील देशभक्तीची भावना प्रखर होत गेली. त्यातूनच त्यांना साने गुरुजी, वि. स. खांडेकर यांच्या साहित्याची ओढ वाटू लागली.

हडपसर येथे १९५४ ला झालेल्या राष्ट्र सेवादलाच्या मेळाव्यात ते उपस्थित राहिले. याच प्रेरणेने गावातील भूदान चळवळ, शिवजयंती, बाबासाहेब आंबेडकर जयंती यामध्ये ते सहभागी झाले. एम.ए. करण्यासाठी त्यांनी साधना प्रकाशनाने प्रसिद्ध केलेले काशीनाथ पोतदार यांनी लिहिलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मराठीतील चरित्र कानडीत भाषांतरित केले. शिष्यवृत्तीच्या पैशांतून छापून घेऊन ते वाटले. प्रा.रा.ग. जाधव म्हणतात, ‘त्यांच्या जीवनाचा एक काठ साने गुरुजींचा होता तर दुसरा डॉ.आंबेडकरांचा होता’ याची ती सुरुवात होती. म्हणून तर ते ६ डिसेंबर १९५६ ला बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणाच्या महासागरात सहभागी झाले होते.

बाबासाहेबांनी १९६३ मध्ये स्थापन केलेल्या मिलिंद

कला महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक म्हणून सर रुजू झाले आणि त्यांच्या आयुष्यातील वेगळ्या पर्वाला सुरुवात झाली. जगणं, खाणं, कपडे अशी सगळ्यांचीच वानवा असलेले दलित विद्यार्थी मिलिंदमध्ये राज्यभराच्या गावकुसाबाहेरून नवी स्वप्नं घेऊन येत होते. सरांच्या संवेदनशील मनाला या खदखदणाऱ्या ज्वालामुखींना व्यासपीठ देण्याची गरज वाटली. अंमळनेरला असताना साने गुरुजी 'छात्रालय दैनिक' हे हस्तलिखित चालवायचे, याची सरांना कल्पना होती. त्यांनी त्याच धर्तीवर मिलिंद हस्तलिखित पाक्षिक सुरू केले. दलित पँथरची स्थापना नंतरची असली, तरी दलित तरुणांमधील आक्रमकता त्या काळात मिलिंदमध्ये दिसायला लागली होती. या पार्श्वभूमीवर प्रा.अविनाश डोळस म्हणतात तसा, 'इतरांना हा उपक्रम बाळबोध वाटत होता.'

मात्र या उपक्रमाची उपयुक्तता आणि दाहकता मिलिंदमध्ये प्राचार्य म्हणून नव्याने आलेले डॉ.म.ना. वानखडे यांनी ओळखली. अमेरिकेतून आलेले असल्याने तेथील ब्लॅक लिटरेचरशी त्यांची ओळख झालेली होती. नंतर प्राचार्य म.भि. चिटणीस, प्रा.रा. ग. जाधव यांनीही याला पाठबळ दिलं. नंतर हाच बाळबोध वाटणारा उपक्रम दलित साहित्याच्या निर्मितीचा प्रेरणास्रोत ठरला.

यातच डॉ.वानखडे यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा आणि चळवळीचा वेध घेऊन समाजात सुरू असलेल्या मूल्यसंघर्षाला अभिव्यक्ती मिळवून देण्यासाठी वैचारिक व वाङ्मयीन उपक्रमांना योग्य दिशा दाखवली. त्यासाठी हस्तलिखिताशिवाय मिलिंद जर्नल, मिलिंद मॅगझिन, मिलिंद साहित्य परिषद, अस्मिता त्रैमासिक (याचेच पुढे अस्मितादर्श झाले) यांसारखे उपक्रम सुरू केले. या सर्व उपक्रमांत रायमाने सरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती.

या सर्व उपक्रमांना राज्यभर नेण्यात आणि अधिक गती देण्यात साधना साप्ताहिकाने ऐतिहासिक भूमिका बजावलेली आहे. डॉ.अनिल अवचट साधनाचे कार्यकारी संपादक असताना त्यांनी मिलिंद मॅगझिनमधील गावकुसाबाहेरील जातीयतेचे दाहक अनुभव असलेल्या निवडक अनुभवांवर आधारित साधनाचा १५ ऑगस्ट १९७२ चा विशेषांक काढला होता. या अंकाचा फायदा असा झाला की– त्यातील सर्जकता, दाहकता, अस्सलता याचा परिचय राज्यभर झाला. महाराष्ट्र टाइम्सने याची दखल घेऊन अग्रलेख लिहिला. या अग्रलेखात 'आज ज्यांना गावकुसाबाहेर ठेवले जात आहे, ते उद्या गावाचे कूस मोडून टाकतील– नव्हे, गावकूससुद्धा उद्ध्वस्त करतील' असा इशारा दिला होता.

डॉ.वानखडे आणि प्रा.रा.ग. जाधव त्याच काळात वेगवेगळ्या कारणांनी मिलिंदमधून गेल्यानंतरही रायमानेसरांनी स्वत: पुढाकार घेऊन ही परंपरा संवर्धित केली. केवळ सांस्कृतिक आघाडीवरच ते कार्यरत नव्हते, तर मिलिंदमध्ये येणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांचे ते आई झाले होते. कुठल्याही प्रकारची वाच्यता न करता त्यांना ते मदत करत.

एकीकडे बाबासाहेबांशी नातं सांगत असताना त्यांनी आपल्या समाजवादी निष्ठा कधी लपवल्या नाहीत. त्यांच्या बंगल्याचं नाव 'शोध'. या शोधचा मुहूर्त यदुनाथ थत्ते यांच्या हस्ते दारात डॉ.अशोक बेलखोडे यांनी भारत जोडो यात्रेतील विविध ठिकाणांहून आणलेली माती शिंपडून केला. त्यांचा मुलगा डॉ.क्रांती याच्या आंतरजातीय विवाहातही यदुनाथ थत्ते यांची मोलाची भूमिका होती.

रायमानेसरांनी जेवढं लेखन केलं, ते केवळ मिलिंद मॅगझिन आणि साधनासाठीच केलेलं आहे. साधनाच्या अंकात ७० च्या दशकात स्पृश्यास्पृश्यांची दास्ये (स्वातंत्र्यदिन विशेषांक), अस्पृश्यांनी समाजपरिवर्तनात सहभागी व्हावे (२१ नोव्हेंबर १९७०), रूढींच्या निर्मूलनाचे नवे जग (१५ ऑगस्ट १९७२) असे अनेक लेख प्रसिद्ध झालेले आहेत.

रायमानेसरांना इतिहासाचे भान होते, म्हणूनच त्यांनी बाबासाहेबांसोबतच्या कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेऊन बाबासाहेबांच्या जास्तीत जास्त आठवणी लिहून घेण्याचे ऐतिहासिक कार्य केलेले आहे.

साधनाचे संपादक असताना यदुनाथ थत्ते यांनी गावोगावी समाजात 'अज्ञात आधारस्तंभ' ठरावेत असे युवक घडवले. रायमानेसर हे त्यांपैकीच एक. या अज्ञात आधारस्तंभाने मिलिंदमध्ये इतिहास घडवला. ते केवळ दलित साहित्याच्या शिल्पकारांपैकीच एक नाहीत, तर १९६३ ते १९९५ पर्यंत मिलिंदमध्ये विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्या त्यांनी घडवल्या. मीही त्यापैकीच एक. आज त्यांच्या जाण्यानं मीच नाही, तर 'मिलिंदायन' पोरकं झालेलं आहे.

**राम दोतोंडे,** पुणे
Mob. 9833383887

# प्रतिसाद

## केवळ स्त्रीदाक्षिण्य नको...

दि.२ मेच्या साधनात प्रसिद्ध झालेला 'नामसामर्थ्य' हा अपर्णा दीक्षित यांचा लेख आवडला. या लेखातील विचारांना पूरक असे काही मुद्दे मांडत आहे.

टाइम्स ऑफ इंडियामध्ये 'स्वामिनॉमिक्स' नावाच्या सदरात नियमित लेखन करणारे प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ स्वामिनाथन अंकलेशर अय्यर काही वर्षांपूर्वी गोव्यात आले होते. त्यांना आम्ही विचारले, 'तुमचे बंधू (काँग्रेसचे नेते) मणिशंकर अय्यर हे आपले नाव मणिशंकर अंकलेशर अय्यर असे लिहीत नाहीत, मग तुम्हीच आपले मधले नाव अंकलेशर असे का लावता?' ते म्हणाले, 'अंकलेशर हे माझ्या पत्नीचे माहेरचे आडनाव आहे. माझ्या पत्नीच्या सन्मानार्थ मी तिचे आडनाव माझ्या नावातील मधले नाव असे लावतो.'

आपल्या पत्नीचा किंवा पतीचा उल्लेख इंग्रजीमध्ये करताना 'वाइफ' किंवा 'हजबन्ड' असा न करता 'स्पाऊस' असा केला जातो. याला इंग्रजीत जेंडर सेन्सेटिव्ह (स्त्रियांबद्दल संवेदनशीलता दाखवणे), जेंडर न्यूट्रल (स्त्री-पुरुषांच्या लिंगाबाबत तटस्थता दाखवणे) याबरोबरच नॉन-बायनरी (स्त्री-पुरुषांत भेद न करणे) असे शब्द आहेत.

'महारोगी' हा शब्द जसा भाषेतून हद्दपार होऊन 'कुष्ठरोगी' हा शब्द मराठी किंवा कोकणी भाषेत वापरला जातो, त्याचप्रमाणे 'विधवा' हा शब्दही न वापरण्याचा प्रघात आता पडला आहे किंवा पडतो आहे. उदाहरणार्थ- सोनिया गांधी ह्या स्मृतिशेष राजीव गांधींच्या 'विधवा' (विडो ऑफ) असे न म्हणता- त्या स्मृतिशेष राजीव गांधीच्या पत्नी आहेत, असे इंग्रजीत तरी म्हटले जाते. आता सर्व भारतीय भाषांतून विधवा हा शब्द वगळला पाहिजे.

जपान एअरलाइन्सच्या विमानात प्रवाशांचे स्वागत करताना 'वेलकम लेडीज ॲन्ड जंटलमन' असे न म्हणता 'वेलकम एव्हरीवन' असे म्हणतात. संस्कृतमध्ये स्त्रियांसाठी 'वामा' हा शब्द आहे. वामा म्हणजे पुरुषाच्या डाव्या बाजूने उभी असलेली किंवा बसलेली असा आहे. डावी बाजू ही उजव्या बाजूपेक्षा कनिष्ठ आहे, हा (गैर)समज आपल्यात आहे. डावी बाजू कनिष्ठ मानल्यामुळे विठ्ठल-रखुमाईच्या देवळात रखुमाई विठ्ठलाच्या डाव्या बाजूला उभी असते. पार्वती, सीता या अनुक्रमे शंकराच्या व रामाच्या डाव्या बाजूने उभ्या असल्याचे चित्रांत दाखवले जाते. सर्व विवाहसोहळ्यांत वराच्या डाव्या बाजूला वधू उभी असते किंवा बसलेली असते. मुंबई-पुण्यात 'वामा' नावाचे खास स्त्रियांसाठी साड्या व अन्य कपडे विकणारे दुकान आहे. त्यामुळे भाषेतला 'वामा' हा स्त्रियांना संबोधून असलेला शब्द जसा आपण जाणीवपूर्वक वापरता कामा नये, तसेच स्त्रीला पुरुषाच्या उजव्या बाजूला उभी करण्याचा वा बसवण्याचा प्रघात पाडणे हे प्रागतिक पाऊल आहे, असे आपण समजले पाहिजे.

मार्केटिंगमध्ये जेव्हा पहिल्या वाक्यात 'गिऱ्हाइक-कस्टमर' हा शब्द येतो, त्याच्या पुढच्या वाक्यात गिऱ्हाइकाला संबोधून she किंवा her हे शब्द किंवा they हा शब्द येतो. 'आय ॲम अ कॉम्प्लान बॉय' असे म्हणणाऱ्या कॉम्प्लानच्या जाहिरातीत पुढे 'आय ॲम अ कॉम्प्लान गर्ल' असा बदल करण्यात आला. माझा गोव्यात 'मॉन्जिनीस' या नावाखाली बेकरी उत्पादने उत्पादित करणारा कारखाना आहे. त्याची जाहिरात करताना वाढदिवसाला मॉन्जिनीस केक कापणाऱ्या बालकाचे चित्र आम्ही दाखवताना ते आवर्जून मुलाचे न दाखवता मुलीचे दाखवतो. हिंदुस्तान लिव्हर कंपनीचे स्त्रियांसाठी चेहऱ्यावर लावता येणारे क्रीम 'फेअर ॲन्ड लव्हली' या नावाने विकले जात असे. या नावातून गौरवर्णीय स्त्रिया ह्या कृष्णवर्णीय

स्त्रियांपेक्षा अधिक सुंदर असतात असा अर्थ सूचित होतो, हे कंपनीच्या लक्षात आले किंवा निदर्शनास आणले गेले. त्यामुळे कंपनीने 'फेअर ॲन्ड लव्हली' हे नाव बदलून 'ग्लो ॲन्ड लव्हली' असे केले. गोव्यात सांतेरी, शांतादुर्गा, महालसा, महालक्ष्मी, कामाक्षी या देवींची देवळे आहेत. आपण शांतादुर्गेच्या देवळात गेलात, तर देवळाच्या प्रवेशद्वारावर असलेल्या कमानीवर 'श्री शांतादुर्गा विजयते' हे पुरुषधार्जिणे वाक्य असते.

स्त्री कलाकारांना 'ॲक्ट्रेस' न म्हणता 'ॲक्टर' म्हणावे आणि कविता लिहिणाऱ्या स्त्रीला 'कवयित्री' न म्हणता 'कवी'च म्हणावे, असे रूढ होत आहे. आमच्या औद्योगिक आस्थापनात वेगवेगळ्या पदांवर स्त्री कर्मचारी असाव्यात, असा आमचा आग्रह असतो. एचआरडी (मानवी संसाधन बळ) मॅनेजर (व्यवस्थापक) स्त्री असेल, तर ती पुरुष व्यवस्थापकापेक्षा अधिक कार्यक्षम असते, असा माझा अनुभव आहे. कारण आस्थापनातले सर्व कर्मचारी व मजूर तिच्याकडे मातृस्वरूपात पाहतात. स्त्री व्यवस्थापक त्यांच्याशी वात्सल्याने वागते. याउलट पुरुष व्यवस्थापकाची प्रतिमा 'वडिलांची' म्हणजे शिस्तीची किंवा धाकाची असते. त्यामुळेच इंद्रा नूयी, रमा विजापूरकर, सुधा मूर्ती, विनीता बाली, किरण मुजुमदार-शॉ या स्त्रिया व्यवस्थापनाच्या सर्वोच्च पदावर आहेत. अमेरिकेत ज्यो बायोडेन यांनी कमला हॅरिसला आपली उपाध्यक्षपदाची उमेदवार म्हणून निवडली, याचा फार मोठा फायदा बायोडेन यांना होतो आहे.

दुर्गा भागवत, इंदिरा गोस्वामी, सोनिया गांधी, लता मंगेशकर, सुश्मिता सेन आणि अनेक स्त्रिया (पुरुषाशी) लग्न न केल्यामुळे वा पतीचे निधन झाल्यावर नावारूपास आलेल्या आहेत. कोरोनाच्या साथीत आपल्या घरीच बसून आपले व्यावसायिक काम करता येत असल्याने पुरुष कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. पण पूर्ण वेळ घरी असल्यामुळे स्वाभाविकच आपले व्यावसायिक काम करण्याबरोबरच स्त्रीला स्वयंपाक करणे, मुलांचे संगोपन ही कामे करावी लागत असल्यामुळे त्यांची फार कुचंबणा होते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. तात्पर्य– सर्व पुरुषांनी केवळ स्त्रीदाक्षिण्य न दाखवता आपली स्त्रियांसंबंधीची संवेदनशीलता अधिक तरल केली पाहिजे.

**दत्ता दामोदर नायक,** गोवा

## चिनी वर्चस्वामुळे धास्तावलेला देश

चीन, भारत आणि इतर देश या विषयावर बरेच लिखाण विशेषतः इंग्रजीमध्ये बघायला मिळते. साधनानेही असे उपयुक्त लेखन प्रसिद्ध केले आहे. यंदाच्या दिवाळी अंकातही श्री.शैलेश माळोदे यांचा लेख आहे. माझ्या मते चीन, भारत आणि आपले भविष्य या विषयावर अधिक विचारविनिमय होणे गरजेचे आहे. जे विचार सुचले, ते मांडण्यासाठी हा पत्रप्रपंच.

१. चीनने गेल्या तीस वर्षांत जी आर्थिक प्रगती केली आहे, ती अचंबित करणारी आहे. अर्थात या प्रगतीची किंमत ज्यांनी मोजली आहे, ते चीनमधील सर्वसामान्य नागरिक या विषयावर काही बोलतात का? जगभरातील अनेक अर्थशास्त्रज्ञ, राजकीय विश्लेषक चीनचा अभ्यास करत असतात– त्यांच्या हाती काय लागते? (हा भेडसावणारा एक प्रश्न. असो.)

२. चीन हा अजब देश आहे. भांडवलवादी देश आहे, असे कोणी म्हणणार नाही. कदाचित तो भांडवलवादी पण साम्यवादाच्या बुरख्याखाली लपलेला देश असेल. मला जे म्हणावयाचे आहे त्यासाठी हा मुद्दा महत्त्वाचा नसला तरी डावलता येणार नाही. प्रचंड लोकसंख्या सोडली तर भारत आणि चीन यामध्ये काहीही सारखेपणा नाही. आपले आणि चीनचे राजकीय मार्ग पूर्णतः वेगळे आहेत, इतिहास वेगळा आहे आणि संस्कृतीही. यासंदर्भात माझा प्रश्न असा की– चीनबरोबर आपली तुलना कशासाठी करायची? तशी तुलना करण्याचे काही फायदे होतात का?

३. चीनबद्दल जी माहिती मिळते, ती पूर्णपणे विश्वसनीय असते का? हा प्रश्न पण मला नेहमीच विचारावासा वाटतो, कारण माझ्या मते चीन हे एक अनाकलनीय गूढ आहे.

४. Tiananmen Square Protests अशी ज्या आंदोलनाची ओळख आहे, त्या १९८९ च्या आंदोलनात आणि त्याआधी झालेल्या तथाकथित सामाजिक क्रांतीच्या दरम्यान किती निरपराध नागरिकांची निर्घृण हत्या झाली असावी? पण याबद्दल काहीही बोलायचे नाही, असे धोरण दिसते. (कारण आपण कोण?) परंतु यासंदर्भात नेहमी पडणारा प्रश्न असा की– चीनमधील काम्युनिस्ट शासन तेथील कोट्यवधी नागरिकांचे सहकार्य कसे मिळवते?

५. चीन व अमेरिका यांचे नाते दुरावलेल्या भावासारखे आहे. हे भाऊ केव्हाही एकत्र येतील. त्यामुळे आपण या दोन्ही देशांपासून सावध राहायला हवे, नाही का?

६. चीनचा आर्थिक साम्राज्यवाद वाढतो आहे आणि आफ्रिकेतील अनेक देशांना विविध प्रकारची कर्जे व मदत देऊन चीन आपले वर्चस्व झपाट्याने वाढवत आहे. ही वस्तुस्थिती त्या देशांसाठी हितावह नाही. या सगळ्या व्यवहारात त्या देशांची अगतिकता अधोरेखित होते.

७. आजच्या घडीला चीन सर्वांत मोठी महासत्ता बनण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञान वापरत आहे, हे उघड आहे. चीनचे सरकार आणि तेथील कम्युनिस्ट पक्ष विविध प्रकारे आपल्या नागरिकांवर निर्बंध घालून नियंत्रण ठेवत आहे, तसे नियंत्रण ठेवणे कधीही समर्थनीय नाही आणि कोणत्याच लोकशाही देशाला ते शक्य नाही.

८. सध्याच्या परिस्थितीत चीनचे आव्हान स्वीकारण्यासाठी भारताने काय करावे, याबद्दल अनेक मते वाचायला मिळतात. त्याचे सरळ-साधे उत्तर उपलब्ध नाही. आपल्याला जे करता येईल ते पूर्ण तयारीने करावे आणि तेवढेच करावे, यातच कदाचित शहाणपणा आहे. नाही का?

९. चीनच्या विस्तारवादी, आक्रमक आणि दांडगाईचे प्रदर्शन करणाऱ्या भूमिकेमुळे भारतासमोर मोठे आव्हान उभे आहे. याबाबत चीनबरोबर मुकाबला आपल्या देशालाच करावा लागणार आहे. परंतु यासंदर्भात असे दिसते की, इतर अनेक देशसुद्धा धास्तावलेले आहेत. यापुढील काळात अनेक देशांशी अधिक घट्ट मैत्रीचे नाते जोपासणे आता भारतासाठी गरजेचे झाले आहे.

**नरेंद्र महादेव आपटे,** पुणे

## 'लकिर के इस तरफ' दूरचित्रवाणीवर दाखवावा

दि. १२ सप्टेंबरच्या साधनात 'तग धरून उभे : जीवन आणि शाळा' हा शिल्पा बल्लाळ यांचा लेख अतिशय सुंदर व वास्तवाचे भान करून देणारा आहे.

खरे तर मेधाताई पाटकर आणि नर्मदा बचाव आंदोलन यांच्या वास्तवाशी मी फारसा परिचित नव्हतो, केवळ त्यांचा झगडा वाचून व ऐकून होतो. परंतु हा लेख वाचल्यानंतर वास्तवाच्या जवळ पोहोचलो. आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या गप्पा मारणाऱ्या शासनयंत्रणेविषयी मनात नुसतीच चीड नाही, तर घृणा उत्पन्न झाली. भारतात स्वत:च्या मातीला आई मानणारे आदिवासी बांधव- त्यांची ही अवस्था! शिस्तबद्ध, संयमी, परस्परांबद्दल आस्था, प्रेम व जिव्हाळा आणि कधी तरी आपणास न्याय मिळेल; या भावनेने शांतपणे मिळेल ते खाऊन प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षण घेण्याची त्यांची जिद्द पाहिल्यावर त्यांच्या आदिवासी- संस्कृतीला सलाम करावा वाटतो.

चौतीस वर्षांनंतर नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० केंद्र सरकार देशात आणत आहे. त्या धोरणात कुठे तरी या आदिवासी बांधवांना न्याय मिळावा, त्यांच्या शिक्षणासंबंधी खास विचार व्हावा, असे प्रामाणिकपणे वाटते. तेसुद्धा आपल्या देशाचे सुजाण नागरिक आहेत. त्यांनाही त्यांचा शिक्षणाचा हक्क द्यावा, तरच आमची लोकशाही व शासनव्यवस्था जिवंत आहे असे वाटेल; अन्यथा सर्व व्यर्थ!

शिल्पा बल्लाळ यांच्या 'लकिर के इस तरफ' या यु-ट्यूबवरील फिल्मला दूरचित्रवाणीवरील पडद्यावर आणून सामान्यांना पाहता येईल अशी व्यवस्था व्हायला हवी, असे वाटते. सामान्य जनतेने हे पाहिल्यावर सर्वांना देशातील विषमतेची जाणीव होईल. यातून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक संस्था निर्माण करू पाहणाऱ्या शासनयंत्रणेला मूलभूत प्रश्नांची जाण होईल आणि सुबुद्धी होऊन आदिवासी बांधवांना न्याय मिळेल.

**प्रा. गणपतराव कणसे,** कराड, जि.सातारा

## तो तर्क करावा लागणे यातच यश

या वर्षीचा बालकुमार अंक हातात पडला. या अंकाच्या प्रकाशनाची बातमी व्हॉट्सॲपवर पाहिली/वाचली होती. रेणुताई गावस्कर भाषणात म्हणाल्या, 'साने गुरुजींना अंक पाहून आनंद झाला असता.' अंक वाचल्यावर मला वाटते, गुरुजी आज असते तर अंक हातात घेऊन चक्क नाचले असते. इतर कारणांबरोबरच इतर भाषांतील ज्ञानेश्वर त्यांना या अंकात दिसले असते. त्यांना आपली आंतरभारतीची कल्पना प्रत्यक्षात आल्याचा आनंद झाला असता. गुरुजींना काय अनुभूती येऊ शकेल, असा तर्क आम्हाला करावा लागणे यात अंकातील लेखक तरुण/तरुणीचे कर्तृत्व सामावले आहे.

**ॲड्.देवीदास वडगावकर,** उस्मानाबाद


बंदिस्त रंगमंचाच्या सुरक्षित अवकाशापल्याड रानामाळांत,
उरसा-जत्रांत अभिनयाच्या श्रेष्ठ पताका झळकावणाऱ्या
गावकुसाबाहेरील कलावंतांची श्रेष्ठ परंपरा मायमराठीत होती.
त्या फिरत्या चाकावरच्या रंगफडात फुललेली
बेमिसाल प्रेमकहाणी!
गाभुळलेल्या चंद्रबनात
विश्वास पाटील
पृष्ठसंख्या : ३१२ । किंमत : ₹३९५
Book Available
विश्वास पाटील यांची आमच्या द्वारे प्रकाशित इतर पुस्तके
संभाजी
क्रांतिसूर्य
नागकेशर
पृष्ठसंख्या: ८६४ किंमत: ₹५४०
Book Available
पृष्ठसंख्या: २४० किंमत: ₹२९५
Book Available
पृष्ठसंख्या: १६८ किंमत: ₹१९०
Book Available
पृष्ठसंख्या: २६२ किंमत: ₹४९५
Book Available
पृष्ठसंख्या: ४०४ किंमत: ₹४५०
Book Available
मेहता पब्लिशिंग हाऊस
Email: sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com
Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse
1000+ Marathi books
Available as e-Book
WhatsApp us on 9420594665
Available on :
Printed book -
Flipkart and amazon
E-book -
play.google.com/store/books
www.amazon.in

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP- 6 /31-12-2020
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/2018-2020
Posted at PUNE PSO GPO 411001 / EveryThursday, Date of Posting : 24-12-2020 / Date of Publication : 24-12-2020

# २४ डिसेंबरला प्रकाशित झाली आहेत, आंतरभारती संकल्पनेला पूरक अशी दोन पुस्तके

मूळ हिंदी
लघुकादंबरी




पाने ५२ । किंमत ६० रुपये

## दंतकथा

अब्दुल बिस्मिलाह
अनुवाद । भारत सासणे

श्री. अब्दुल बिस्मिल्लाह यांना मी गमतीने लिहिलं की, ही कादंबरी जर तुम्ही लिहिली नसती तर मी लिहिली असती. यातलं सूत्र, याचा आशय मला जवळचा वाटला आहे. भोवतालची भयव्याप्तता, सार्वत्रिक आतंक आणि कोणाचेही सुरक्षित नसणे– त्यामुळे निर्माण झालेली सर्वसामान्य माणसांची बेचैनी आणि त्यांचं 'खुराड्यातलं' सामूहिक जगणं, हे मलाही जाणवलेलं वास्तव. म्हणून कदाचित मीही अशा शैलीची कादंबरी लिहिली असती. सर्जनशील लेखकाने अनुवाद करण्यात वेळ घालवावा की नाही, हे मुद्दे कधी कधी चर्चेत येत असतात. ही हिंदी कादंबरी वाचेपर्यंत मीही अशा चर्चेत कदाचित भाग घेतला असता, पण त्यानंतर मराठीत या कादंबरीचा अनुवाद आला पाहिजे, असे मला वाटले.

मूळ
उर्दू नाटक




पाने ५६ । किंमत ६० रुपये

## उघडा, दरवाजे उघडा...!

कृष्ण चंदर
अनुवाद । भारत सासणे

सन १९६४ मध्ये लिहिलेलं नाटक सन २०२० मध्येसुद्धा अगदी प्रस्तुत आहे, लागू पडतं आहे, हे पाहून मी चकित होत राहिलो. भोवती आज जे घडतं आहे, त्याबद्दलची चर्चा साठ वर्षांपूर्वीच्या नाटकात केली तर आहेच; पण दिशादर्शनही केलंय, तोडगाही सांगितलाय, हे पाहून मी आणखीनच चकित झालो. या नाटकाचा मराठी अनुवाद केला पाहिजे, असं मला वाटू लागलं. मग अल्पावधीत थेट उर्दूतून मराठीत हा अनुवाद उतरून आला.

also available at amazon.in
इ–बुक्स किंडलवर उपलब्ध

**संपर्क : साधना प्रकाशन**
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३० दूरध्वनी : ०२०–२४४५९६३५
sadhana.prakashan@gmail.com